म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# हे देश ही माणसे

एक प्रवासवर्णन

लेखिका : शांता घांदरफळे
प्रस्तावना : पु. ल. देशपांडे

REFBK-0014277

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २

सन १९६४
म. ग्र. स. ठाणे
षय भू. प्रवास
. क्र. ३९९

# हे देश ही माणसे

सौ. शांता घांदरफळे



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८९५२ दि: ...
क्र. ३६६ दि. २८/६/६५

# हे देश ही माणसे

एक प्रवासवर्णन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८२७७

लेखिका : [illegible]ता धांदरफळे
प्रस्तावना : पु. ल. देशपांडे

REFBK-0014277
REFBK-0014277

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २

किंमत : रुपये ३·५०

© सौ. पद्मजा वसंत जोशी, 'राजइंदिरा' डेक्कन जिमखाना, पुणे ४.

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणे २.
मुद्रक : वि. नी. पटवर्धन, साधना प्रेस, ४३०-३१ शनवार पेठ, पुणे २.

इच्छा ... !

ती. सौ. बाई व ती. अण्णा



यांच्या चरणी ...

— लेखिका

# प्रवासापूर्वी

शांताबाईंचा आणि माझा परिचय होण्याचा योग आला नाही. एके दिवशी सकाळी एक गृहस्थ आपल्या दोन स्नेह्यांना घेऊन माझ्या घरी आले. ‘ वसंतराव जोशी ’ असा त्यांनी स्वतःचा परिचय करून दिला. त्या स्नेह्यांचीही ओळख करून दिली आणि म्हणाले की, माझ्या नुकत्याच दिवंगत झालेल्या वहिणीने विलायतेहून आपल्या आप्तस्वकीयांना काही पत्रे लिहिली होती. त्या पत्रांचा संग्रह छापून प्रसिद्ध करायचा आहे. त्या संग्रहाला तुम्ही प्रस्तावना लिहावी अशी इच्छा आहे.

मी पत्रे वाचायला सुरुवात केली. आणि सगळी पत्रे वाचून संपवताना विचार आला की, जीवनाविषयी इतकी आस्था, इतके प्रेम असणाऱ्या ह्या व्यक्तीला त्या जीवनाचा संपूर्ण आस्वाद घेण्याची पुरती सवड न देण्यात नियतीने काय साधले ? ह्या पत्रांतून खरे दर्शन घडले ते एका सुगृहिणीचे, सुशील कन्येचे आप्तस्वकीयांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या एका प्रेमळ जीवाचे. इंग्लंड देश, तिथली माणसे, तिथल्या चालीरीती ह्यांची आता काही फार मोठी नव्हाळी राहिलेली नाही. पण पाश्चात्त्य देश आणि तिथली समाजपरिस्थिती ह्यांवर सखोल संशोधनात्मक विचार मांडण्यासाठी काही शांताबाईंनी ही पत्रे लिहिली नव्हती. साधा प्रवासवर्णनात्मक ललितग्रंथ लिहावा असाही काही त्यांचा मानस नव्हता. दूर देशीची नवलाई आपल्या आप्तांना कळावी, परक्यांच्या देशात जे सौंदर्य, जे आंबटगोड अनुभव आले त्याचा आनंद आपल्या मंडळीत वाटून द्यावा, त्या दूर देशी ‘ तुझी ग साळुंकी आहे बाई सुखी ’ हा सांगावा पत्रांतून आपल्या आईवडिलांना आणि भावंडांना कळावा म्हणून त्यांनी ही पत्रे लिहिली. प्रवासवर्णने लिहिण्याचा मलाही थोडा अनुभव आहे. परंतु ही वर्णने लिहिताना मी साहित्यिक आहे आणि म्हणून इतरांपेक्षा मला काही निराळी दृष्टी आहे ह्या काहीशा अहंकारी विचारातून मला माझी सुटका करून घेता आली नाही, हे ती प्रवासवर्णने वाचताना माझे मलाच वाटते. शांता-बाईंना हे अनुभव पत्रांतून लिहिताना असल्या कुठल्याच विचाराची बाधा झाली नाही. एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे, ‘ इथं तरी कुणाला येतंय काव्य ?

माझ्या आतापर्यंतच्या पत्रांत काय काव्य आहे काय ?' पत्र लिहायला काव्य लागत नाही. आपल्या पत्रांतून हा केवळ एक मजकूर म्हणून लिहिताना ह्या निरनिराळ्या पत्रांतून जात्यावरच्या ओव्यांसारखा सहजपणाने आपण काव्यातून आढळणारा भावगंधही मागे ठेवला आहे याची त्यांना जाणीवही नव्हती. आपल्याच माजघरात दळताना, 'कुणा बाहेरच्या श्रोत्यांसाठी मी काही काव्यगायन आरंभले नाही—माझ्या मुला-माणसांचं गाणं त्यांच्याचसाठी आहे—झालं वेडंवाकडं म्हणून कोण हसणार आहे ? ह्या भावनेने जशा ओव्या रचल्या गेल्या, त्याच भावनेने ही पत्रं लिहिली गेली आहेत. मनी दाटलं ते ओठी साठलं असं झालं आहे. ही निरागसता, आपल्या माणसांविषयीचा जिव्हाळा याचा साक्षात्कार हेच या संग्रहाचं वैशिष्ट्य आहे. डोळे वटारून अंगावर येणारा धटिंगण अरब पाहिल्यावर जो राग आला तो तसाच पत्रातून उमटला. केबिनमधली जोडीदार पारशीण शिष्टपणा करायला लागली तिच्याविषयीचा तिरस्कार आडपडदा न ठेवता दाखवला गेला. 'आंब्याच्या पावडरीने विरजलेले दही ही काही फार मोठी कलात्मक अनुभूती नव्हे. किंवा "परदेशी पाहुण्यांसाठी सहा-सात बाटल्या दूध साठवलं आहे मी. ही काही विलायतेहून हिंदुस्थानपर्यंत कळवण्याइतकी महत्त्वाची बातमी नाही. पण ही साधी भोळी वाक्यं वाचताना त्यांमागे उभी असलेली दक्ष गृहिणी ज्याला दिसली नाही त्याने फक्त ती वाक्येच वाचली. त्या वाक्यांचा पडदा बाजूला सारून पाहिले नाही. साध्यासाध्या गोष्टींच्या मागे फार मोठे भावसौंदर्य हे असं मर्यादशीलपणानं उभं असतं. विरजण लावणं हा पराक्रम नव्हे. पण श्रीखंड जमलं नाही तर पाककुशल गृहिणी म्हणून माझा पराभव होणार आहे ह्या हुरहुरीने अस्वस्थ झालेल्या शांताबाईंना त्या विलायती चुलीजवळ घट्ट दही लागलेलं अचानक जेव्हा दिसलं तेव्हा त्यांना झालेला आनंद आणि बशीत अचानकपणे चमकणारा रेडियम पाहिल्यावर मादाम क्यूरीला झालेला आनंद, यांची प्रत फारशी निराळी नाही. 'इंग्रज' पाहुण्यांनी देखील पुन्हापुन्हा मागून खाल्ले हे पत्रातून कळविण्याइतके मोठे केव्हा होते ते गडकऱ्यांच्या शब्दांत सांगायचे तर—'मी उगाच सांगत नाही!'

साहित्यिक मंत्रतंत्राची साधना करून लिहिलेल्या लिखाणात अशी सहजता यावी याचिसाठी ही वृत्ती (भिक्षुकीच्या अर्थाने) संभाळणाऱ्या आमच्या-

सारख्यांचा अट्टाहास असतो. साहित्यिक-निर्मिती ही कुशल माळ्याने केलेली बाग आहे. तिथली फुले पहायला तोलामोलाचे दीदावर येणार असतात. त्यांची मेहेरबानी होणार की गैरमर्जी याची उरीमनी धास्ती असते. किंबहुना पुढेमागे साहित्यात स्थान मिळावे म्हणून ती तसली कागदी लिहिलेली पत्रे असतात. ह्या संग्रहातली पत्रे त्यांतली नव्हेत. ही सहज उगवलेली रानफुले आहेत. शांताबाईंच्या कुटुंबियांनी ती छापायचे ठरविले नसते तर काळाच्या ओघात ती कोमेजूनही गेली असती.

आपली भातुकली कुणी पहात आहे की नाही याची खंत न बाळगता लहान पोरींनी त्या चिटपुटूच्या संसारातले संवाद सहजी बोलावे तशी ही पत्रं सहजी बोलून गेली आहेत. शांताबाईंच्या आईवडिलांनी केलेल्या उत्तम संस्कारातून जोपासलेलं व्यक्तिमत्त्व त्यांना नकळत ह्या पत्रांतून फुलून आलं आहे. आणि म्हणूनच त्यांच्या यजमानांनी पाहुण्यापुढे दिलेल्या शाबासकीची हकीकत न संकोचता त्यांनी आपल्या आईवडिलांना कळविली आहे. त्या क्षणी त्यांना जे कृतकृत्य वाटलं त्या वाटण्यामागे तुलशीदलाने द्वारकाधीशाला तुळणाऱ्या रुक्मिणीचा वारसा आहे. पण ही कृतकृत्यता व्यक्त करताना मात्र त्यांच्या ध्यानीमनीही नसेल. आपल्या अण्णांना विलायतेहून लाडू करून पाठवणारी ही मुलगी. मग ते पीठ करायचं यंत्र कसं मिळवलं, कॉफीच्या यंत्रातून डाळीचं पीठ कसं केलं, हा सारा तपशील किती बहादुरी केल्याच्या स्वरात त्यांनी सांगितला. तो वाचताना ज्याला --' बापाजी हो बापाजी, केवढी तुमची छाती, काळजाचा घड दिला परक्याच्या हाती ' म्हणणारी लेक दिसली नाही त्याला विलायतेत लाडू केले एवढंच दिसेल. सुदाम्याच्या पोह्याच्या पुरचुंडीची बाजारपेठेच्या भावात किंमत करायची नसते. लाडू करण्याच्या किंवा शंकरपाळे पाठवण्याच्या मागल्या धडपडीच्या जोडीला बापाच्या मायेची लेकीनं गुणगुणलेली ओवी ऐकू आली पाहिजे. असल्या साध्या साध्या गोष्टी पापणीची कड भिजवून जातात...

असाच एक प्रसंग सांगायचा मोह मलाही आवरत नाही. नुकताच मी माझ्या आत्याबाईंना भेटायला त्यांच्या गावी गेलो होतो. जवळ जवळ वीस-बावीस वर्षांनी आमची भेट झाली. आता माझी चाळीशी उलटून गेली आहे. आत्याहि सत्तरीच्या घरात. लहानपणी सुट्या पडल्या की, तिच्या खेड्यावर मी

जात असे. इतक्या वर्षांनी भाचा आला म्हणून आमच्या आत्याबाईंनी मला आवडणारी बाजरीची भाकरी आणि तिळकूटही केलं होतं आणि जिलबीचाही बेत होता. दिवसभर तिच्या घरी राहिलो आणि संध्याकाळी जायला निघालो. तिच्या पायांवर दंडवत घातला. म्हाताऱ्या हातांचा पाठीवर आशीर्वाद घेतला. हळूच माझ्या हाती तिने नोट दिली. मी म्हणालो, " पैसे कसले--"

" अरे खाऊसाठी ठेव तुला... "

तिच्या लेखी मी खाऊच्याच वयाचा होतो. माझ्या सुदैवाने मोठमोठ्या सभा-संमेलनांतून हारतुऱ्याचा सन्मान घेण्याचे मला प्रसंग आले आहेत. पण आजवर ' बिदागी ' मिळत गेली. ' खाऊ ' देणारं आपल्याला कुणीतरी आहे हा विचार मला पुन्हा माझ्या बालपणात नेऊन सोडणारा होता. शांताबाईंच्या पत्रांतून, अगदी छान पडला रवा हे वाचल्यावर तिच्या अण्णांना आपली मुलगी सातासमुद्रांपलीकडं गेली तरी माजघरातूनच आपल्याशी बोलणारी ती ' तायडी ' च राहिली आहे हा विचार किती विलक्षण सुखवून गेला असेल. आपण वाढविलेल्या रोपट्याने जन्मदात्या मातीचा आधार सोडला नाही, ' पणती न का मिळेना, बाटलीच्या टोपणात वात लावली आणि औक्षण केलं ' हे वाचून त्यांना किती धन्यता वाटली असेल...!

देशी संस्कारात वाढणारी माणसं आपण! त्यातून विलायतेहून एकदम तिरपागडीच होऊन येणारी माणसं पाहिलेली असतात. अंगावरून बाहेरचं वारं जावं तसं विलायती वारं गेलेली! काहीच्या काहीच झालेली. आपला देश, आपली माणसं त्यांना ' ब्याकवर्ड ' वाटायला लागतात. त्यातून कुणीकुणी वर येऊन काही काही सांगतं. वास्तविक हा दोष विलायतेचा नाही. काही जाणा-रांची घडणच कच्ची असते. शांताबाईंचे संस्कार चांगले पक्के होते हे ह्या पत्रांतून वारंवार दिसतं. उघड्या डोळ्यांनी परक्यांचं वैभव पाहताना आणि त्यांच्या पराक्रमाचे पवाडे ऐकताना नुसते डोळे आणि कानच नव्हे तर आतली जडणघडणही मजबूत असावी लागते. चांगल्याला त्यांनी चांगलंच म्हटलं आहे इतकेच नव्हे तर संपूर्ण शाकाहारी असूनही कुणाचं मन दुखवू नये म्हणून टर्की खाण्याचाही एक प्रयत्न केला आहे. सुसंस्कृत मनाचं हे लक्षण आहे. ते मन ह्या पत्रांतून अगदी नितळपणानं प्रकट झालं आहे.

पत्रं अशी मनाचा नितळपणा दाखवून गेली पाहिजेत. पत्र म्हणजे तरी काय? आपली माणसं जवळ असती तर जे बोललो असतो ते दूर आहेत म्हणून कागदावर उतरवायचं. सरळ मनाची माणसं अशीच सरळ पत्रं लिहितात. मग 'डॅफॉडिल'ला इंग्रज कवींनी डोक्यावर घेऊन नाचवलेलं का असेना—मला त्यात विशेष काही वाटलं नाही हे लिहिण्याचं, धैर्य येतं. माझ्या पत्नीची आई तिला कोकणातून पत्रं लिहिते. पिशवी उलटी केल्यावर मंडईतली तोंडली, अळूची जुडी, काड्याच्या पेट्या, लसणाची गड्डी, हिंगाची डबी, उदबत्त्या अशा विसंवादी वस्तू कशा सांडतात तशी त्या पत्रांतली वाक्यं आणि शब्द सांडलेले असतात. तिला ही म्हणाली—'अग आई, जरा स्वल्पविराम, पूर्णविराम तरी लिहीत जा. तुझ्या पत्रांतले शब्द थर्डक्लासच्या डब्यातल्या पॅसेंजर्ससारखे दाटीवाटीने घुसलेले असतात.' आई म्हणाली, "बोलताना काय, कुठं चाललीस—प्रश्नचिन्ह, बरं मी येते—पूर्णविराम, असं बोलतात? उगीच शहाणपणा सांगू नकोस..."

बोलल्यासारखं अगदी सहज लिहिणं हे कर्मकठीण काम! काही माणसं मग 'बरं का' आणि 'किनई' चा खोटा लाडिकपणा करतात. त्यापेक्षा 'लेखी' भाषा परवडली. खरोखरीचं सहज लिहिण्यात आम्ही बलुतेदार साहित्यिक थिटे पडतो आणि म्हणूनच एखाद्या अनपढ लक्ष्मीबाई टिळक आणि बहिणाबाई चौधरी आमचा नक्षा उतरवतात. आम्ही समर्पक उपमा प्रतिमा वगैरे शोधायला जातो आणि शांताबाई त्या फ्रेंच 'बागेत' पावाला चटकन पडवळाच्या जोडीला नेऊन बसवतात. बोट खूप हलल्यामुळे जमिनीला पाय लागल्यावर आनंदाने नाचू असे वाटणाऱ्या शांताबाईंना 'आम्ही नाचायच्या ऐवजी जमीनच नाचतेय' असं वाटतं!

ह्या पत्रांतून निरनिराळ्या रीतीने त्यांच्या निर्मळ व्यक्तिमत्त्वाचं दर्शन झालं आहे. आपल्या वडिलांना लिहिलेल्या एका पत्रात—ते नुसते ताक आणि दाणे एवढ्यावर रहात आहेत—इथे आपण एका संपन्न देशात अधिक सुस्थितीत राहतो यामुळे वाटणारी खंत आहे. आपल्या वडिलांनी भावाच्या जोडीला मुलासारखंच आपल्याला वाढवलं तेव्हा—'हिंदुस्थानात परत आल्यावर सगळी जबाबदारी मी घेईन' असं म्हटलं आहे. विलायतेहून जाऊन आलो एवढेच क्वालिफिकेशन घेऊन मिरवणाऱ्या बायका नव्हे तर पुरुषही आहेत. परंतु

शांताबाईंनी आपले नाव एस. पी कॉलेजात नोंदविण्याविषयी आग्रहाने कळविले आहे. त्यांच्या उमेदी मोठ्या होत्या. केवळ सुकन्या आणि सुगृहिणीच नव्हे तर आपल्या देशाचे नाव खराब न होता भारतीय संस्कृतीविषयीचं कुतूहल वाटावं --परकीयांचं आपल्या देशाबद्दल मत चांगलं व्हावं म्हणून त्यांच्यात मिळून मिसळून, त्यांचं आदरातिथ्य उत्तम प्रकारानं करणारी एक उत्तम नागरिक म्हणूनही त्यांनी तिथे शाबासकी मिळवली. ही पत्रे लिहिताना त्यांना कल्पनाही नसेल की हा पत्रसंग्रह म्हणजे भारतीय सुसंस्कारांत वाढलेल्या स्त्रीच्या अंतरंगाचं एक बोलकं चित्र आहे. परदेशचा प्रवास, तिथल्या स्थळांचं वर्णन, हा मुद्दा माझ्या मते गौण आहे. अजाणतेपणानं त्यांच्या हातून निर्माण झालेलं त्यांच्या जीवनातल्या एका कालखंडाच हे एक सुंदर पत्ररूप आत्मचरित्र आहे. हे वाचताना इंग्लंडची ओळख पटली काय न पटली काय, मला त्याचे महत्त्व वाटत नाही. पण आपल्या घरकुलात खूप रमलेल्या, उंबरठ्याबाहेर तोलानं वावरणाऱ्या आणि 'उंबरठ्याआत गृहिणी म्हणून आदरातिथ्यात कसूर न पडू देणाऱ्या, एका कौटुंबिक कुलाचार पाळणाऱ्या कुलकन्यकेचं ह्या पत्रांतून जे दर्शन घडलं ते मला मोलाचं वाटतं. अशा ह्या जीवनाची परिसमाप्ती इतक्या लवकर व्हावी ह्याचे दुःख त्यांच्या परिचितांइतकेच आता ह्या पत्रांतून परिचय होणाऱ्या त्यांना प्रत्यक्ष अपरिचित असणाऱ्या वाचकांना होईल...

हे पुस्तक त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध होत आहे. ते पाहून ज्यांना त्यांच्या हातची पत्रे आली असतील त्यांच्या स्मृती पुन्हा जाग्या होतील. त्या पत्रां-मागून बोलणाऱ्या शांताबाई त्यांना दिसतील आणि ती माणसे व्याकूळ होतील. पूजा संपल्यावर रिकाम्या देवघरात अगरबत्तीचा आणि फुलांचा गंध दरवळावा तशी ह्या पुस्तकाची अवस्था आहे. शांताबाईंनी जीवनाची अशीच षोडषोपचारे पूजा केली. जाताना अहेवपणाची लेणी लेवून गेल्या आणि प्रसादाची थाळी मात्र मागल्यांसाठी ठेवली... पुजाऱ्याने ज्या निरागस भावाने ही पूजा केली त्याच भावाने ही पत्रे वाचली जावी अशी सदिच्छा व्यक्त करण्यापलीकडे मी तरी अधिक काय सांगणार ?...

पुणें
२५ नव्हेंबर १९६४

**पु. ल. देशपांडे**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३८६५२... वि: ...भू प्रवास
क्रमांक ...३९९... नों: दि: ...२८.९.९५

वन्स...


संमिश्र भावनान्मधून आज हे पुस्तक प्रकाशित होत आहे. दुःख आहे आपल्या पश्चात हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे म्हणून...आणि समाधान आहे निदान अंशतः आपल्या इच्छा पूर्ण होत आहेत म्हणून...जीवन हे किती क्षण-भंगुर आहे...हे आपल्या अल्पशा जीवनाकडे पाहिल्यानंतर पटतं...केवळ बारा वर्षांचा आपला सहवास...पण अकाली गेलेल्या माझ्या धाकट्या कुसुम-वन्संच्या ठिकाणी आपण मला मानलंत...आणि "वहिनी"च्या ठिकाणी "बहिणी"ची माया दिलीत...हे ऋण मी ह्या जन्मातही फेडू शकणार नाही याची जाणीव आहे...परंतु ह्या पुस्तकाच्या निमित्ताने...अनेकांचं सहकार्य लाभलंय् ह्या पुस्तकाला, ह्या साऱ्यांचे आभार मानून प्रकाशात आणायल केवळ निमित्त झालेली...

...वहिनी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि ........



डॉ. जॉनसन यांची अभ्यासिका



नॉट्रडॅम [पृष्ठ १५]



इंडिया हाऊस, लंडन [पृष्ठ २८]





१३ अॅबर क्रॉबी, लिव्हरपूल [पृष्ठ ३४]

आम्ही रहात होतो ते इथ.

ही आमची लॅंडलेडी

पोर्ट सनलाईट आर्ट गॅलरी [ पृष्ठ ८१ ]



एका सेकदाला एक साबणाची बॉक्स

गार्सं डेलची शाळा [ पृष्ठ ९९ ]



शाळेतर्फे फोटोहि काढले आमचे

ग्रेटना ग्रीन [पृष्ठ ११६]




त्या लोहाराचे हे प्रसिद्ध दुकान.....!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३८६५२ दि:
क्रमांक ३८६ ले दि: २८-६-६५

एस. एस. चित्राल
२६-६-४९

ती. सौ. बाईस स. न.

काल तुला पत्र लिहायला घेतलं पण लिहायला सुरुवात करणार तोच तुमच्या सर्वांच्या एकेक आठवणी यायला लागल्या नि कसंतरीच वाटायला लागलं. काय लिहावं काहीच सुचेना. म्हणून मग पत्र लिहायचं बाजूला ठेवून समुद्राकडं नुसतीच पाहात बसले. तर तिथंही लाटांच्या फेसावर तुमचे एकेकांचे चेहरे दिसायला लागले, नि मग मात्र तुम्ही भेटल्याचा आनंद झाला मला. त्यामुळं मग पत्र लिहायचं राहून गेलं तसंच.

आज आत्ता सकाळचे साडेपाच वाजले आहेत. मी एकटीच उठून येऊन इथं डेकवर तुला पत्र लिहीत बसले आहे. आत्ताची ही वेळही लिहायला फार छान आहे. समुद्रावर दाट धुकं पसरलं आहे. मंद मंद गार वारा वाहतो आहे. बहुतेक लोक अजून उठले नसल्यामुळं डेकवर सर्व शांत आहे. सागराची स्वारीही आज फार शांत आहे.

त्यामुळं एखाद्या संथ तलावातून बोट चालली आहे असं वाटतंय. बिलकुल हलत नाही. समुद्राचं खरं स्वरूप शुक्रवारी बघण्यासारखं होतं. या आजच्या शांत भासणाऱ्या रत्नाकरानं त्या दिवशी मात्र अगदी रुद्रावतार धारण केला होता. आपण म्हणत असतो की समुद्रावर डोंगराएवढ्या लाटा येतात; आतापर्यंत मला ती अतिशयोक्ती वाटत होती. पण परवा जेव्हा डोळ्यांनी पाहिलं तेव्हा मात्र पटलं की खरोखरीच डोंगरापेक्षा मोठ्या असतात लाटा कधी कधी. एवढी

मोठी आमची बोट, पण एकेका वेळेला पन्नास-पन्नास, साठ-साठ फूट वरखाली व्हायची. म्हणजे कल्पना कर केवढ्या मोठ्या असतील लाटा! आपण उभे राहिलो होतो ते डेक समुद्रापासून किती उंच आहे हे तू बंदरावर पाहिलंच आहेस. बोटीवरला सगळ्यात उंच भाग हा. पण पाच-सहा वेळा लाटांचं पाणी आत शिरून डेक साफ धुवून निघालं. घोट्याएवढं पाणी झालं होतं डेकवर. आम्ही सगळेजण खुर्च्या टाकून बसलो होतो. बोट हलत असता शक्यच नव्हतं केबिनमधे जाणं. नाहीतरी आम्ही केबिनमधे फारसे नसतोच म्हणा. झोपायला तेवढं आत जातो. पुष्कळसे लोक तर डेकवरच झोपतात. सी-सिकनेसमुळं केबिन-मधे जाऊच शकत नाहीत! इथं डेकवर गार वारा येत असतो, त्यामुळं बरं वाटतं. केबिनमधे हवा जरा गरम असते त्यामुळं आत गेलं रे गेलं की सिक् वाटायला लागतं.

आमच्यापैकीही बहुतेकांना थोड्याफार प्रमाणात सी-सिकनेस आला आहेच. फक्त बाळासाहेब व राजगोपालन या दोघांना मात्र काही त्रास झाला नाही. आता समुद्र शांत झाला आहे. त्यामुळं माझा त्रास बराच कमी झालाय. आमच्यापैकी श्रीवास्तव नावाचा एकजण आहे तो मात्र बिचारा अजूनही खुर्ची-वरून उठू शकत नाही. कधी एकदा एडन येईल नि जमिनीवर पाय ठेवीन असं त्याला झालंय. हा समुद्र, हे डेक, ही खुर्ची या सगळ्यांचा अगदी वीट आलाय त्याला! त्यालाच काय? अग, आम्हां सगळ्यांनाच नको हा समुद्र असं होऊन गेलंय.

कंटाळा येतो ग एकसारखं पाणी पाहायचा. तुम्हां सर्वांचा निरोप घेऊन मुंबई सोडली तेव्हापासून सारखं पाणीच पाणी! कुणीकडंही पहा... पाण्या-खेरीज दुसरं काही दिसतच नाही. अं हं. चुकलंच. आकाश दिसतंय ना! निळं आकाश नि निळं पाणी. काही उद्योग नसल्यामुळं तर ज्यास्तच कंटाळा येतो. सी-सिकनेसमुळं कुठंही हिंडता येत नाही, फिरता येत नाही. खायचं नाही, प्यायचं नाही. सारखं आपलं इझीचेअरवर बसून रहायचं. मधून मधून थोडं-फार बोलायचं...

पोटात काही नसताना गप्पा तरी कशा मारायच्या? अर्थात, पहिले दोन दिवसच मला असा त्रास झाला. सकाळपासून ब्रेकफास्ट घ्यायला लागले आहे

मी आता. ब्रेकफास्ट छान असतो. ब्रेड, लोणी, जॅम, कॉर्नफ्लेक्स, केक्स...बऱ्याच वस्तू असतात खाण्यासारख्या.

काल सकाळी ब्रेकफास्टच्या वेळी मजा आली हं. मेनूवर "पुरी पोटॅटो" असं लिहिलं होतं. आम्हांला वाटलं, अरे वा! आता पुरी-भाजी खायला मिळणार आपल्याला. चैन आहे. मोठ्या ऐटीनं आम्ही ते मागविलं. वेटरनं आमच्यापुढं काय आणून ठेवलं? अग उकडलेल्या बटाट्याचा एक गोळा! हसता हसता पुरेवाट झाली आमची!

इथल्या भाज्या म्हणजे काय? कोबी, फ्लॉवर, बटाटे नुसते उकडून आणून ठेवतात. दुपारी लंचला शाकाहारी लोकांना भात-भाजी देतात. भाजी कोणतीही असली तरी चव सारखीच. म्हणजे कसलीच नसते. पण त्याला नावं मात्र रोज नवीन नवीन. एकदा म्हणतात बॉंबे करी... दुसऱ्या दिवशी मद्रास करी... तर तिसऱ्या दिवशी सिंगापूर करी! मी एकच नाव देऊन टाकलंय, बेचव चित्रळ करी! हे सारं चित्रविचित्र सोडून मी मात्र फक्त ब्रेड व लोणी खाते.

तू बरोबर दिलेला खाऊ अजून खाल्ला नाही. गोड पदार्थानं म्हणे सी-सिकनेस जास्त येतो. मला सी-सिकनेस झाला असं कळल्यानं तू निष्कारण काळजी करू नकोस. अग अगबोट हलल्यामुळं असं व्हायचंच.

गेले दोन दिवस आता वादळ शांत झालंय. मलाही बोटीची सवय झालीय. त्यामुळं आता काही होत नाही. माझी काळजी करू नकोस. तुझ्याच प्रकृतीची नीट काळजी घे.

तुझी
**ताई**

एस्. एस्. चित्रळ
२७-६-४९

ती. अण्णा यांना सा. न.

...आता एडनच्या आसपास कुठंतरी आलो आहोत. आज चार वाजता एडनला पोहोचू असा अंदाज आहे. आणखी चार तासांनी पाच दिवस एक-

सारखं पाण्यातून चालल्यानंतर पाय जमिनीला लागणार आहेत. प्रत्येकजण अगदी अधीर झालाय. दोन्ही डेक माणसांनी फुलून गेलेत. सी-सिकनेस-वाल्यांनाही आता बरं वाटू लागलंय. सगळेजण उत्साही आहेत.

आता चांगले कपडे घालून इकडं तिकडं हिंडणारे लोक दोनच दिवसांपूर्वी कसे बेजार झाले होते ! मोटमोठ्या लाटांवर हेलकावे खाणारी बोट नि तिच्यातले हालचाल न करता खुर्च्यांवर पडून राहणारे प्रवासी ? आजच्यापेक्षा अगदी विरुद्ध असा होता तो देखावा. हालचाल होत होती ती खलाशांची, बोट न लागणाऱ्या थोड्या प्रवाश्यांची व बिअर पुरविणाऱ्या वेटर्सची. मुंबईहून निघालेल्या पॅसेंजर्समधे काही असे वीर आहेत की ते सारखे पीतच आहेत ! जणू काही मुंबईतल्या दारूबंदीचा सूड घेताहेत ! काहीजण जे सिक झाले होते ते बोट लागल्यामुळं की दारू चढल्यामुळं हे त्यांचं त्यांनाच समजत नव्हतं. मग इतरांना कसं समजणार ? खाण्यामुळं बोट लागण्याचं कमी होतं असं कुणाकडून तरी कळल्यामुळं काहीजण भरपूर खात होते. काहीजण अजीबात खातच नव्हते. पण दोघांनाही बोट लागत होतीच ! मी काही न खाणाऱ्यांपैकी होते. कडकडीत उपास करीत होते असं मात्र नाही. फक्त डायनिंग हॉल्मधे जात नव्हते इतकंच. कारण डायनिंग हॉल्मधल्या व भटारखान्यातल्या मांस-मच्छराच्या वासानं मला बोट जास्तच लागायची.

ते दोन दिवस मी आबासाहेब नातू यांनी आणलेल्या शेवचिवड्यावरच काढले. त्यांनी त्यांचे डबे माझ्या स्वाधीनच केले आहेत. हे नातू पुण्याचेच असले तरी इथं बोटीवरच त्यांची प्रथम ओळख झाली. फार चांगले गृहस्थ आहेत. प्रत्येकाची मोठ्या आपुलकीनं चौकशी करीत असतात. तरुणालाही लाजवील असा उत्साह आहे त्यांच्या अंगात. त्यांना बोट लागली नाही. खांद्यावर पिशवी न् हातात पुस्तक घेऊन ते डेकवरून इकडून तिकडे हिंडत असतात. बोट लागलेल्यांच्या जवळ जाऊन त्यांची चौकशी करून, उत्साही वातावरण निर्माण करीत असतात.

सौ. बाईनं दिलेला खाऊ गोड असल्यानं अजून खाल्ला नाही. गोडानं बोट अधिक लागेल ही भीती. आता एडनचा किनारा दिसायला लागलाय. व सर्वांनी आपापल्या जवळचे गोड पदार्थ आणून त्यांच्यावर ताव मारायचं ठरविलं

आहे. पाच दिवसांनंतर जमिनीचं दर्शन होणार, त्याचा उत्सव नको का साजरा करायला ?

आमची बोट सुटल्यानंतर तुम्ही सर्वांनी काय केलं ? कुठं कुठं गेलात ? मुंबई केव्हा सोडली ? सौ. बाईला त्रास झाला का ? ती जास्त रडली नाही ना ?

विरुद्ध दिशेनं जाणारी एक बोट आता आमच्या बोटीपासून थोड्या अंतरावर दिसत आहे. आकाश नि पाणी यांशिवाय हीच एक वस्तू आसमंतात दिसत आहे. लोक मोठ्या उत्सुकतेनं तिच्याकडं पहात आहेत. मीही. त्यामुळं आता पत्र पुरं करते.

तुमची
**ताई**

एस्. एस्. चित्रळ
दि. १–७–४९

प्रिय शशी,

एडनहून ती. अण्णा व सौ. बाई यांना मी पाठविलेली पत्रं मिळालीच असतील. तू वाचलीस का ? बोटीवर आम्ही कसे राहतो हे वाचून काय वाटलं तुला ? बोट लागल्याचं वाचून काळजी केलीस काय ? “ आम्हांला सोडून एकटी विलायतला जाते नाही का ? बरी खोड मोडली ? ” असं वाटून आनंद झाला का ? पण मी एकटी नाही. माझी पत्रं वाचताना, तुम्हीही माझ्याबरोबर प्रवास करताहात असं तुम्हांला वाटावं म्हणून तर मी इतकी सविस्तर पत्रं लिहिते.

सोमवारी दुपारी साडेतीनला एडन दिसू लागलं. कित्ती कित्ती आनंद झाला सगळ्यांना. सर्वजण कपडे करून तयार झाले खाली उतरायला. आम्हीतर पहिला नंबर पटकावून उभे राहिलो. पण तिथंच आमचं चुकलं. चार वाजता आमची बोट बंदरापासून बरीच दूर उभी राहिली. सिग्नल दिसत होते. थोड्या वेळानं बंदराचा पायलट एका लॉंचमधून आमच्या बोटीवर आला व मग त्यानं आमची बोट बंदरात नेली. पायलट म्हणजे वैमानिक नव्हे हं. नाहीतर तू

समजशील वैमानिकानं बोट चालवली की काय ! बंदरात बोट चालवणाऱ्याला पायलट म्हणतात. मुंबईला देखील पायलटनंच आमची बोट बंदराच्या बाहेर आणली होती. कॅप्टन असताना आणखी पायलट कशाला असं तुझ्या मनात येईल. पण त्याचं असं आहे. बंदराजवळ कुठं खडक असतात, कुठं गाळ असतो, कुठं आणखी काही. बंदराजवळच्या या खाचाखोचा तिथल्या पायलटलाच माहीत असतात. बोटीच्या कॅप्टनला प्रत्येक बंदराची ही माहिती असणं शक्य नसतं.

आमची बोट जवळ जवळ पाच वाजता धक्क्यापासून फर्लांगावर उभी राहिली. वाटलं, आता आपल्याला खाली उतरायला मिळेल. पण छे ! अजून आमची तपश्चर्या पुरी झालेली नव्हती. कारण, डॉक्टर व कस्टमचे अधिकारी सारा परिवार घेऊन बोटीवर आले. त्यांनी एडनला उतरणाऱ्यांची कसून तपासणी करायला सुरुवात केली. हा सारा तपासणीचा फार्स होईपर्यंत सहासाडेसहा झाले. त्यानंतर मग खाली उतरायला परवानगी. अशा तऱ्हेनं तब्बल दोन-अडीच तास दाराशी खडी ताजीम केल्यानंतर एकदाचं आम्ही लॉंचमधे बसलो. पाच मिनिटांत धक्क्यावर.

पाच दिवसांच्या विरहानंतर भूमातेची न् आमची परत भेट होणार होती. पण प्रत्यक्ष अनुभवापेक्षा कल्पनेतच जास्त आनंद असतो. जमिनीवर पाय ठेवल्यावर अगदी आनंदानं नाचायला मिळेल असं आम्हांला वाटलं होतं. पण आम्ही नाचायच्या ऐवजी जमीनच नाचते आहे असं वाटलं ! एक पाऊलही धडपणे टाकता येईना. एखाद्या दारुड्याप्रमाणं झोकांड्या जात होत्या. मला तर भीतीच वाटली ! वाटलं की पाच दिवस जशी बोट लागली तशी आता जमीनही लागते की काय ! जमिनीवरल्या माणसाला बोटीवर चालायची जशी सवय करावी लागते तशीच सवय बोटीवरल्या माणसालाही जमिनीवर चालताना करावी लागते.

एडन बंदराची रचना फार छान आहे. डोंगरकपारीवर बांधलेले बंगले महाबळेश्वर-माथेरानची आठवण करून देतात. किनाऱ्याजवळच सर्वांत उंच टेकडीवर समुद्राकडं तोंड करून उभा असलेला गव्हर्नरचा बंगला येणाऱ्या-जाणाऱ्या जहाजांची टेहेळणी करतोय असं वाटतं. त्या बंगल्यातून बंदराचं दृश्य फारच सुरेख दिसत असेल. पण ते बघणं आम्हांला शक्य नव्हतं. एडनचे

रस्ते रुंद, डांबरी व मुख्य म्हणजे फार स्वच्छ आहेत. संध्याकाळीं रस्त्यावर रहदारी मुळींच नव्हती. टॅक्सीज मात्र इकडून तिकडून धावत होत्या. त्यांचाच काय तो आवाज.

बंदरापासून एडन शहर पाच मेल आहे. लाँचमधून आम्ही उतरल्यावर टॅक्सीवाल्यांची आमच्याभोवती गर्दी झाली. बोट पुन्हा आठ साडे-आठला सुटणार होती. त्यामुळं ठराविक वेळात टॅक्सीवाल्यानं परत नाही आणलं तर सगळाच घोटाळा व्हायचा. म्हणून एडन पाहायचा विचार आम्ही रहित केला. शिवाय पोटात कावळे ओरडत होते. दोन तास दाराजवळ उभं राहून केलेल्या प्रतीक्षेमुळं आम्ही थकून गेलो होतो. एखादं हॉटेल शोधून काहीतरी खाऊन परत बोटीवर जायचा विचार आम्ही कायम केला.

एक इराण्याचं हॉटेल दिसलं. आपल्याकडल्यापेक्षा गचाळ. तिथं थोडंसं खाल्लं व कोल्ड्रिंक मागवलं. तर त्या माणसानं लिंबाचं सरबत आणून दिलं. ते फारच चांगलं वाटलं. अधाशासारखं दोनतीन ग्लास प्यालो ! खाणं झाल्यावर उगीच इकडून तिकडं भटकंती केली. जमिनीवर चालण्याचा आनंद होता ना !

साडेआठ म्हणता म्हणता बोटीनं अकरा वाजता एडनचा किनारा सोडला. नि मग नकाशात खूप दूर वाटत असलेल्या लाल समुद्रातून आमचा प्रवास सुरू झाला. लाल समुद्र म्हणजे काही लाल नाही ! उलट त्याला लाल समुद्रा-ऐवजी नीलसमुद्र म्हणावंसं वाटतंय. पण असं म्हणतात की या समुद्रावर कधी कधी लाल रंगाचे सी–बीड्स् लाखोंनी येतात त्या वेळी पाणी लाल असल्याचा भास होतो.

लाल समुद्र फार शांत आहे. लाऊंजमधे तर घरातल्या दिवाणखान्यात बसल्यासारखं वाटतंय. सर्वांचा सी-सिकनेस पार नाहीसा झाला आहे. सगळी-कडं चैतन्य पसरलं आहे. खाना-पीना और मजा करना हे तत्त्व सगळ्यांना पटलेलं दिसतंय. कुठंही पहा…खेळ… गप्पा…हशा. बोटीवर खेळ खूपच आहेत. कुणी रिंग-टेनिस खेळतात तर कुणी टेबल-टेनिस. कुणी डार्टस् तर कुणी पत्ते. शिवाय डॉग्ज रेस, डॉंकी रेस, हाऊसीहाऊसी, फॅन्सी ड्रेस परेड… नि उरल्या सुरल्या वेळात डान्स आहेच. रोज रात्री आठ साडेआठपासून बाराएक वाजेपर्यंत. काल तर दुपारीही टी-डान्स झाला !

काल डेकच्या एका कडेला सिनेमा व दुसऱ्या कडेला डॉग्ज रेस चालू होती. तुला मी रेसचा खेळ आणून दिलाय ना, तशाच प्रकारची पण जरा मोठ्या प्रमाणावर असते ही रेस. लाकडाचे मोठमोठे कुत्रे केलेत नि त्यांना नंबर दिलेत. लोक या लाकडी कुत्र्यांवर पैसे लावतात ! रेसमधे जास्त लोकांनी भाग घ्यावा म्हणून तीन अँग्लो इंडियन फटाकड्या मुलींची रेस चालविण्यासाठी निवड केलेली आहे. दोन मुली फासे टाकतात. एकीचं दान कुठल्या नंबरचा कुत्रा हालवायचा नि दुसरीचं तो किती घरं हालवायचा यासाठी. तिसरी मुलगी कुत्री पुढं सरकवायचं काम करते. त्या कुत्र्यांवर ज्यांनी पैसे लावले असतील त्यांना सर्व पैसे वाटून मिळतात. सर्वांत पहिला येणाऱ्या कुत्र्यानं रेस जिंकण्याऐवजी सर्वांत मागे राहणाऱ्या कुत्र्यानं जिंकली की ती झाली डॉंकी रेस ! बोलून चालून डॉंकी पुढं जाणार कसा तो ? आम्ही थोडा वेळ रेस पाहिली, मग लागलीच येऊन झोपलो. गार वारा सुटल्यामुळे डेकवर थंडी वाजत होती.

आज सकाळी पाच वाजता उठले. पाहते तो चक्क ऊन पडलेलं. विषुववृत्ता-पासून लांब जातो आहोतना ? त्यामुळे सूर्य लौकर उगवतो न् उशीरा मावळतो. लाल समुद्राच्या एका बाजूला ऑफ्रिकेचं वाळवंट नि दुसऱ्या बाजूला अरबस्तानचं वाळवंट. या दोन्ही वाळवंटांमधून जाताना आम्ही उकाड्यानं होरपळून निघू असं वाटलं होतं. त्या मानानं काही उकडत नाही. दुपारी जरा जास्त उकडतं इतकंच. उकाड्यावरून आठवण झाली. पॅसेंजरांना त्रास होऊ नये म्हणून बोटीवर दोन स्वीमिंग टँक आहेत. त्या दिवशी तुम्ही बोटीवर आला होता तेव्हा तुम्हांला दाखवायचे राहून गेले. मात्र सौ. बाईला म्हणावं घाबरू नकोस. मी नाही पोहोत. पोहोणाऱ्यांची गर्दी असते. बाळासाहेबही पोहोतात. कधी कधी आबासाहेब नातूही असतात. या सर्वांना पोहोताना पाहून मला मोह होतो, पण हिंदुस्थानात परत येईपर्यंत पोहायचं नाही असा निश्चय केला आहे मी नि शेवटपर्यंत तो पाळणार आहे. मला चिडवण्यासाठी बाळासाहेब पोहोतात व काठावरून मला त्यांचे फोटो घ्यायला लावतात.

आता सकाळचे नऊ वाजलेत. आणखी दोन तासांनी आम्ही सुवेझ बंदरात जाऊ. आताच लांबवर डोंगरांच्या रांगा दिसू लागल्या आहेत. सबंध दिवस सुवेझमधे थांबायचं आहे पण तिथं उतरायला परवानगी नाही. अरब आणि

ज्यू यांच्यात लढाई चालली आहे ना ! त्यामुळं मार्शल लॉ आहे सुवेझला. नेमकं आम्ही यायच्या वेळीच बरी आठवण झाली या लोकांना लढाई करण्याची ! खाली उतरायला परवानगी असती तर सुवेझला उतरून मोटारीनं कैरोला गेलो असतो. तिथले पिरॅमिडस पाहिले असते. पोर्टसैदला जाऊन तिथून बोट गाठली असती. तसा विचार केला होता आम्ही. पण या मार्शल लॉ मुळं सगळाच घोटाळा झाला. पिरॅमिडस नाही तर नाही निदान सुवेझ कॅनॉल तरी पाहायला मिळेल असं म्हणावं तर तेही नाही. बोट रात्री जाणार आहे कॅनॉल-मधून ! जाऊ द्या झालं. सगळंच आपल्या मनासारखं नेहमी कसं होणार ?

वर्णनाच्या भरात पत्र फारच मोठं झालं. मलाही आता कंटाळा आलाय. त्यामुळं पत्र इथंच पुरे करते.

तुझी
**ताई**

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३८६५२— दि: ...भूमध्यास
क्रमांक ...३८८... नों दि ...
२८·८·६५

भूमध्य समुद्र
मार्सेल्सजवळ
६–७–४९

ती. सौ. बाईस सा. न.

आत्ताच परोटे, बटाट्याची भाजी नि लोणचं खाऊन आले अन् तुला पत्र लिहायला घेतलं. या पी. अँड ओ. च्या अस्सल इंग्रजी बोटीवर मला परोटे–भाजी कशी मिळाली याचं आश्चर्य वाटतंय ना तुला ? पण म्हणतात ना... साखरेचं खाणार त्याला देव देणार ! गेले दहा-बारा दिवस नुसतं ब्रेड-लोणी–खाऊन अगदी वीट आला होता.

इथं बोटीवर काम करणाऱ्या खलाशांपैकी बरेचजण रत्नागिरी, गोवा इकडले आहेत. त्यांच्यापैकी एकाला गाठून "आम्हांला पोळी-भाजी देशील

का " म्हणून आम्ही विचारलं. प्रथम त्यानं जरा आढेवेढे घेतले. " पीठ मिळत नाही...इंग्लिश वेटर्सना ब्रेडसाठी सपीट देतात, त्यांच्याकडून ते मिळवणं कठीण आहे...." पण शेवटी त्यानं कुठून तरी सपीट मिळविलं नि आम्हांला दोन परोठे व आपण करतो तशी बटाट्याची भाजी आणून दिली. मात्र हे सर्व महाग तर पडतंच, शिवाय चोरून करावं लागतं. एका परोठ्याला एक शिलिंग, म्हणजे जवळ जवळ बारा आणे, भाजीला आठ आणे. काही का असेना. पैसे देऊन का होईना इथं हे पदार्थ मिळाले हे काय कमी आहे ? इतर कुणाला मिळाले नाहीत. माझी मात्र लंडनला पोचेपर्यंत जेवणाची चैन आहे !

शशीच्या पत्रात लिहिल्याप्रमाणं आम्ही १ तारखेला सकाळीं ११ च्या सुमारास सुवेझला पोचलो. किनाऱ्यापासून बोट बरीच लांब उभी राहिली. आम्हांला खाली उतरू दिलं नाहीच. पण त्यामुळं एक नवीन गोष्ट पाहायला मिळाली. डोंगर महंमदाकडं नाही जाऊं शकत; पण महमंद तर जातो ना डोंगराकडे ! तसंच झालं. आम्ही किनाऱ्यावर नाही गेलो तरी किनाऱ्यावरले लोक आमच्याकडं आले. सुवेझ, पोर्टसैद या ठिकाणी चामड्याच्या वस्तू फार चांगल्या करतात. सूट-केसेस, मनी-बॅग्ज, बूट वगैरे वस्तू विकण्यासाठी लोक बोटीखाली आले. वस्तू घेणे व पैसे देणे असा व्यवहार दोरीच्या साहाय्यानं सुरू झाला. हे अरब लोक फार लबाड हं ! वाटेल ती किंमत सांगतात नि हातोहात फसवतात. बोटीवरील एका बाईनं एक पर्स ठरविली. मोड नव्हती म्हणून तिनं पांच पौंडांची नोट दोरीवरून खाली पाठवली. तर त्या अरबानं परत पैसेही नाही पाठवले. पर्सही नाही न् मोडही नाही ! अर्थात त्या बाईचाच हा वेडेपणा होता म्हणा. पर्स घ्यायच्या आधी पैसे कशाला पाठवायचे होते ?

संध्याकाळी सात वाजता सुवेझ बंदराचा निरोप घेऊन आम्ही प्रख्यात सुवेझ कालव्यातून प्रवास सुरू केला. हा कालवा इतर कालव्यांप्रमाणेच आहे. फक्त जास्त खोल नि रुंद. त्याची रुंदी २०० फूट नि खोली पस्तीस फूट. कालव्यातून बोट ताशीं ६-७ मैल वेगानं जाते. पाण्यात ती ३२ फूट म्हणजे तळापासून फक्त तीनच फूट वर राहते. वेगात गेली तर तळाला लागण्याचा संभव. कालव्यामध्ये वन् वे ट्रॅफिक आहे. पलीकडल्या टोकाला पोर्ट-सैद बंदर आहे.

तिथून सुटलेल्या बोटी बाहेर पडायच्या होत्या म्हणून दिवसभर आम्हांला सुवेझ बंदरात अडकून पडावं लागलं.

अंधारात बाहेरचं काहीच दिसत नव्हतं. म्हणून निराशेनं आम्ही लौकरच झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र लौकर उठून काय दिसतं ते पाहण्यासाठी डेकवर येऊन उभे राहिलो. आता आम्ही पोर्टसैदच्या जवळ जवळ यायला लागलो होतो. कालव्याच्या दोन्ही बाजूंना सुंदर डाबरी रस्ते, मधूनच एखादं खजुरीचं झाड, अन् बाकी सगळीकडं उजाड वाळवंट. एक आगगाडी नि काही मोटारीही गेलेल्या दिसल्या. मधेच एखादी झोपडी व तिच्या आवतीभोवती बागडणारी इजिप्शियन मुलं, एखादा उंट अशीही दृश्यं मधूनच दिसली. उंट पाहिल्यावर आपल्या मनात लगेच वाळवंटातून आपण चाललो आहोत हे जाणवतं. अरबस्तान...खरोखर आपला देश सोडून किती दूर आपण आलो ...क्षणभर मनाला हुरहूर वाटली. इतके दिवस आकाश व पाणी पाहून विशालतेचं दर्शन झालं होतं. पण आता घरं, माणसं, उंट पाहून मात्र दूरत्वाची जाणीव व्हायला लागली. हिंदुस्थानपासून किती दूर आलो आपण...

पोर्टसैदला पोहोचेपर्यंत सकाळचे आकरा वाजले. एडनच्या अनुभवावरून आम्ही आता शहाणे झालो होतो. दाराशी उभे राहून पहिला नंबर पटकावण्याची चूक केली नाही. शेवटला नंबरही चालेल. इथंही बोट धक्क्याला लागून उभी राहिली नाही. एक तासानंतर आम्हांला खाली उतरायला मिळालं. बोटीपासून धक्क्यापर्यंत फळ्या टाकून तात्पुरता पूल तयार केला होता. आपल्या चालण्यानं या फळ्या डुगडुग हलतात त्यामुळं मला तरी भीतीच वाटली त्यावरून चालताना.

उतरण्यापूर्वी आम्हांला सूचना देण्यात आली होती की, हमरस्ता सोडून गल्ली-बोळात शिरू नका म्हणून ! बाकी ते बरोबरच होतं. अग कसले हे अरब लोक ! फारच भयंकर माणसं ! त्यांच्या बायका देखील तशाच. नखशिखान्त काळा बुरखा घेतल्यामुळं भीतिदायकच दिसतात. लोक एकंदरीत उर्मट दिसले. एखाद्या वस्तूची किंमत विचारली की, अव्वाच्या सव्वा सांगतात नि कमी करा किंवा नको म्हटलं तर अंगावर ओरडतात. शिव्या द्यायलाही कमी करीत नाहीत. गिऱ्हाईक पटवण्याचा हा इजिप्शियन नमुना औरच आहे. दुसऱ्यांना आलेले

असले अनुभव पाहून आम्ही काही घ्यायचंच नाही असं ठरवून टाकलं. पण पोटोबाची तर सोय करायला हवी होती ! ब्रेकफास्टनंतर काही खाल्लं नव्हतं. एका हॉटेलात गेलो. फारसं मोठं नव्हतं व स्वच्छही नव्हतं. पण तिथले पदार्थ मात्र रुचकर होते. आमच्या पाठोपाठ शंखांच्या माळा विकणारा एक माणूस आत आला व काही वस्तू घेण्याचा आग्रह करायला लागला. नको म्हटल्यावर तो शेजारच्या टेबलाकडं गेला. त्यांनीही नको म्हटल्यावर त्यानं सरळ इंग्रजीत शिव्याच द्यायला सुरवात केली... "This is not India...not Pakistan ! Mind well ! This is Egypt. Port Said...I will cut your throat !"

बरं तर बरं, आम्ही हमरस्त्यावर होतो. गल्ली-बोळात असतो तर काही धडगत नव्हती ! जेवण करून बोटीकडं येत असताना त्याच फेरीवाल्यानं माझी पण पंचाईत आणली. एक शंखांची माळ माझ्यापुढं धरून घ्या घ्या म्हणू लागला तो. मीही नेहमीच्या सवयीप्रमाणं किंमत विचारली अन् त्याच्या तोंडाकडं पाहिलं. अक्षरशः काटा उभा राहिला माझ्या अंगावर ! म्हटलं हा आता भर रस्त्यात भांडण करणार की काय ? पण मी शक्य तितक्या मृदू आवाजात शांतपणं त्याला सांगितलं की, मला काही घ्यायचं नाही. सहज किंमत विचारली; आणि पुढं चालू लागले. त्यानं मग काही गोंधळ केला नाही. असे एकेक नमुने इजिप्शियनांचे !

बोट सुटायला थोडा अवकाश होता व आम्हांला अजून लेसेप्सचा पुतळा पाहायचा होता. धावत पळत आम्ही त्या पुतळ्याचं दर्शन घेऊन आलो. पुतळा भव्य व फार छान आहे. बोट सुटल्यानंतर आम्हांला वाटलं, उगाच एवढी धावपळ केली. कारण तो पुतळा बोटीतूनच अधिक चांगला दिसतो.

बोट सुटल्यावर सुटकेचा निःश्वास टाकला. पोर्टसैदमध्ये त्या इजिप्शियनांच्या सहवासात जीव धोक्यात असल्याप्रमाणंच वाटत होतं. प्रसंगी पोलिसांची मदत घेऊ म्हटलं तर त्यालाही हे लोक दाद देत नाहीत असं दिसलं. या प्रकारांची जाणीव बोटीवरून उतरताना आम्हांला दिली गेली होती. गल्ली-बोळात न शिरण्याची सूचना नव्हती का दिली ? ही परिस्थिती नेहमीच अशी असते का सध्या लढाईचं वारं संचारल्यामुळे आहे, कुणास ठाऊक !

चार वाजता आमच्या बोटीनं इजिप्तचा किनारा सोडला अन् भूमध्य-समुद्रातून आम्ही जाऊ लागलो. या समुद्राला तर शांतसागर असंच म्हणायला हवं, इतका शांत आहे तो. बोट मुळीसुद्धा हल्त नाही. हवाही फार उत्तम आहे. दिवसा स्वच्छ ऊन्ह व रात्री स्वच्छ चादणं. उकाडा नाही. थंडीही नाही. भूगोलात वाचल्याप्रमाणं भूमध्य समुद्रावरची हवा समशीतोष्ण खरोखरच असते. उत्साहदायक हवेमुळंच मजा कारण्यासाठी इंग्लिश, फ्रेंच व अमेरिकन लोक रिव्हिएरा इथं गर्दी करतात. आपले आगाखानही नेहमी इथे मुक्काम करून असतात त्याचं कारण मला आता कळलं.

या उत्साही हवेचा माझ्यावरही परिणाम झालाय. इतरांच्या प्रमाणं मीही खेळात व गप्पात मनसोक्त भाग घेत आहे. रिंग-टेनिस, टेबल-टेनिस यांत थोडा वेळ जातो. पत्ते व गप्पा यांमधे तर खूपच वेळ जातो. तरीपण दिवसातून एखादा तास डेकवर फिरण्याचा व्यायाम घेते. सध्या माझं खाण्याचं तंत्र चांगलं जमलं आहे ना ! त्यामुळं ते पचवायला पाहिजेच. आता मला बोटीवर फिरायची चांगली सवय झाली आहे. मला खुषीत बघून बाळासाहेबांनाही आनंद वाटतो. प्रथम प्रथम सी-सिकनेसमुळं त्यांना माझी काळजी वाटायची. आता मी माझं जेवण केबिनमधे उरकून घेते आणि परत बाळासाहेबांच्या बरोबर डायनिंग हॉल्मधे जाते. तिथं मी जेवण नाही घेत. पण माझ्या वाट-णीचं पुडिंग, आइस्क्रीम, फळे हे मात्र घेते. इतके दिवस मी बोटीवर असूनही बाळासाहेबांना एकट्याला जेवायला जावं लागायचं. पण आता मी त्यांच्या बरोबर जायला लागल्यानं ते फार खुषीत असतात. बोटीवरचं आइस्क्रीम छान असतं. बाळासाहेब आइस्क्रीमचे भोक्ते नाहीत, त्यामुळं मला डब्बल मिळतं ! चैन आहे की नाही ?

इतक्या दिवसांच्या सहवासानं आजकाल बोटीवर सगळेजण खेळीमेळीनं वागत आहेत. त्यामुळं ही बोट म्हणजे एक मोठं घर नि तिच्यावरचे पॅसेंजर्स म्हणजे मजा करण्यासाठी एकत्र आलेली कुटुंबीय मंडळी असं वाटतंय. सुट्टीत नाही का सर्वजण एकत्र जमत ? तसं वाटतंय. सर्वांना एकमेकांची इतकी सवय झालीय की आणखी एखादा महिना बोटीवर रहावं लागलं तरी कंटाळा येणार नाही. प्रथम वाटायचं कसे हे एकतीस दिवस जातील ? त्यातून सिकनेसमुळं वाटायचं,

जिवंतपणी आपण लंडनला पोचलो म्हणजे मिळवलं ! पण आता उलट असं वाटतं की लंडन लौकर आलं नाही तरी चालेल !

आता आमची बोट मार्सेल्सच्या जवळ जवळ आली आहे. पिवळे पिवळे व उजाड डोंगर दिसू लागले आहेत. काही घरंही दिसताहेत. हे सारं पाहायला डेकवर पूर्वीसारखी लोकांची गर्दी झाली आहे. इथं हे फार ! पाण्याशिवाय दुसरं काही दिसायचा अवकाश की लागलीच गर्दी झालीच ! ज्यांच्याजवळ कॅमेरे आहेत ते कॅमेरे सरसावून पुढं होतात. दुर्बीणवाले दुर्बीणीतून पाहून ते दृश्य जवळून पाहण्याचं समाधान मानतात. बाहेरची ही सारी मजा पहायला येण्यासाठी बाळासाहेब एकसारखी मला घाई करताहेत. मलाही बाहेर जायचा मोह अनावर होतोय. मग करू ना आता लिहिणं बंद ?

तुझी
**ताई**

**मार्सेल्स**
**७–५–४९**

प्रिय रत्ना,

काल एवढं घाईघाईनं पत्र पुरं केलं पण आज ते पाठवता आलं नाही. आत्ताच मार्सेल्स पाहून बोटीवर आले नि पाहते तो काय, पोस्टाचे अधिकारी बोटीवरून परत गेलेले. आता कसं टाकणार पत्र ? तुम्ही सर्वजण किती वाट पहात असाल नाही ? पण काय करू ? नाइलाज आहे माझा. त्यांतल्या त्यात एक पळवाट सांगता येईल म्हणा. इथून साधं एअर लेटर पाठवायला दोन शिलिंग सहा पेन्स म्हणजे जवळ जवळ दोन रुपये पडतात. म्हणून बऱ्याच जणांनी इथून पत्रे टाकली नाहीत. आपणही तसंच समजावं झालं.

काल संध्याकाळी जवळ जवळ आठच्या सुमारास आमची बोट धक्क्याला लागली. या वेळी मात्र बोट लांब नाही उभी राहिली. मुंबईसारखी अगदी धक्क्याला चिकटून उभी राहिली. पण रात्र असल्यानं कुणाला उतरू दिलं नाही.

आज सकाळी ब्रेकफास्ट वगैरे आटोपून ९ वाजता खाली उतरलो. ज्यांना मार्सेल्स पहायचं असेल त्यांच्या सोयीसाठी P and O कंपनीनं स्पेशल मोटार बसेस तयार ठेवल्या आहेत. माणशी पाच शिलिंग तिकीट. आम्हांला मार्सेल्स पाहायचं होतं, म्हणून आधीच तिकिटं काढून ठेवली होती. खाली उतरल्यावर लगेच बसमध्ये जाऊन बसलो. बसमध्ये इंग्रजी बोलणारा गाईड होता. हे गाईड लोक फार बडबडे असतात. रस्त्यांची नावे, त्यांचे इतिहास, इमारतींचे इतिहास वगैरे महत्त्वाची व विनमहत्त्वाची इतकी माहिती सांगतात की त्यांतलं आपल्या डोक्यात थोडंच राहतं. या गाईड्सना सर्व माहिती तोंडपाठ असते. सर्वांची माहिती सारखी कारण नंतर इतर बसेसमधल्या लोकांना आम्ही विचारलं तर त्यांच्या गाईडनं नि आमच्या गाईडनं सांगितलेली माहिती तशीच निघाली. मुख्य म्हणजे विनोदही तेच ! मला वाटलं हे सारे गाईड् एकत्र बसून तर पाठांतर करीत नसावेत ना ?

दोनचार तास पुष्कळ हिंडलो. बऱ्याच गोष्टी पाहिल्या. मार्सेल्समधलं मला सर्वांत ज्यास्त आवडलं ते तिथलं ' नोत्रदाम ' ( Notredame ) नावाचं चर्च व तिथं जाण्यासाठी असलेली फनीक्यूलर रेल्वे. आपल्या पुण्याच्या पर्वती-एवढ्या उंच टेकडीवर आहे हे नोत्रदाम. मात्र पर्वतीसारखं पायी नाही चढावं लागत. टेकडीला सरळ उभे दोन रूळ टाकले आहेत. त्यांच्यावरून खोलीच्या आकाराचे दोन लिफ्ट्स खाली-वर येतात जातात. एक पाळणा वर जायला लागला की दुसरा खाली येतो. यातून वर-खाली जाता-येताना फार मजा वाटते. सोबत पाठवलेल्या फोटोवरून या फनीक्यूलर रेल्वेची कल्पना येईल. आपल्या पर्वतीलाही अशी रेल्वे केली तर किती आनंद होईल नाही ? पेशवे पार्कात जशी लहान रेल्वे केली आहे तशी पर्वतीला का करू नये ? कितीतरी वृद्ध स्त्रिया रोज दर्शनाला जायला मिळाल्यानं दुवा देतील ! नोत्रदामच्या टेकडीवरून मार्सेल्स शहराचा देखावा दिसतो. समुद्रात थोड्या अंतरावर असलेला " शॅटोडिफ "चा तुरुंग दिसतो. काउंट ऑफ मॉंटेक्रिस्टो हा सिनेमा पाहिलास ना ? त्यात मॉंटेक्रिस्टोला जिथं ठेवलं होतं तोच हा शॅटोडिफचा तुरुंग. पण हे नोत्रदाम नि हंच बॅक ऑफ नॉत्रडॅम मधलं नॉत्रडॅम एक नाही बरं का. ते नॉत्रडॅम पॅरिसमध्ये आहे. खरंच, पुस्तकात वाचलेल्या किंवा सिनेमात बघितलेल्या गोष्टी

प्रत्यक्षात पाहताना विशेष आनंद होतो. फ्रान्सविषयी आजपर्यंत खूप ऐकलं होतं. पण आज फ्रान्समधलं एक शहर प्रत्यक्ष बघितलं.

मार्सेल्स शहर मला फार आवडलं. कुठं गडबड नाही, धावपळ नाही. सगळ्यांचे कारभार अगदी शांत नि गंभीरपणे चालले होते. लोकही अगदी easy going आहेत. १२–१ वाजता सुद्धा समुद्रकाठी व स्विमिंग टँकमधे कितीतरी लोक पोहोत असतात. माणसं स्वभावानं फार चांगली. कुठं ते पोर्टसैद मधले अरब नि कुठं हे well mannered फ्रेंच लोक.

बसमधून येताना आम्ही मधेच खाली उतरलो व पायी आलो. पायी हिंडल्यानं इकडल्या लोकांचा अधिक जवळून अनुभव आला. आम्हांला कुणाला फ्रेंच भाषेचं एक अक्षरही येत नाही. येताना तुझ्याकडून काही फ्रेंच शब्द शिकून घ्यायला हवे होते असं आता वाटतंय. हॉटेलात गेलो तर काय पाहिजे हे देखील सांगता येईना. एका हॉटेलात एक जण भेटला. त्याला इंग्रजीही येत होतं. त्यानं आम्हांला समजावून सांगितलं की, या भागातली हॉटेल्स फक्त मद्य व जेवण देतात. चहा-कॉफी वगैरे नाही मिळत. चहा-कॉफीची दुकानं वेगळी असतात म्हणे ! तसल्या दुकानांचा पत्ता त्यानं आम्हांला लिहून दिला. त्याचे आभार मानून आम्ही चहा-कॉफीच्या शोधार्थ निघालो. खूप हिंडलो; पण हॉटेल काही सापडलं नाही. आता काही मिळणार नाही असं वाटून निराश झालो. भूक कडकडून लागली होती. एक फळांचं दुकान दिसलं. केळी घ्यावी म्हटलं तर परत फ्रेंच भाषेचा प्रश्न ! फळं विकणारी मुलगी फॉंसा...फॉंसा...म्हणाली. काही कळेना आम्हांला. समोर केळी आहेत, खिशात पैसे आहेत; पण भाषेच्या अडचणीमुळं काही घेता येत नव्हतं. हातातोंडाशी आलेला घास परत जातो की काय असं वाटलं. तितक्यात एक म्हातारी आली. तिला इंग्रजी येत होतं. तिनं आमच्यासाठी केळ्यांचा सौदा पटवून दिला. ६५ फ्रँक देऊन अर्धा पौंड केळी घेतली. डझनावर नाही. इथं वजनावर विकतात. अर्ध्या पौंडात आठ केळी बसली. इथं केळी ऑफ्रिकेहून येतात म्हणे. ऑफ्रिकन पदार्थांविषयी सर्वसाधारण-पणे आपण नाकं मुरडतो. पण ही ऑफ्रिकन केळी मात्र चांगली निघाली. ६५ फ्रँक म्हणजे तू म्हणशील किती ही महाग ? पण फ्रँक म्हणजे आपल्याकडल्या पैशासारखं नाणं आहे. साध्यासुध्या वस्तूही पाचपाचशे हजारहजार फ्रँक देऊन

घ्याव्या लागतात. सुरुवातीला ही शेकड्यांची भाषा विचित्र वाटली. त्या म्हातारीनं आम्हांला चहा-कॉफीच्या हॉटेलपर्यंत पोचविलं. तिथल्या वेट्रेस (इथं सगळीकडं मुलीच!) ला कॉफी पाहिजे म्हणून सांगितलं. फ्रेंचमधे कॅफे म्हणजेच कॉफी असतं वाटतं. वेट्रेस कॅफे कॅफे असं काही तरी म्हणायला लागली. इथली कॉफी देण्याची पद्धत फार छान आहे. प्रत्येक कपावर कॉफीचं छोटंसं फिल्टर. त्यात कॉफी-पावडर नि त्यावर पाणी ओतून आपल्यापुढं आणून ठेवतात. हे लोक दूध घालीत नाहीत. फ्रेंच भाषेशिवाय दूध आणायला कसं सांगायचं? शेवटी आम्ही खाणाखुणा करून "दूध पाहिजे" हे वेट्रेसला सांगू शकलो एकदाचं! कॉफी व दूध दोन्ही छान होतं. शिवाय ती मिळविण्यासाठी इतके परिश्रम करावे लागल्यानं ती अधिकच छान वाटली.

इथल्या लोकांना माझ्या साडी नेसण्याचं फार नवल वाटलं. मी माझी हिरवी जॉर्जेटची साडी नेसले होते. साडी कशी नेसली आहे याचंच त्या लोकांना कोडं वाटायचं. जाणारे-येणारे सगळे जण माझ्याकडं कुतूहलानं पाहात आहेत. आमच्या बरोबरचे एक गृहस्थ म्हणाले... "आज मिसेस धांदरफळेमुळं इथं एखादा तरी मोटार अपघात होणार!" कारण सारे मोटार ड्रायव्हर्स देखील लांब जाईपर्यंत माझ्याकडं वळून वळून पाहात. पायी जाणाऱ्यांचं तरी काय? अर्थात त्यांच्या त्या पाहण्यात कुतूहलाचा भाग होता. कुचेष्टेचा नव्हता. त्यामुळं त्यांच्या अशा पाहण्याचा राग येत नव्हता. एक प्रकारे आपलेपणाच वाटत होता. भाषा येत नसूनही फ्रेंच लोकांविषयी परकेपणा वाटत नाही. हे या लोकांचं वैशिष्ट्य आहे असं मला वाटलं.

इथं ओपन एअर रेस्टराँ फार आहेत. रस्त्याच्या कडेला फूटपाथवर खुर्च्या-टेबलं ठेवलेली असतात, नि हे लोक खुशाल आपले तिथं खातपीत बसलेले असतात. आम्ही मांस खात नाही व दारू पीत नाही याचं या लोकांना फारच आश्चर्य वाटलं. दोन-दोन चार-चार घरं टाकून इथं दारूची दुकानं आहेत. आश्चर्य म्हणजे या साऱ्याच दुकानांना भरपूर गिऱ्हाईक असतं.

मार्सेल्स हे शहर टेकड्यांत वसलेलं आहे. त्यामुळं रस्ते म्हणजे सारखा चढउतार. म्हणूनच काय की इथल्या सायकली रेसच्या सायकलीसारख्या

असतात. एक गोष्ट सांगायची राहिली. इथली रहदारी रस्त्याच्या उजव्या बाजूनं चालते !

एकंदरीत मार्सेल्स शहर नि तिथले लोक आम्हांला फार आवडले. पॅरिसला जाण्यापूर्वी थोडं तरी फ्रेंच शिकून घ्यावं असं आम्ही ठरविलं. म्हणजे थोडं तरी या लोकांशी बोलता येईल. ते आपल्याशी बोलण्याचा प्रयत्न करतात; पण दोघांनाही एकमेकांची भाषा येत नसल्यानं पंचाईत होते. अन् मग नुसतंच हसून पुढं जावं लागतं. अच्छा ... आता हे पत्र इथंच पुरे करते. लंडनला पोचण्यापूर्वी आणखी काही लिहावसं वाटलं तर ते पुढल्या पत्रात...

तुझी
**ताई**

बे ऑफ बिस्के
९-७-४९

प्रिय अप्पा,

मार्सेल्स सोडल्यावर जिब्राल्टरची सामुद्रधुनी पार करून आम्ही भूमध्य समुद्र मागे टाकला व बे ऑफ बिस्केमध्ये प्रवेश केला. बोटीवरल्या अधिकाऱ्यांनी सांगितलं होतं की समुद्र खवळलेला असेल ! कारण तो तिथं नेहमी तसा असतो म्हणे ! माझ्या अंगावर काटा उभा राहिला. खवळलेल्या अरबी समुद्राची आणि त्या सी-सिकनेस्‌ची आठवण होऊन वाटलं, उगाच आपण मार्सेल्स ते लंडन प्रवास बोटीनं करायचं ठरविलं. कारण आमच्या बोटीवरचे बरेचसे लोक मार्सेल्सला उतरून तिथून रेल्वेनं लंडनला रवाना झाले. तसं करण्यानं दोनचार दिवसांच्या प्रवासाची बचत होते. पण मला वाटलं खवळलेल्या बे ऑफ बिस्केला टाळणं हाच मुख्य हेतू असावा त्यात. पण काय असेल ते असो. बे ऑफ बिस्के देखील भूमध्य समुद्रासारखाच शांत दिसतो आहे.

आता मात्र हवेतला फरक जाणवतो आहे. चांगलीच थंडी वाटू लागली आहे. डेकवरची गर्दी कमी होऊन बहुतेक लोक लाउंज नि स्मोकरूममध्ये बसलेले

आढळतात. सगळ्यांना पांघरायला दोन-दोन ब्लँकेट्सही दिली आहेत. इतके दिवस चित्रविचित्र आणि अपुरे कपडे...शॉर्ट पँट ...क्वॉर्टर पँट ...वगैरे लोकांच्या अंगावर दिसत होते. त्यांच्याऐवजी आता व्यवस्थित सूटबूट घालून लोक हिंडताहेत.

इंग्लंडमध्ये हवा विचित्र असते असं पुष्कळदा ऐकलंय. त्याचा नमुना इथं थोडासा मिळाला. कालच झालेली मजा सांगते. रात्री बाराएकचा सुमार असेल. मी नि बाळासाहेब डेकवर गप्पा मारीत बसलो होतो. काय करणार ? आमच्या दोघांच्या केबिन्स निरनिराळ्या असल्यामुळं केबिन मधे जाण्यास आम्ही नाराज असतो. त्यामुळंच एवढी रात्र झाली तरी आमच्या स्वाऱ्या डेकवर गप्पांत रंगून गेल्या होत्या. एक वाजता डेकवरचा एकेक दिवा मालवला जाऊ लागला. ही आम्हांला झोपायला जायची सूचना होती. बाळासाहेबांचा निरोप घेऊन मी केबिनमधे गेले व बर्थवर अंग टाकलं. वीस एक मिनिटं झाली असतील नसतील तोच बोटीनं भोंगा दिला, व मग मिनिटामिनिटाला भोंग्याला सुरुवात झाली. काय झालं ते बघण्यासाठी खिडकी उघडून बाहेर पाहिलं तर काय ? डेकवर - बाहेर – काहीच दिसेना. बोटीवर आदळून होणारा लाटांचा आवाजही भयानक वाटू लागला. मला तर इतकी भीती वाटू लागली की मी डोळे गच्च मिटून घेतले. १५ च मिनिटांपूर्वी आम्ही डेकवर होतो तेव्हा सारं ठीक होतं, मग इतक्यात काय झालं ? बोटीला काही धोका आहे की काय ? बोट बुडणार तर नाही ? बाळासाहेबही दूर राहिले ... नाना तऱ्हेचे विचार मनात थैमान घालू लागले. अशा विचारात असतानाच निद्रादेवींनं आपला अंमल माझ्यावर केव्हा बसवला ते समजलंही नाही.

नेहमीप्रमाणं खिडकीवर टक्टक् आवाज झाला. जागी होऊन खिडकी उघडली अन् बाळासाहेबांना पाहून कळी खुलली. त्यांना रात्रीचा प्रकार सांगितला; तर ते मोठ्यानं हसायलाच लागले. ते म्हणाले– “ वेडीच आहेस अगदी ! त्यात एवढं भिण्यासारखं काय होतं ? आपण केबिनमधे गेल्यावर समुद्रावर एकाएकी खूप धुकं आलं. त्यामुळे तुला डेकवर अंधार दिसला व माणसं जादूनं गुडूप झाल्याचं वाटलं. बोट मिनिटामिनिटाला भोंगे देत होती

त्याचं कारण, आपली बोट कुठून चालली आहे हे इतर बोटींना कळावं. नाही-तर धुक्यात काही न दिसल्यामुळं दुसरी बोट धडक मारण्याचा संभव…"

आतापर्यंत बोटीवरच्या खूप गमती सांगितल्या. पण एक राहिलीच. ती गंमत कसली म्हणा ? एक पीडाच आहे ! ही पीडा म्हणजे माझी केबिन-मेट. ती एक पारशी बाई आहे. दहा-बारा वेळा इंग्लंडला जाऊन आली आहे. तरीपण तिथल्या चांगल्या गोष्टी शिकण्याऐवजी सर्व वाईट तेवढं शिकली आहे. इंग्लंडमधले लोक रात्री झोपताना नाइट ड्रेस घालतात तसा हीही घालते. ते लोक आजारी असल्याशिवाय दिवसा झोपत नाहीत. ही मात्र दिवसाही नाइट ड्रेस घालून तासन् तास अंथरुणात लोळत असते. प्रकृतीला म्हणावं तर काही डंख झालेला नाही. नियमानं संध्याकाळी नट्टापट्टा करून बाहेर पडते व कुणातरी गोऱ्या कातडीच्या ( इंग्लिश नव्हेच …अँग्लोइंडियनच ) माणसाशी गुलगुल गप्पा मारीत बसते. इंग्लिश लोक घरांच्या खिडक्या नेहमी बंद ठेवतात त्याचं कारण थंडी हे असतं. पण या बाईला केबिनची खिडकी बंद ठेवली म्हणजे आपण इंग्लिश लोकांच्या सारखं वागतो असं वाटतं. अरबी समुद्रात इतकं उकडायचं की लोक वाऱ्यासाठी डेकवर बसायचे. रात्रीसुद्धा डेकवर झोपायचे. पण ही विचित्र बाई मात्र आमच्या केबिनची खिडकी काही उघडू द्यायची नाही. तिला ते कमीपणाचं वाटायचं. मी खिडकी उघडायला लागताच ती भांडायला उठायची ! इंडियन लोकांना कसं वागायचं ते कळत नाही वगैरे तिची बडबड या कानानं ऐकायची व त्या कानानं सोडून द्यायची. एकदा मी माझी खिडकी उघडी ठेवून झोपले. तेवढ्यावरून तिनं माझ्याशी बोलणं सोडून दिलं. मला तिचा राग यायचं मुख्य कारण म्हणजे ती दिवसभर नाइट ड्रेस घालून लोळत पडलेली. त्यामुळं बाळासाहेबांना माझ्या केबिनकडं यायला मिळत नाही. इतके लोक मार्सेल्सला उतरून गेले – त्यांच्याऐवजी ही बया जाती तर बरं झालं असतं !

निदान प्रवासाचे हे शेवटले काही दिवस तरी केबिनमधे मोकळेपणानं घालविता आले असते !

तुझी
**ताई**

टिलबरी डॉक्स
१२–७–४९

आज सकाळी सहा वाजता इंग्लंडला येऊन पोचलो. सकाळपासून आमची बोट या टिलबरी बंदरात उभी आहे. खाली उतरायला अजून परवानगी नाही. पासपोर्टवर शिक्के मारणं, सामान उतरविणं वगैरेची सकाळपासून धांदल सुरू आहे. आमचं सारं आटोपल्यावर बोटीवरून हे शेवटलं पत्र लिहायला थोडीशी सवड मिळाली. दुपारचा लंच घेऊन मगच आम्ही खाली उतरू असं वाटतंय.

आता हा एकवीस दिवसांचा लांबचा प्रवास संपला आहे. तुम्हांला वाटत असेल की इतक्या मोठ्या प्रवासानं मी थकून विटून गेले असेन. पण तसं मुळींच नाही. सुरुवातीला म्हणजे एडन येईपर्यंत कधी एकदा संपतो हा प्रवास असं वाटून गेलं होतं. पण आज बोटीवरून उतरायच्या वेळीं वाटतंय, इतक्या लौकर कशाला संपला हा प्रवास ? बोट सोडायच्या विचारानं वाईट वाटतंय. एडननंतर खरोखरच प्रवासात इतकी मजा आली की आज बोट सोडतेवेळीं उदास वाटतंय. तुला आठवतंय ? शाळेला सुट्टी लागली की नगरहून खंडाळ्याला अण्णांच्याकडं आपण जात असू. खंडाळ्याला गेल्यावर पहिले दोन दिवस त्या खेडवळ वातावरणात करमत नसे. पण हळूहळू तिथली झाडं, शेतं, काल्व्यांचे पाट व बंगल्यासमोरची बाग...या गोष्टींत आपण रमून जात असू. सुट्टी संपल्यावर नगरला जायची वेळ आली की मनं जड होऊन खंडाळ्याहून पाय निघत नसे. ही बोट सोडताना तसंच वाटलं.

आजकाल बरेच लोक इंग्लंडला जात येत असल्यामुळं इंग्लंड म्हणजे काही फार लांब नाही अशी कल्पना करून घेऊ नकोस. इंग्लंडला पोचायचं म्हणजे सात समुद्र पार करायचे व तीन खंड ओलांडायचे. खोटं नाही. मोजूनच पहा ...अरबी समुद्र, लाल समुद्र, सुवेझ कालवा, भूमध्य समुद्र, जिब्राल्टरची सामुद्रधुनी, बे ऑफ बिस्के आणि इंग्लिश खाडी ! त्रिखंड प्रवास म्हणजे आशियातून निघून, आफ्रिका ओलांडून अर्ध्या युरोपला वळसा घालून इंग्लंडला येऊन पोचलो. बोटीतून खाली उतरून हॉटेलमध्ये गेल्यावर तुमची

पत्रं तिथं मिळतील. पत्ररूपानं का होईना तुमची भेट होणार, तीही कित्ती दिवसांनी, या कल्पनेनं, व आपण किती लांब आलो या विचारानं कससंच वाटतं आहे. भावनांचा कल्लोळ माजला आहे मनात.

बोटीवरून उतरायची उत्सुकता वाटते ती फक्त तुमची सर्वांची पत्रं वाचायला मिळणार या कल्पनेनं. इथंही बोट तासन् तास धक्क्यावर उभी आहे. तसं परत येताना मुंबईच्या धक्क्यावर जर तासन् तास उभी राहिली तर कसं वाटेल? तुम्ही सारेजण धक्क्यावर वाट पहात उभे असाल...नकोच ते! परत येताना आम्ही आपले विमानानेच येऊ.

पण हे काय? अजून इंग्लंडला आलो नाही तोच परत जायचा काय विचार करते मी?

...बोटीवरचे नोट-पेपर्सही आता संपले. निघायची वेळ झाली. समुद्राच्या वाऱ्याला आता रामराम...

तुझी
**ताई**

१२ ॲबरक्रॉंबी स्क्वेअर
लिव्हरपूल ७
२०–७–४९

प्रिय रत्ना,

याच्या आधीचं पत्र अप्पाला बोटीवरून लिहिलं होतं. त्यानंतर मग लंडनच्या चार दिवसांच्या मुक्कामात हे बघ ते बघ असं करण्यात इतका वेळ गेला की तिथून तुम्हांला कुणाला पत्र लिहायला वेळच मिळाला नाही. फक्त वेळात वेळ काढून सौ. बाईला सुखरूप पोचल्याची तार केली, ती मिळालीच असेल.

असं वाटत होतं की इंग्लंडच्या भूमीवर पाय ठेवताना काही तरी विशेष वाटेल. या विषयावर काव्य करायचं असेल तर एखाद्या कवीला पुष्कळच

लिहिता येईल. पण मला बोट सोडून खाली उतरल्यावर विशेष असं काही वाटलंच नाही. मुख्य म्हणजे वाटायला न् त्यावर विचार करायला फुरसत तरी कुठं होती ? खाली उतरल्यावर लगेच सामान शोधून काढून ते कस्टममधून पार करून घेऊन लंडनची गाडी गाठायची घाई होती. जड सामान परस्पर लिव्हरपूलला पाठविण्याची व्यवस्था करण्यासाठी बाळासाहेब बॅगेजरूमकडं निघून गेले. मी आपली हमालाच्या पाठोपाठ जात होते. दाराशी आल्यावर हमालानं माझ्याकडं वळून मला काही तरी सांगितलं. मी त्याच्याकडं नुस्ती बघतच राहिले. कारण त्याचं एक अक्षरही मला समजलं नाही. माझी गोंधळलेली मुद्रा बघून त्यानं मला तीन-तीनदा तेच ते समजावण्याचा प्रयत्न केला. तो हमाल इंग्लिशच होता, व इंग्रजीतच बोलत होता. पण त्याचं इंग्रजी आपल्याला कळत नाही या जाणिवेनं माझं मन फार खट्टू झालं. त्याचं बोलणं मला समजत नाही हे त्याला कळल्यावर त्यानं मला बरोबर नेऊन थोडासा लांब असलेला दुसरा दरवाजा दाखवला तेव्हा माझ्या लक्षात आलं की स्टेशनात जायला सामानासाठी वेगळा दरवाजा व माणसांसाठी वेगळा दरवाजा आहे. हीच गोष्ट तो मला सांगण्याचा प्रयत्न करीत होता. मी गाडीत बसल्यावर थोड्या वेळानं बाळासाहेब आले. त्यांना मी वरील प्रकार सांगितला. इंग्लंडमधले लोक जर अशा तऱ्हेनं इंग्रजी बोलत असतील तर माझं वर्षभर व्हायचं कसं ? ते म्हणाले, " तुला एवढं घाबरायचं काही कारण नाही. तो हमाल जे बोलला ते कॉकनी इंग्लिश होतं. तसल्या तऱ्हेचं इंग्रजी मुख्यत्वे करून लंडनमधले अशिक्षित व खालच्या दर्जाचे लोकच बोलतात. बाकीचे सगळे लोक जे बोलतात ते समजायला आपल्याला जड जात नाही. कॉकनी इंग्लिश नाही समजलं तरी वाईट वाटून घेण्याचं कारण नाही. बऱ्याच इंग्लिश लोकांनाही ते समजत नाही—" खरं म्हणजे या असल्या कॉकनीला इंग्रजी तरी का म्हणावं हे मला समजत नाही. ती एक स्वतंत्र भाषाच आहे.

आमची गाडी टिल्बरीहून निघाली ती थेट सेंट पॅक्रिअस नावाच्या स्टेशनवर थांबली. स्टेशन उगीच साधे नि खरं म्हणजे भिकारडे दिसत होते. हे कसलं लंडन ? असेल कुठलं तरी दुसरं गाव. त्यामुळे सगळे लोक उतरले तरी मी आपली गाडीतच बसून राहिले. सगळं सामान उतरून झाल्यावर ते बाळासाहेबांच्या लक्षात आलं. मी गाडीतच बसलेली पाहून ते म्हणाले—" हे काय ?

उतर ना आता. लंडन आलं--" पहिल्याच सलामीला लंडनसारख्या मोठ्य शहराविषयी मत चांगलं नाही झालं. भव्य तर नव्हेच पण हे स्टेशन भकास अन् भिकार दिसत होतं. स्टेशनवर आम्हांला न्यायला दादा महाजन व शरद मराठे आले होते. परदेशात आपले असे कुणी तरी भेटले म्हणजे किती आनंद होतो ! इथली घरे, माणसे, रस्ते अगदी गाई सुद्धा आपल्याकडल्यापेक्षा निराळी वाटतात. त्यांना बघून सारखी आपल्याला जाणीव होत राहते की आपण आपल्या देशापासून किती दूर आलो. त्यामुळं या दोन स्नेह्यांना बघून परदेशातही आपले कुणीतरी आहेत म्हणून फार बरे वाटले.

लंडनला पोचल्यावर पहिले दोन दिवस मॉरिस हॉटेलमधे राहिलो. आणि नंतर दोन दिवस वेटिंग हाऊस नावाच्या हॉटेलमधे काढले. आपल्याकडल्या हॉटेल्सपेक्षा इथली हॉटेल्स कितीतरी चांगली आहेत. आम्ही ज्या दोन हॉटेलांतून राहिलो ती लंडनमधली चांगली हॉटेलं होती असं नव्हे. पण तिथल्या खोल्यांतला थाट आम्हांला अगदी राजेशाही वाटला. भिंतीला सुंदर डिझाइनचे वॉल पेपर ... हो इथं आपल्यासारख्या घराच्या भिंतींना रंग देत नाहीत. निरनिराळ्या रंगांचे व डिझाईनचे कागद भिंतींना चिकटवितात ... अगदी पाय बुडेपर्यंत खोलीभर अंथरलेले गालिचे, खिडक्या-दारांना मोटमोठे भारी पडदे ( draw curtains ), चकचकीत पॉलिश असलेले लाकडाचे पलंग, टीपॉय, पलंगांवर मऊ गाद्या, उशा, त्यांवर पांढरे स्वच्छ अभ्रे, ऊबदार दुलया, ब्लँकेट्स, उंच आरशाचे ड्रेसिंग टेबल आणि हे सारं जणू काही कमी म्हणून उंची सॅटिनचे कव्हर असलेले सोफासेट आणि सगळ्यावर कळस म्हणजे पलंगाच्या एका बाजूला एका टीपॉयवर टेलिफोन ! अशा सर्व सोयींनी सुशोभित अशा खोलीत पाय टाकल्यावर आपण एखाद्या राजवाड्यातल्या दालनात प्रवेश करतो आहोत असं वाटतं. इथल्या हॉटेलात एक अडचण आपल्याला पडते ती म्हणजे इथं कपडे अडकवायला खुंट्या नाहीत. इथले लोक कपडे खुंटीला न लावता कपाटात म्हणजेच वॉर्डरोबमधे ठेवतात. प्रत्येक खोलीत वॉर्डरोब असतोच. चांगल्या वॉर्डरोबच्या दाराला मोठा आरसा असतो. मला ही सोय फार आवडली. कपाटातून साडी काढायची नि आरशासमोर उभं राहून नेसायची. किती चांगलं वाटतं अशा तऱ्हेनं कपडे करायला ?

प्रत्येक बेडरूममधे थंडीच्या दिवसांत वापरण्यासाठी फायरप्लेस असतो.सध्या इथं उन्हाळा असल्यानं फायरप्लेस पेटलेला नाही. थंडीच्या दिवसांत कोळसे पेटतील.

बहुतेक सर्व हॉटेलांतून बेड अँड ब्रेकफास्टचे दर असतात. म्हणजे, रात्री हॉटेलात झोपायचं व सकाळी उठून ब्रेकफास्ट करून निघून जायचं. मात्र याचा अर्थ न्याहारी झाल्यावर गेलंच पाहिजे असं नाही. वाटेल तितके दिवस हॉटेलात राहता येतं. मात्र हॉटेल फक्त झोपण्याची नि न्याहारीची सोय करतं. पुष्कळशा हॉटेलांतून तर जेवणाची सोयच नाही. ही पद्धत गिऱ्हाइकांच्या दृष्टीने फार सोयीची आहे. सकाळी न्याहारी करून बाहेर पडायचं, लंचच्या वेळी जिथं असू तिथं लंच घ्यायचा. लांब कुठंतरी कामासाठी गेल्यावर माणूस जेवण्यासाठी म्हणून हॉटेलमधे कसा येणार ? किती खर्चाचं होईल ते ? म्हणून बेड अँड ब्रेकफास्टची पद्धत फार चांगली आहे. नाही का ?

इथल्या सगळ्या साहेबी पद्धतीची माहिती व्हायला थोडा वेळ लागतोच. टिप देण्याची पद्धत अगदी साधी पण त्याची देखील नीट माहिती होऊन सवय होईपर्यंत नवखा माणूस बुजूनच जातो. हॉटेलात साधा चहा घेतला तरी टिप, टॅक्सीतनं उतरलं की ड्रायव्हरला टिप, हमालानं सामान जरा इकडलं तिकडं केलं की त्याची हमाली व वर टिप, इतकंच काय, पण न्हाव्याकडं दाढी केली तर त्याला देखील टिप ! कुणीचीशी कविता आहे ना ! टिप गडे टिप... ! ती मला इथं सारखी आठवते आहे ! ती कविता लिहिणारे कवी इंग्लंडमधे गेले होते की काय कुणास ठाऊक ! छे... त्या कवितेतल्या टिपेचा इथल्या टिपेशी संबंध नाही... ! टिप गडे टिप... !

अर्थात टिप द्यायची कुणी सक्ती करीत नाही किंवा कुणी मागतही नाही. पण जर टिप दिली नाही तर टिप घेणारा व त्याच्या आजूबाजूचे लोक अशा काही नजरेनं आपल्याकडं बघतात की आपल्या वागण्यात कुठंतरी चुकलं याची आपल्याला चांगलीच जाणीव होते. असा प्रकार एकदोनदा झाल्यानंतर नवखा माणूस आपोआपच टिप द्यायला सुरुवात करतो ! टिप किती द्यायची हे देखील साधारणपणे ठरलेलं आहे. लंच किंवा डिनर घेतलं तर माणशी सहा पेन्स आणि मोठ्या हॉटेलात माणशी एक शिलिंग देण्याची पद्धत आहे. टॅक्सी-वाल्यांना साधारणपणे शिलिंगामागे तीन पेन्स एवढी टिप दिल्यास पुरते.

इथ बहुतेक लोक दुपारचा लंच बाहेरच घेतात. रोजच्या रोज ज्यांना टिपचा खर्च परवडत नाही अशा लोकांसाठी इथं काही हॉटेलं अशी आहेत की जिथं वेटर्सच नाहीत. लांब लांब काउंटर्सच्या मागे खाण्यापिण्याचे पदार्थ ठेवलेले असतात ते पैसे देऊन स्वतः घ्यायचे व स्वतःच रिकामं टेबल पाहून तिथं बसून खायचे. या पद्धतीला Self Service म्हणतात.

नुसत्या टिपवर इतकं लिहिलं हे वाचून तुला कंटाळा तर आला नाही ना ? पण टिप हा इथल्या वागण्यातला एक लहानसा प्रकार आहे. इथल्या लोकांच्या बोलण्यात, वागण्यात इतकी वैशिष्ट्यं आहेत की त्या सगळ्यांची सविस्तर माहिती सांगायची झाली तर एक मोठा ग्रंथ होईल. चारचौघांत बोलायच्या, वागायच्या मॅनर्स तर फार ! मॅनर्सचं इथं प्रस्थ आहे. Thank you, Please, Sorry, Excuse me वगैरे...हे शब्द किती वेळा म्हणावे लागतात ? सारखा या शब्दांचा वापर करावाच लागतो. दिवसातून हे शब्द जितक्या वेळा वापरतात तितक्या वेळा जर देवाचं नाव घेतलं तर किती पुण्य लागेल !

इथल्या मॅनर्सची थोडी कल्पना देते. समज या कार्यक्रमात मी नि बाळासाहेब दोघेजण आहोत. बाहेर पडायचं ठरल्यावर बाळासाहेबांनी उठून दार उघडायचं, मी आधी बाहेर पडायचं आणि माझ्यासाठी दार उघडल्याबद्दल Thank you म्हणायचं. इथं एक गोष्ट लक्षात धरायची की इथली दारं नेहमी बंद असतात. आत येताना व बाहेर जाताना तेवढी उघडायची ! नंतर बाळासाहेबांनी माझ्या मागून येऊन खोलीचं दार लावायचं. पुन्हा मुख्य दाराजवळ त्यांनीच चटकन् पुढं होऊन दार उघडायचं. पुन्हा मी आधी Thank you म्हणायचं. बाळासाहेबांनीच ही कसरत का करायची हा तुला प्रश्न पडेल. पण इथं स्त्रियांना मानाचं स्थान असतं नि बरोबरच्या स्त्रीसाठी घराची, टॅक्सीची दारं उघडणं, लावणं, किंवा बसण्यासाठी खुर्ची पुढं करणं, मागे घेणं या सगळ्या गोष्टी पुरुषांनी करायच्या असतात. हा इथला स्त्री-दाक्षिण्याचा प्रघात हळूहळू आपल्याकडेही पसरू लागला आहे. पण थोड्या प्रमाणात. असो.

टॅक्सीतून खाली उतरताना स्त्रीला कुणीतरी दार उघडून हात दिल्याशिवाय तिनं खाली उतरायचं नाही. असं दुसऱ्याचा हात धरून खाली उतरताना विचित्र

वाटतं. विशेष म्हणजे बरोबर कुणी नसला तर टॅक्सी-ड्रायव्हरच चटकन् दार उघडून उतरण्यासाठी हात देतो. आणि आपल्याला त्याचा हात धरून खाली उतरावं लागतं. म्हणूनच मला वाटतं इथं बायका पातळ कापडाचे हातमोजे घालीत असाव्यात !

नुसतं Thank you व Please म्हणूनच भागत नाही तर त्याच्या जोडीला Sorry व Excuse me ही बऱ्याच वेळा म्हणावं लागतं. चालताना कुणाचा नुसता थोडा जरी धक्का लागला तरी तो Sorry म्हणतो. टॅक्सी ड्रायव्हरकडे मोड नसली की तो Sorry म्हणतो. हॉटेलात आपल्याला पाहिजे, ती वस्तू नसली की वेट्रेस Sorry होते. तसंच दरवाज्यात कुणी उभं असलं तर त्याला ओलांडून जाताना Excuse me म्हणायचं. त्यानं So sorry म्हणून बाजूला व्हायचं. टेबलावर आपण हात ठेवून बसलो की वेट्रेसनं Excuse me म्हणून सूचना द्यायची व आपण Sorry व्हायचं !

सर्वसाधारणपणे अनोळखी माणसाशी बोलण्याची सुरुवात Excuse me नेच होते.

अशा बोलण्यात नम्रता किती असेल असा तुला प्रश्न पडेल. खरी नम्रता असो वा नसो, पण अशा तऱ्हेचं वागणं व बोलणं इथल्या वातावरणाला साजेसं वाटतं. इतकं की एखादे वेळी कुणी Thank you, Excuse me म्हणायला विसरला तर तेच फार चमत्कारिक वाटतं !

हे काय ! मी एवढ्याशा मुद्द्यावर किती भरकटत चालले आहे ? खरं पाहिलं असता आम्ही लंडनमधे काय काय पाहिलं ते मला या पत्रात लिहायचं होतं. पण आता हेच इतकं लिहिलंय की आता पुढं लंडनचं वर्णन करायचं म्हटलं तर पत्र किती मोठं होईल याची कल्पना कर.

आज फक्त लंडनमधली माणसं व त्यांच्या वागण्याची पुसट ओळख करून दिली मी. आता लिहिण्याचा कंटाळा आलाय. Excuse me...

तुझी
**ताई**

१३ ॲबरक्रॉंबी स्क्वेअर
लिव्हरपूल ७
२२-७-४९

प्रिय अण्णा,

आत्ता बरोबर सहा वाजले आहेत. आज बरोबर महिन्यापूर्वी बोटीनं, तुमचा निरोप घेऊन निघालो. हिंदुस्थानचा किनारा सोडून या किनाऱ्याला लागलो. जाणारा प्रत्येक दिवस विरहाचा काळ कमी करून भेटीचा योग दिवसा-दिवसांनी जवळ आणीत आहे. मीच नाही; पण इथं आलेला प्रत्येक माणूस आल्यापासून जायची भाषा बोलतो. काहीजण तर दोन-तीन वर्षांनी परत जाणार आहेत पण आतापासून केव्हा परत जायचं, कसं जायचं याचे बेत आखीत आहेत. प्रतिपक्षानं भली मोठी धावसंख्या केल्यावर आपला संघ आता चारशे एकोणीस राहिले... अठरा ... सतरा ... असं उलटं मोजीत असतो. त्याप्रमाणं वाटतं आहे मला. याचा अर्थ, इंग्लंडमधे राहण्याचा कंटाळा येतो असा मात्र नव्हे हं. घरी परत जायची मनोवृत्ती बोर्डिंगात राहणाऱ्या मुलांसारखी असते. सुट्टी लागते कधी अन् आपण घरी जातो कधी असं त्यांना नाही का वाटत ? ही उपमा या आमच्या वृत्तीला लागू पडते. इथं पुष्कळजण शिकण्यासाठीच आलेले असतात. त्यामुळं कधी आपला कोर्स पुरा होतो असं प्रत्येकाला होऊन जातं.

मागच्या पत्रात मी लंडनचं वर्णन पुढील पत्रात करण्याचं आश्वासन देऊन Excuse me नं पत्र संपवलं होतं. मागल्या पत्रात मी काय लिहिलं हे लक्षात आहे की नाही माझ्या ?

लंडनला आल्यावर बाळासाहेबांचा एक दिवस हायकमिशनरला वर्दी देण्यात गेला. लिव्हरपूलला जायची व्यवस्था करणं वगैरे गोष्टी करण्यात इंडिया हाऊस-मधे गेला. बाकीचे तीन दिवस आम्ही भटकण्यात घालवले. लंडन हे इतकं अवाढव्य शहर आहे आणि त्यात पाहण्यासारख्या इतक्या गोष्टी आहेत की, तीन दिवसांचा अवधी फारच अपुरा. त्यामुळं फक्त ठळक ठळक गोष्टीच नजरे-खालून घालता आल्या. कारण असं पहा, ब्रिटिश म्यूझियम एकच पाहायला

आठ दिवस पुरत नाहीत. त्यामुळं म्यूझियमच्या वाटेला आम्ही गेलोच नाही. म्यूझियमला काय पाहायचं ? प्रत्येक शहरात आहेतच ना ! थोडंसं ... फारच म्हटलं...प्रचंड...अगदी फर्स्टक्लास असेल ब्रिटिश म्यूझियम ! ते पाहण्याची तितकीशी उत्सुकता वाटली नाही. ज्या ठिकाणांची नावं नेहमी हिंदुस्थानात कानांवरून जायची ती ठिकाणं मात्र पाहण्याची उत्सुकता होती. त्याप्रमाणं बकिंमहॅम पॅलेस, टेन् डाऊनिंग स्ट्रीट, वेस्ट मिन्स्टर, पिकॅडिली सर्कस, वॉटर्लूब्रीज, शरलॉक होम्स, सेक्स्टन ब्लेक यांच्या बेकर स्ट्रीट वगैरे ठिकाणी आम्ही हिंडलो.

बकिंगहॅम पॅलेस बघून माझी फार निराशा झाली. इंग्लंडसारख्या देशाच्या राजाचा राजवाडा फार भव्य व नयनमनोहर असेल अशी कल्पना होती. पण तसं काही नाही. लंडनमधल्या धुरानं काळवंडलेल्या इतर घरांसारखाच हा राजवाडाही काळा पडला आहे. त्यामुळेच काय की तो फोटोमधे तेवढा चांगला दिसतो. मला तर हा बकिंगहॅम पॅलेस आहे हे खरंच वाटेना. तिथले गार्डस् मात्र हा राजवाडा आहे याची खात्री पटवून देतात. राजवाड्यापेक्षा त्यांचे पोशाख बघण्यासारखे आहेत. बहुतेक लोक ह्या गार्डस्ना बघण्यासाठीच गर्दी करतात. त्यांचा तो लाल नि सोनेरी कोट, रुबाबदार उंच टोपी, ..घोड्यावर बसण्याची ऐट हे सारं बघण्यासारखं आहेच. या सर्वांपेक्षा मला जर काही विशेष वाटलं असेल तर तो म्हणजे त्या गार्ड्स लोकांचा स्थित-प्रज्ञासारखा चेहरा ! इतके लोक सारखे येत-जात असतात नि त्यांच्याकडे कुतूहलाने पाहात असतात. काही जण तर त्यांना ऐकू येईल इतक्या मोठ्या आवाजात त्यांच्या पोशाखाची, घोड्याची, रुबाबाची चर्चा करीत असतात. पण हे गार्डस् मात्र तोंडावरची सुरकुतीही न हालवता अंतराळात दृष्टी लावून तासन्तास घोड्यावर ताठ बसलेले ! एखाद्या झाडासारखे !

बकिंगहॅम पॅलेससारखाच दहा डाऊनिंग स्ट्रीट पाहतानाही विरस होतो. तिथल्या आजूबाजूच्या घरांच्या सारखंच हेही एक घर आहे झालं ! फक्त दारावरचा पितळेचा दहा हा आकडा घासून पुसून चकचकीत ठेवलेला दिसतो. इंग्लंडच्या मुख्य प्रधानांचं हे घर. याची जाणीव त्या घरासमोरच्या एका बॉबी (Police) मुळं काय ती होते. या व्यतिरिक्त त्या घरासमोर नेहमी दहावीस तरी बघे असतात. हे आणखी एक वैशिष्ट्य !

वेस्टमिन्स्टर ॲवे हे एक चर्च आहे. याला महत्त्व येण्याचं कारण म्हणजे इंग्लंडच्या राजांना इथल्याच एका दालनात राज्याभिषेक होतो. राजघराण्यातील व अमीर-उमराव वगैरे मोठ्या घराण्यांतील लोकांची लग्नेही इथंच होतात व नामवंत लोकांना इथंच पुरण्यात येतं. इथं पुरलेल्या प्रत्येक माणसाची नुसती सविस्तर माहिती करून घेतली तरी इंग्लंडचा सांस्कृतिक, वाङ्मयीन व राजकीय इतिहास संपूर्णपणे कळेल !

राजघराण्यातील लोकांची थडगी इथं आहेत. त्याचप्रमाणे एडिसन, चार्लस, डिकन्स वगैरेंसारख्या लेखक-शास्त्रज्ञांचीही थडगी आहेत. ड्यूक ऑफ वेलिंग्टन-सारख्या योद्ध्यालाही इथंच चिरविश्रांती घ्यायला ठेवलं आहे. इंग्लंडमधे आत्तापर्यंत इतकी प्रसिद्ध माणसं होऊन गेली आहेत की, या वेस्टमिन्स्टरच्या जागेत नुसती दाटी होऊन गेली आहे. इतकी की, कुठूनही चालताना कुठल्या तरी प्रसिद्ध व्यक्तीच्या थडग्यावरून आपण चालत असतो ! राजघराण्यातल्या व्यक्तींची थडगी जिथं आहेत त्याला रॉयल चॅपल असं म्हणतात. इथं पंचम जॉर्ज बादशहाचं थडगं आम्ही बघितलं. त्याच्या शेजारी मोकळी जागा ठेवली आहे. गाईडला विचारल्यावर तो म्हणाला की क्वीन मेरी मेल्यावर तिला इथं पुरणार आहेत ! जागेचं रिझर्वेशन तर फार छान होत !

इथल्याच एका दालनात इंग्लंडच्या राजाला राज्याभिषेक होतो हे मघाशी सांगितलंच. ज्या खुर्चीवर बसून त्याला राज्याभिषेक करतात ती खुर्ची जरा ओबडधोबडच आहे. त्या खुर्चीच्या खाली एक खडबडीत दगड आहे, तो तिथं का ठेवला आहे असं विचारल्यावर कळलं की त्यापाठीमागं थोडा इतिहास आहे. ज्या वेळी इंग्लंडचा राजा स्वतःला स्कॉटलंडचाही राजा म्हणवून घेऊ लागला. तेव्हा हा दगड स्कॉटलंडमधून आणून या खुर्चीखाली ठेवला गेला. त्यापूर्वीचे स्कॉटलंडचे राजे म्हणे या दगडावर बसून राज्याभिषेक करवून घेत असत ! दगड लेकाचे !

वेस्ट मिन्स्टर ॲवेमध्ये आणखी पाहण्यासारखं पुष्कळच आहे. पण तिथंही शेकडो लोकांना पुरलं आहे हे कळल्यावर व चालताना देखील आपण थडग्यां-वरून चालतो आहोत या भयानक जाणीवेमुळं माझं तिकडं जाण्यात लक्ष लागेना. केव्हा एकदा या स्मशानातून बाहेर पडते असं मला झालं होतं.

त्यामुळं पिकॅडिली सर्कसच्या जिवंत नि रसरशीत वातावरणात जायला मन उत्सुक होतं. तिथं गेल्यावर मनाला अगदी उल्हास वाटला.

पिकॅडिली सर्कसला आम्ही जाऊन पोचलो तेव्हा वेळ होती संध्याकाळची. पिकॅडिली सर्कस नि तिथं येऊन मिळणारे सारे रस्ते मोटारींनी अगदी फुलून गेले होते. इतक्या मोटारी, बसेस, टॅक्सीज जात-येत होत्या पण हॉर्नचा गोंगाट काही ऐकू येत नव्हता. मोटारी हॉर्न न वाजविता जात असलेल्या पाहून एखादा मूक चित्रपट तर आपण पाहात नाही ना असं सारखं वाटत होतं! फूटपाथवर पादचाऱ्यांचीही खूप गर्दी होती. रस्ता ओलांडायला मोटारींच्या सारख्या रहदारीमुळं अजिबात जागा नव्हती. म्हणूनच इथं रस्ते ओलांडण्यासाठी जमिनीखालून वाट काढलेली आहे. या व्यवस्थेमुळं मनस्वी वाहतूक असताना देखील पायी चालणाऱ्यांना दुसऱ्या बाजूस विनधोकपणे जातां येतं. मुंबईला देखील चर्चगेटजवळ संध्याकाळच्या वेळी किती गर्दी असते; पायी चालणाऱ्यांचे किती हाल होतात मुंबईला! पिकॅडिली सर्कससारखा मुंबईलाही भुयारी रस्ता केल्यास किती बरं होईल; नाही का? [ असा रस्ता आता आहे ].

हे इंग्लिश लोक सर्व ठिकाणी अतिशय शिस्तीनं वागतात. एवढा ट्रॅफिक सुरू असतो पण पोलिसची जरूर लागत नाही. रस्त्यावर कोणी जरी नसलं तरी मोटारड्रायव्हर सिग्नलची वाट पाहात उभा राहील. तसा पुढे नाही जायचा. नाहीतर आपल्याकडले लोक! वन्वे ट्रॅफिक जरी असला तरी पोलिस नाही असं बघून तशीच सायकल मारतील. तू म्हणशील—'चार दिवस नाही झाले इंग्लंडला जाऊन तर ही लागली त्यांची कड घ्यायला.' माझा तसा उद्देश नाही. पण इथल्या लोकांना खरोखरच इतका Civic Sense आहे की तो पाहून आपण आश्चर्यचकित झाल्यावाचून रहात नाही. आणि मन इथल्या लोकांची नि आपल्या लोकांची तुलना करू लागतं. अच्छा. आता पुरे करते. अजून शरद, शशी, अण्णा, यांना उत्तरं लिहायची आहेत. बराच मजकूर तुझ्याच पत्रात लिहिला. आता त्यांना काय लिहावं हा प्रश्न पडला आहे.

इथं आम्ही बरेच फोटो घेतले. अजून डेव्हलप करायचे आहेत. चिन्मय-जगत्' वगैरे ठिकाणी पाठवावे. बाईच्या प्रकृतीस जपत जावे. शशीशी भांडू नये. अप्पाला उलट बोलू नये. माझी व बाळासाहेबांची प्रकृती ठीक आहे.

आणखी काय लिहू? बिनतिकिटाचं पाकिट घेऊन त्याला चौदा आण्यांचं तिकिट व एअर मेलचं लेबल लावावं आणि मला पत्राचं उत्तर पाठवावं. म्हणजे खूप लिहिता येतं.

तुझी

**ताई**

१३, ॲबरक्रॉंबी स्क्वेअर
लिव्हरपूल ७
२४-७-४९

ती. अण्णासाहेब यांस, सा. न.

आमच्या बोटीनं तुमच्या सर्वांचा निरोप घेतला तेव्हा तुमची मुलगी इंग्लंडला जाते आहे म्हणून तुम्हांला थोडा तरी आनंद वाटत होता. पण माझ्या मनाची फार विचित्र स्थिती झाली होती. तुम्ही सर्वजण बोट सोडून खाली उतरू लागलात तेव्हा मला वाटलं होतं—काही नको इंग्लंडला जायला. आपणही यांच्याबरोबर खाली उतरून जावं. अर्थात हे विचार मनात आले तरी त्या घटकेला ते कृतीत उतरवणं शक्य नव्हतं. म्हणून मी काही न बोलता कठड्याला टेकून तुमच्याकडं पाहात उभी राहिले. आणि मला तुमच्यापासून दूर, सात हजार मैल अंतरावर त्या बोटीनं आणून सोडलं. आम्हा मुलांच्या शिक्षणासाठी तुम्ही खूप कष्ट सोसताहात. मी खात्रीनं सांगते, की आज नाही उद्या, तुमच्या या कष्टांचं सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही... इतरांनी तुम्हांला डिसॲपॉइंट केलं असं वाटू देऊ नका. ते त्यांच्याकडून प्रयत्न करीतच असतात. नाही येत एखाद्याला यश, त्याला काय करायचं! अण्णा, मी खरंच सांगते, हल्लीची शिक्षणव्यवस्थाच इतकी विचित्र झाली आहे की अगदी स्कॉलर मुलं सोडली तर बाकीची मुलं कोणत्या वेळी कुठल्या पारड्यात टाकली जातील हे काही सांगता येत नाही. काय करायचं! घरोघरी असंच आहे. मध्यंतरी तुम्ही जेवण सोडलं होतं त्यामुळं तुम्हांला काय एनर्जी वाटत होती सांगता येत नाही.

पण आम्हांला मात्र तुमची प्रकृती खालावलेली अन् चेहरा निस्तेज दिसत होता. अन्न सोडून नुसत्या फळांवर रहायला सारं व्यवस्थित पाहिजे. महात्माजी उपास करीत, पण त्यांचं सारं किती व्यवस्थित होतं. ठराविक वेळी ठराविक फळं, अमुक वेळी अमुक इतकं दूध, त्यामुळं उपास केल्याचा सेंट परसेंट फायदा त्यांना मिळे.

तुम्हांला खेडेगावात काय मिळणार आहे ? नुसते दाणे नि ताक पिऊन ... म्हणून म्हणते, हे असले प्रयोग ब्रँचला असताना करू नका. तुम्हांला आता नोकरीचा कंटाळा आला आहे ना ? मग खरंच करू नका नोकरी. तुम्ही मला मुलासारखं वाढवलं आहे ना ! मग मुलासारखीच, हिंदुस्थानात परत आल्यावर सगळी जबाबदारी मी घेईन ...

इथं येताना खूप आशा होती की मी इथं काही तरी विशेष शिकेन, एवढ्या लांब आल्यासारखं काहीतरी फायदा करून घेईन, पण डिग्री नाहीच, नुसता डिप्लोमा तरी घेता येईल की नाही हे सांगता येत नाही. लंडनला रहायचं असतं तर मला पुष्कळ शिकता आलं असतं. लिव्हरपूलला तशी सोय नाही. एक वर्षात पुरा होणारा एखादा कोर्स अजून मला कळलेला नाही. शिवाय एक वर्षभर इथंच राहू असंही वाटत नाही. त्यामुळं काय करावं सुचत नाही. लवकरच इथल्या ब्रिटिश कौन्सिलची मीटिंग आहे. तिला आम्ही जाणार आहोत; ओळखी होतील. परदेशाहून आलेल्या लोकांना या संस्थेचा फार उपयोग होतो. नवीन येणाऱ्या माणसाला जी काय माहिती लागेल ती इथं मिळते.

खरंच, आम्ही लंडनला असतो तर फार छान झालं असतं. लंडनमधले चार दिवस फार मजेत गेले. मुख्य म्हणजे खाण्याची फार चंगळ झाली. तिथं असलेल्या बहुतेक सर्व इंडियन रेस्टॉरंटस्‌मध्ये आम्ही जाऊन आलो. चार दिवसांत बरंच काही पाहिलं. इथली अंडरग्राऊंड रेल्वे फारच वाखाणण्यासारखी आहे. जमिनीखाली पन्नास-साठ फूट; दर दोन मिनिटांला गाड्या जात असतात. काही ठिकाणी डबल ट्यूब्ज आहेत. पन्नास-साठ फुटांवरून एक, आणि त्याच्या खाली पन्नास-साठ फुटांवरून दुसरी गाडी जाते. टेम्स नदीच्या खालूनही ट्यूब नेली आहे. खाली जायला जिनेसुद्धा फार छान आहेत. आपण नुसतं पायरीवर उभं रहायचं, आपोआप खाली जातो; तसंच आपोआप वरही

येतो. गाडी उभी राहिली की आपोआप दार उघडतं. आत जाऊन बसलं की दारही आपोआप बंद होतं.

पण या सगळ्यापेक्षा इंग्लिश माणूस हाच खरा पाहण्यासारखा आहे! I hate English Empire, but I like English men, असं महात्माजी का म्हणत होते हे इंग्लंडला येऊन इंग्लंडमधील इंग्लिश माणूस पाहिल्याशिवाय कळत नाही.

लंडनला चार दिवस राहून लिव्हरपूलला आल्यावर कसंतरीच वाटलं. लंडनच्या पुढं लिव्हरपूल अगदीच फिकं. त्यामुळं असं वाटलं, आपण लंडनला न राहता सरळ लिव्हरपूललाच आलो असतो तर बरं झालं असतं. लिव्हरपूलची हवा लंडनपेक्षा थंड आहे. इथं सध्या उन्हाळा सुरू आहे, तरीही साठसत्तर टेंपरेचर असतं. आपल्याकडच्या थंडीपेक्षाही इथल्या उन्हाळ्यात आम्हांला जास्त थंडी वाजते. मग हिवाळ्यात काय होईल सांगता येत नाही. इथं सध्या रात्री दहा वाजता सूर्य मावळतो. हिवाळ्यात म्हणे सूर्य दुपारी दोनलाच मावळतो. सध्या समर असल्यामुळे सगळीकडं हिरवंगार आहे. हिवाळ्यात झाडांच्या नुसत्या काटक्या उभ्या राहतात. पानसुद्धा दृष्टीस पडत नाही. म्हणूनच इंग्लिश माणूस Spring Summer, पानं, फुलं, यांचं फार कौतुक करतो. या गोष्टी त्याला वर्षातून थोडेच दिवस दिसतात. अर्थात समर असला तरी ऊन्ह रोज पडेलच असंही नाही! घड्याळात पाहिल्याशिवाय किती वाजले हे कळतच नाही. दुपारचे तीन वाजले तरी सकाळचे सात वाजल्यासारखं वाटतं. इथलं अगदी कडक ऊन म्हणजे आपल्याकडील सकाळच्या कोवळ्या उन्हासारखं.

इथं आम्ही लॅंडलेडीकडं रहात आहोत. बोटीत बॅगेजरूममधे ठेवलेले सामान अजून आम्हांला मिळालं नाही म्हणून मी घरी काही करीत नाही. लॅंडलेडीकडंच जेवतो. आठला ब्रेकफास्ट, एकला लंच, सहाला डिनर, आणि रात्री दहानंतर सपर असं दिवसातून चार वेळा खातो. या बाईकडं आधीचेही बरेच हिंदी स्टुडंटस् आहेत. त्यामुळं ती आपल्यासारखी भाजी वगैरे करून देते, मला दिवसभर काहीच उद्योग नसल्यामुळं कसंतरीच वाटतं. सकाळी साडेआठला बाळासाहेब फॅक्टरीत जातात ते साडेपाचला परत येतात. काल संध्याकाळी जरा ऊन पडलं होतं. म्हणून आम्ही सर्वजण बोटिंगला गेलो होतो. रात्री दहा वाजता

परत आलो तरी दिवस होताच ! आज मात्र कुठं जाऊ नये असं वाटतंय. बाहेर अंधारून आलंय. सारखा पाऊस पडतो आहे. खूप थंडीही वाजते आहे. इथं जोरात पाऊस कधीच पडत नाही. सारखी झिम्‌झिम् सुरू असते. लंडन-पेक्षाही इथं एकसारखा पाऊस पडत असतो.

"पोटाचे आरोग्य" एकदा वाचून झालं. हळूहळू आणखी काही आसनं जमली तर करणार आहे. इथं व्यायाम केला तरच ठीक. नाहीतर माणूस फार लठ्ठ होतो. ह्यांचा गद्रे नावाचा एक मित्र आहे. त्याचं पन्नास पौंड वजन वाढलं म्हणे, इथं येऊन ! इथल्या हवेला भूक फार लागते. आणि खाण्यात बटाट्याचे प्रमाण फार असते; म्हणून माणूस लठ्ठ होतो. उन्हाळ्यामधे हा देश फारच चांगला. फक्त आपल्या माणसांची उणीव भासते एवढंच काय ते ... भाऊसाहेब, कुसूम हे लोक बोटीवर पोचवायला आले असते तर फार बरं झालं असतं. कुसूमची उणीव मात्र मला पदोपदी जाणवते. तुम्हांला दोन मुली होत्या आता एक आहे. मुलांना दोन बहिणी होत्या आता एक आहे. मला मात्र एकच बहीण होती. तीही नाहीशी झाली...नाहीतर आज एका बहिणीखेरीज या जगामध्ये मला कशाचीच उणीव नाही. इतके प्रेमळ आईवडील आणि भाऊ फारच थोड्यांच्या वाट्याला येतात. क्षुल्लक कारणावरून कधी कधी भांडणं होतात पण ती तेवढ्यापुरतीच. असल्या थोड्याशा भांडणाखेरीज मजा नाही. तुम्ही पुण्याला केव्हा जाणार आहात ? गेल्यावर तुमचा आणि बाईंचा एक फोटो काढून मला जरूर पाठवा. प्रकृतीस जपावे. खाण्याचे हाल करू नयेत. आमची काळजी करू नये.

तुमची,

**ताई**

**१३ ॲबरक्रॉंबी स्क्वेअर**

**लिव्हरपूल ७**

**२८–७–४९**

प्रिय रत्ना, शशी,

कितीतरी वर्षे झाली तुमची पत्रं मिळाल्याला ! तीच ती जुनी पत्रं कितीवेळा वाचायची ? तोंडपाठ आहे तुमचं. म्हणा, तुमचा तरी काय दोष ? माझा नवा

पत्ता मिळाल्याशिवाय कसं पाठवायचं पत्र ? बाळासाहेबांच्या फॅक्टरीचा पत्ता दिला होता ना शरदच्या पत्रात ? या गोष्टीला निदान दहा-बारा दिवस तरी लागतील हे सारं माहीत असूनही मी रोज पोस्टमन येऊन पत्र देऊन गेला की त्यांत माझं काही पत्र आहे का पहात असते.

तुमच्याकडील पत्र मिळाल्याशिवाय आता इतर कुणाला पाठवायचं नाही असं मी ठरवलंय. आणि तुमच्याकडील पत्र आल्याशिवाय लिहायचा Mood ही येत नाही.

माझं इथं ठीक चाललं आहे. सध्या मला इथं मिसेस जाफरी नावाची एक मैत्रीण मिळाली आहे. ती आणि तिचे मिस्टर आमच्याच लॅंडलेडीकडं राहतात; पण दुसऱ्या घरात. या लेडीची तीन घरं आहेत. जे लोक स्वतः स्वैपाक करतात ते दुसऱ्या दोन घरांत आहेत नि जे या बाईकडं जेवतात ते इथंच राहतात. मीही स्वतः स्वैपाक करणार आहे. पण अजून त्या दुसऱ्या घरातली जागा रिकामी नाही म्हणून सध्या इथंच आहोत. एकटीला दुपारचा वेळ जात नाही. पुण्याला असताना काम करायला नको वाटायचं पण इथं गप्पा मारायला इतके दिवस कुणी नव्हतं. माझ्याएवढीच आहे ही मिसेस जाफरी. हैदराबादचे आहेत हे लोक. दुपारी आम्ही दोघी कुठंतरी भटकायला जातो. सकाळीं मी नि ती काही-तरी करीत बसतो. संध्याकाळीं बाळासाहेब फॅक्टरीतून आल्यावर मग मात्र वेळ छान जातो. जेवण करून रोज कुठंतरी जातो ते दहा वाजता परत येतो.

इथून मर्सी नदीच्या दुसऱ्या किनाऱ्याला न्यू ब्राईटन् नावाचं गाव आहे. तिथं आम्ही दोनदा गेलो होतो. इकडली गावं अगदी जवळ जवळ आहेत. नदी क्रॉस केली की दुसरं गाव ! आम्ही एकदा बोटीनं गेलो व एकदा टॅक्सीनं. न्यू-ब्राईटन्‌ला सध्या मे-फेअर आहे त्यामुळं काय गर्दी असते तिथं ! तशात गेले पाच-सहा दिवस हवा फार छान आहे. दिवसभर चक्क ऊन. अगदी हिंदुस्थानी हवा वाटते आहे. ऊन पडल्यावर सगळे लोक फिरायला निघतात. त्यामुळं अशा करमणुकीच्या ठिकाणी फार गर्दी होते. सिनेमाला मात्र कुणी फारसं जात नाहीत. आहे की नाही मजा या लोकांची ? उन्हात फिरायचं सोडून अंधारात कोण जाऊन बसतो ? गेल्या शनिवारी आम्ही इथल्या पार्कमधे गेलो होतो. तिथं पाच-पन्नास मुलांचा घोळका आमच्या पाठोपाठ येत होता. शेवटी मी त्यांना विचारलं. “ तुम्ही असे आमच्या मागे का ? ”

त्यांना म्हणे माझ्या साडीचं नि केसांचं नवल वाटत होतं! त्या घोळक्यात काही मुलीही होत्या. त्यांनी मला विचारलं—

" आमचे होतील का इतके लांब केस?" काय उत्तर द्यायचं त्यांना?

त्या मुलांना मी आमच्याबरोबर नेलेल्या डिंकाच्या लाडूतला थोडा थोडा लाडू दिला. ती मुलं नंतर हिंदुस्थानविषयी नाही नाही ते प्रश्न विचारू लागली. ...आम्ही हिंदुस्थानी असून इंग्रजी कसं बोलतो? ...हिंदुस्थानात घरं आहेत का?...तिथली मुलं शाळेत जातात का?...तिथं कुत्री, मांजरं, माकडं आहेत का?

या साऱ्या प्रश्नांची उत्तरं देताना मला अगदी हसू येत होतं. त्या दिवसापासून मी ठरविलं की इथं बाहेर हिंडताना शेपटा घालून जायचं नाही. हो! आधीच माझे केस जाताहेत. त्यातून या लोकांच्या बघण्यानं व मोठे केस, मोठे केस म्हणण्यानं आणखी केस जायचे! दुसऱ्या दिवशी बाहेर जाताना मी चक्कर घालून गेले. तरी पण एक बाई माझ्याजवळ आली नि माझ्या केसांवरून हात फिरवून म्हणाली ... I am jealous of your hair ! How beautiful and long they are ! (तुझ्या केसांचा मला हेवा वाटतो. किती सुंदर...किती लांबसडक...)

काय म्हणावं या बाईला? आता मात्र मी डोक्यावरून पदरच घेऊन बाहेर पडायचं ठरविलं आहे. म्हणजे कुणाला केस दिसणार नाहीत! अच्छा. आता जागा संपली! बाईच्या प्रकृतीस जपावे. पत्र पाठवा...

तुझी
**ताई**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६५२ वि: ...
क्रमांक ३६६ नों. दि. ...

३ अॅबरक्रॉंबी स्क्वेअर
लिव्हरपूल
२-८-४९

प्रिय अप्पा,

मुंबई सोडल्यापासून आत्ता कुठं तुझं पहिलं पत्र मिळालं. म्हणून मी आज पहिलं पत्र तुलाच लिहिते आहे. नाहीतर तू म्हणशील नेहमी ही रत्नाला नि

शशीलाच आधी पत्र लिहिते. ते दोघे लहान आहेत म्हणून आधी त्यांना. By the way...माधव सध्या एवढ्या कामात कसल्या गुंतला आहे की त्याला चार ओळी लिहायला वेळ मिळू नये? कॉलेजची तर सध्या नुकती सुरुवात आहे, नि तो जातही नसेल कॉलेजात! तुमच्याही कुणाच्या पत्रात त्याच्या-विषयी मजकूर नाही. असं का हे मला समजत नाही. माझी पत्रे तरी तो वाचतो का? सर्व कळव.

तुमच्याकडून मी चोवीस पानी पत्रांची अपेक्षा करते यात तुला अशक्य काय वाटलं? मी जशी आता सवय तुटलेली असूनही मोठी मोठी पत्रं लिहू शकते त्याप्रमाणं तुम्ही प्रत्येकानं बारा बारा पानी पत्र लिहिलं की बारापंचे साठ होतील! नि हो, मला काव्यमय पत्र पाहिजे असं कुणी सांगितलं? इथं तरी कुणाला येतंय काव्य? माझ्या आत्तापर्यंतच्या पत्रांत काय काव्य आहे काय? पत्र लिहायला काव्य लागत नाही.

मुख्य म्हणजे तू सध्या काय करतोस? कुसूमचा पुतळा फार सुरेख झाला आहे हे वाचून तो पाहण्याची मला उत्कंठा लागून राहिली आहे. खरंच अप्पा तेवढी एक गोष्ट आपल्या आयुष्यात झाली नसती तर...पण जाऊ दे मानवाच्या आवाक्याबाहेरच्या गोष्टी आहेत या!

तू म्हणतोस, तिथंही सध्या ऊन नाही. हो, ऑगस्टमधे असंच असतं. इथंही गेले तीनचार दिवस पावसाळी हवा आहे. थंड वारे सुटतात. हिंदुस्थानात फारसं कुणी हवेच्या गप्पा मारीत नाहीत. उलट एखाद्यानं हवापाण्याची चाकशी केली की आपण हसतो त्याला. पण इथं हे फार! इथले लोक नेहमीच हवेची चौकशी करीत असतात. रेडियोवर सुद्धा हवेचा फोरकास्ट सगळेजण मन लावून ऐकतात.

आहेच तसली इथली हवा! घटकेत ऊन, तर घटकेत पाऊस. तर लगेच थोड्या वेळानं चक्क सूर्यप्रकाश दिसू लागेल. इथले लोक सकाळी कुणी भेटलं म्हणजे—Good morning...what a lovely day असं म्हणतील. त्यावर दुसरा म्हणेल—Yes, but we shall have to pay for it! म्हणजे सध्या जरी हवा चांगली असली तरी थोड्या वेळानं आपल्याला तिची जबर

किंमत द्यावी लागेल! इंग्रज लोक हे मूळचे व्यापारी! तेव्हा पैशाच्या भाषेत बोलायचं त्यांना नवीन नाही.

सकाळच्या वेळी हवा चांगली असली की मी एकटीच थोडीशी फिरून येते. बाहेर पडल्यावर चारपाच तरी म्हाताऱ्या बाया म्हणतात...Good morning... What a lovely day! ... आपल्यालाही मग त्यांना Good morning करावं लागतं. इथं सर्व ठिकाणी Lovely हा शब्द फार लोकप्रिय आहे. लिव्हरपूलची आणखी एक Speciality आहे. इथं Love आणि Duck हे शब्द फार वापरतात! या शब्दांची तुला एक मजा सांगते.

एकदा आम्ही एका पार्कमधे बोटिंगला गेलो होतो. मी वल्ही मारीत होते. तुला आश्चर्य वाटेल. पण मी झक्क वल्ही मारते! माझ्या पुढून एका मुलाची बोट येत होती. मला माझी बोट चटकन वळविता येईना. त्या मुलाच्या बोटीचा थोडासा धक्का माझ्या बोटीला लागला. तर लागलीच तो म्हणाला– Sorry My Love!...इतकं विचित्र वाटलं मला! हा कोण तिऱ्हाईत मुलगा मला असं म्हणणारा? मराठेनं जरी मला सांगितलं होतं की, इथं अशी भाषा बोलतात; तरी प्रत्यक्षात ते ऐकताना कसंसंच वाटलं. आता सवय झालीय म्हणा... Thank you my love ऐकायची.

इकडं येताना आम्ही आमचे रेनकोट्स तिथं ठेवून मुद्दाम छत्र्या विकत घेऊन आलो. कारण तिथं कुणीतरी सांगितलं होतं की इंग्लंडमधले लोक रेनकोट वापरीत नाहीत म्हणून. पण इथं पाहते तो एकही मनुष्य छत्री वापरीत नाही. क्वचित एखादी बाई छत्री वापरते. परवा बाळासाहेबांनी एक Mackintogh रेनकोट खरेदी केला. जवळ जवळ ८५ रुपये किंमत पडली! या एका गोष्टीवरून तुला कल्पना येईल इथं किती महाग असतं सगळं. रेल्वे फेअर्स तर फार महाग. लंडन ते लिव्हरपूल २०० मैलांचं अंतर. पण थर्ड क्लास फेअर ३५ रुपये आहे. इथं दोनच क्लास आहेत. लॉर्ड वगैरे लोक सोडले तर बाकीचे सारे थर्डनंच जात असतात. इथला थर्ड क्लासही फार चांगला असतो. डेक्कन क्वीनमधे जसे दोन-दोन माणसांचे बाक असतात तसेच पण भारीपैकी कोच असतात इथं. दोन कोचांमधे एक-एक टेबल असतं. सीट्स "सेंट्रल हीटेड" असतात. म्हणजे हिवाळ्यातही प्रवास करताना त्रास होत नाही. लंडनला जाऊन येऊन सत्तर रुपये तिकिट पडेल. पण तेच जर रिटर्न तिकिट

काढलं तर पन्नासच्या आसपास पडतं. रविवारी One day return तिकीट काढलं तर २५ शिलिंग म्हणजे फक्त १७-१८ रुपये पडतात! आहे का नाही इथल्या रेल्वेची रसिकता !

मुंबईहून निघताना बोटीच्या पत्त्यावर भाऊजींची तार आली होती. ती पोचल्याचं उत्तर घालायला हे मलाच सांगत होते. मी म्हटलं तुमची तार आहे, तुम्हीच उत्तर घाला. त्यांनी एक कार्ड घातलं. अजूनपर्यंत त्याव्यतिरिक्त यांनी कुणालाही पत्र पाठविलं नाही. मला वाटतं पत्रव्यवहाराचं सगळं काम मलाच करावं लागेल.

कमल कुलकर्णी काय म्हणत होती ? रुबी नक्की किती तारखेला निघणार आहे ? ती लिव्हरपूल बंदरावरच उतरणार असेल तर छान होईल. तिच्याबरोबर जागा असेल तर खोबरे, कच्चे पोहे, कमळे करायचा साचा नि मुंबईला शिवायला दिलेलं माझं धारवाडी खणाचं पोल्कं पाठवून द्यावं. काळा मसाला कसा करतात ते बाईला विचारून कळवावं.

मला वाटतं आता पुरे. बाकीच्यांना अजून पत्रं लिहायची आहेत. त्यांनाही काही मजकूर पाहिजे ना ! दुपार कंटाळवाणी जाते. वाचायला मराठी काही पाठव...

तुझी
**ताई**

लिव्हरपूल
२-८-४९

प्रिय शशी,

...काल बाळासाहेबांना सुट्टी होती म्हणून आम्ही सेफटन् पार्कमधे गेलो होतो. इथं बोटिंगची फार छान व्यवस्था आहे. तुझ्याहून लहान लहान मुलंही इथं एकएकटी मोटार-बोट भाड्यानं घेऊन बोटिंग करतात. या बोटींची रेस

लावतात. तसंच इथं खेळातल्या बोटी पण चांगल्या मिळतात. दोन पौंडांपासून सात-आठ पौंडांपर्यंत एकेका बोटीची किंमत असते. येताना जमल्यास तुझ्या-साठी अशी एखादी बोट आणायचा माझा विचार आहे. बघू या जमतं का ते. हो, पण ती बोट पुण्यात सोडणार कुठं ? इथं जशी लहान लहान तळी मुद्दाम बोटिंगसाठी केलेली आहेत तशी आपल्याकडं कुठं आहेत ?

बागेत व इतर ठिकाणीही लोक कसे विसावा घेत पसरले आहेत ! इथले लोक हॉलिडे ट्रिपला गेले की, मन मानेल तसे वागतात. वाटेल ते करतात. अगदी म्हातारे सुद्धा ! कोण काय म्हणेल, कोण आपल्याला हसेल काय याची पर्वा करीत नाहीत. खरं म्हणजे कुणी कुणाला नावं ठेवीत नाहीच.

इथं सगळंच निराळं. आपण सकाळी उठल्यावर आंघोळ करतो. तर इथले लोक रात्री आंघोळ करून झोपतात. आपण सर्व पदार्थ हातानं खातो तर इथले लोक कशाला हात लावत नाहीत. आपण जेवायच्या वेळी कपडे काढून बसतो तर इथं अगदी बूट-टाय सुद्धा फुल्ड्रेस करून जेवायला जावं लागतं. हिंदु-स्थानच्या विरुद्ध दिशेला भौगोलिक दृष्टीनं जसा हा देश आहे तसाच मॅनर्सच्या दृष्टीनंही विरुद्ध आहे. आत्ता आत्ता कुठं आपणही साहेब होत चाल्लो आहोत, ही गोष्ट निराळी !

आणि हो, लिव्हरपूरल म्हणजे काय समजलास रे तू ? आठ-दहा लाख वस्तीचं इंग्लंडमधलं शहर आहे म्हटलं हे ! इथं सर्व सुखसोयी असायलाच पाहिजेत. अंडरग्राउंड रेल्वे सुद्धा आहेत इथं. सेंट्रल हीटेड थिएटर्स आहेत. बाहेर जरी कितीही थंडी असली तरी आत अगदी ऊबदार असतं.

मला इथं कोणता कोर्स घेता येईल असं वाटत नाही. कारण एक वर्षांत संपणारा असा कोणताच कोर्स नाही. लंडनला दोन-तीन कोर्सेस आहेत. पण त्यासाठी लिव्हरपूलहून लंडनला मला एकटीनं जाऊन रहावं लागेल. T. D चा कोर्स दहा महिन्यांचा आहे. पण त्यासाठी ग्रॅज्युएट असावं लागतं. एखादा कोर्स घ्यायचाच असेल तर फोटोग्राफीचा घे असा बाळासाहेबांचा आग्रह आहे. काय करायचं ते अजून मी ठरविलं नाही.

माझ्या मनात मोटार-ड्रायव्हिंगचा कोर्स घ्यायचं होतं. त्याप्रमाणे काल-पासूनच मी ड्रायव्हिंगचा कोर्स घेतला आहे. बारा दिवसांचे ७५ रुपये घेतले.

गाडी त्यांची, पेट्रोल त्यांचे व तात्पुरते लायसेन्स देखील तेच काढून देतात. आपण फक्त पैसे द्यायचे व ठरलेल्या वेळी जाऊन शिकायला लागायचं. कालचा पहिलाच दिवस म्हणून बाळासाहेब माझ्याबरोबर आले होते. माझ्या इन्स्ट्रक्टरने गावाबाहेर जाताना गाडी नेली; पण परत येताना मी गाडी आणली. अगदी ऑफिसपर्यंत ! बाळासाहेब म्हणाले देखील—"पहिल्याच दिवशी तू गावात गाडी आणशील असं वाटलं नव्हतं ! "

आज मी एकटीच गेले होते क्लासला. आत्ताच परत आले नि काल अर्धवट सोडलेलं पत्र आज पुरं करून टाकीत आहे. पाच-सहा दिवसांतच मला चांगलं ड्रायव्हिंग येईल असं इन्स्ट्रक्टरचं म्हणणं आहे. बारा दिवसांनंतर पर्मनंट लायसेन्स घेऊन टाकायचा विचार आहे. गाडी घेण्याची पूर्वतयारी आहे म्हटल ही !

मोठा कुठला कोर्स जमत नसला तरी अशा प्रकारचे लहान लहान कोर्स करून टाकायचा माझा विचार आहे.

बाळासाहेबांच्या फॅक्टरीचं नाव Automatic Telephone and Electric कंपनी असं आहे. नावावरून फॅक्टरीची कल्पना आलीच असेल तुला. टेलिफोन तयार करण्याचा कारखाना आहे हा ! आपल्याकडं बंगळूरला अशा प्रकारचा कारखाना नुकताच सुरू झालेला आहे. तिथंही टेलिफोनची नवनवीन मॉडेल्स तयार होतात.

बाळासाहेब फॅक्टरीत गेल्यावर मी काय करते असं तू विचारलंस ? स्वैंपाक करायचं मी ठरविलं आहे. पाच सहा दिवसांनी किचन असलेली खोली आम्हांला मिळणार आहे. इथल्या अन्नाला मी कंटाळून गेले आहे. शेवटी काल मी आमच्या लॅंडलेडीकडं गेले व तिला कांद्याबटाट्याची परतून भाजी कशी करायची हे शिकविलं. तसंच ब्रेडचा शिरा व केळी वगैरे घालून करायचा शिराही कसा करायचा हे तिला दाखविलं. सर्वजण त्या दिवशी अगदी खुश झाले. प्रत्येकानं मला Thanks दिले. प्रत्येकानं आपापल्या घरी कळविलं की, आज आपल्याला हिंदी पदार्थ खायला मिळाले ! आता मात्र आमची लॅंडलेडी देखील हे पदार्थ करून सगळ्यांना वाढते. प्रत्येकजण नवीन येणाऱ्या मेंबरना सांगतो की, याचं सगळं श्रेय मिसेस धांदरफळेना आहे !

रेडियो किंवा फोनो अजून घेतला नाही. इंग्लिश रेकॉर्डस मला नाही आवडत ! रेडियोवर Indian Programmes तरी ऐकायला मिळतील. पण

आपली स्टेशनं फार Powerful नसल्यामुळं नीट ऐकू येईल की नाही सांगता येत नाही. अजून काय लिहू ? अजून शरदला पत्र पाठवायचं आहे. तू मात्र मोठ्ठं पत्र लिहीत जा हं. अण्णांना दर रविवारी पत्र टाकायला विसरू नकोस...

तुझी
**ताई**

लिव्हरपूल
४–८–४९

प्रिय शरद,

बरंच चांगलं पत्र लिहिता येतं की तुला ! मला कल्पना नव्हती. तुला माझ्या पत्रानं फॉरिन रिटर्नची निशा चढते हे वाचून मजा वाटली. तुझं पत्र वाचीत असताना फॉरिन रिटर्नच्या ऐटीत बोलणारा शरद सारखा माझ्या डोळ्यांपुढं येत होता. पत्राच्या शेवटी Thank you वाचून मला माझं हसू आवरणं कठीण झालं. ब्रेकफास्ट घेत असताना तुझं पत्र मिळालं. त्याच वेळी वाचायला घेतलं बाकीचे लोक विचारायला लागले एवढं हसण्यासारखं काय आहे पत्रात ? त्यांना काय सांगायचं ? मी तुझ्या Thank you ला का हसले हे त्यांना कसं सांगायचं ? अं ?

तुझ्या कॉलेजमधल्या गमतीवरून सांगावंसं वाटतं की, आपल्याकडल्या कॉलेजात मुली हा एकमेव विषय आहे टिंगल करण्याचा ! कॉलेजच्या मुलांना मुलींची टिंगल करण्यात फार मजा वाटते ! इथं कुणी कुणाची अशी टिंगल करताना कधी दिसायचे नाहीत. बायकांची टिंगल करणं तर दूरच. फार चटकन फरक कळून येतो तो हा.

तू मला इथल्या स्त्रियांना Indian Dress करायला शिकविण्याचा क्लास काढण्याची सूचना केली आहेस. कल्पना छान आहे. दोन वेण्यांची पद्धत जर इकडल्या मुलींना आवडली तर सारं इंग्लंड बदलून जाईल अगदी ! पण क्लास काढायला मुख्य अडचण म्हणजे साड्यांची आहे. इतक्या साड्या कुठून

आणायच्या ? त्यासाठी त्यांना प्रत्येकीला माझ्याच साड्या द्याव्या लागतील नेसायला. कुणी सांगितलाय एवढा उद्योग ?

दादा महाजन आला का ? रवीबरोबर मला सुरम्याची काडी नाही तर काजळ किंवा यूरेका आयमिक्सची कांडी पाठवून देणे.

सुवर्णसंधी आयुष्यात क्वचितच येते तिचा उपयोग करून घे असं तू म्हणतोस. पण मला वाटतं माझ्या आयुष्यात आजपर्यंत फारसे श्रम न करता प्रत्येक चांगली गोष्ट मिळतच गेली आहे. कुणी सांगावं ? पुढंही असंच सारं मिळत जाईल...! एकेकाचा जन्मवेळेचा गुण असतो तो. नाही का ?

अच्छा. So long for the present....

तुझी
**ताई**

१३ अॅबरक्रॉंबी स्क्वेअर
लिव्हरपूल ७
१०-८-४९

ती. अण्णासाहेब यांना सौ. ताईचा सा. न.

आपली दोन्ही पत्रं मिळाली. उत्तर पाठवायला थोडासा उशीरच होत आहे. पण मला वाटलं तुम्ही ३०-३१ ला पुण्याला गेला असाल. तेव्हा पुण्याला गेलेली माझी सर्व पत्रं तुम्हीही वाचालच. तुमचं पत्र आलं त्याच दिवशी पुण्याहून २०-२२ पानी पत्र आलं होतं. निदान तितक्याच पानांचं उत्तर नको का घालायला ? प्रत्येकाला वेगळं पत्र, नि वेगळा मजकूर...शिवाय मधे शनिवार, रविवार आला की, पत्रं लिहायला सुट्टी मिळते ! आम्ही कुठं तरी बाहेर जातो. हवा वाईट असली तर सगळे मिळून काही तरी खेळतो.

रविवारी इथं जवळ जवळ सर्व गोष्टींना सुट्टी असते. दुकानं वगैरे तर बंद. सिनेमा देखील संध्याकाळी सातला सुरू होतो. नाही तर रोज सकाळी दहा

वाजल्यापासून सुरू असतो. इथल्या सिनेमाविषयी मागं मी लिहिलं होतं असं वाटतं. इथं सिनेमा सारखा सुरूच असतो. ज्याला ज्या वेळी वाटेल त्या वेळी आत जावं, वाटेल तितका वेळ बघावं नाहीतर बाहेर जावं!

इथली दुकानं सकाळी ९ वाजता उघडतात व संध्याकाळी ५ वाजता बंद होतात. त्यामुळं सर्व शॉपिंग बायकांनाच करावं लागतं. इथं नोकर ठेवायची फारशी पद्धत नाही. कारण परवडतही नाही. एक तास काम करून घेण्यासाठी तीन शिलिंग द्यावे लागतात. रोज सात-आठ तास काम करणाऱ्या आपल्या-कडल्या कारकुनाला जेवढे पैसे मिळतात त्यापेक्षा जास्त इथल्या गड्यांना रोज एक तास काम केलं तर मिळतात!

इथलं घरकामही तसं सोपं असतं. आपल्यासारखं घाण नि किचकट नाही. झाडून काढायला व्हॅक्यूम क्लीनर, स्वैपाकाला इलेक्ट्रिक ओव्हन नाही तर गॅस, ब्रेड कापायला यंत्र, बटाटे, भाजी धुवायला यंत्र, चिप्स करायला यंत्र, आपल्या कडल्यासारखं पोळी-भाकरी करीत तासन्‌तास बसावं नाही लागत. ब्रेड, केक घरी करायचं म्हटलं तरी इथं सोपं आहे. बाजारात रेडीमेड पीठ मिळतं. धुणं धुवायलाही मशीन आहे. असं इथलं सर्व काम सोपं आहे. या साऱ्या कामाची मला आता सवय झाली आहे. एकटीनं शॉपिंग करायचीही आता सवय झालीय. हे सगळं मी करते. हौसेनं.

नाही तरी मला उगीचच बाहेर भटकायची व कुणाच्या तरी घरी जाऊन गप्पा मारायची पूर्वीपासून सवय नाहीच.

इथं मी मजेत आहे. पण आत्तापर्यंत मजा करताना सर्वांना बरोबर घेऊन करायची सवय असल्यामुळं इथं सर्वांची सारखी आठवण होते. दर वीकएंडला कुठं तरी आम्ही ट्रिपला जातो. एकदा न्यूब्राईटनला तर एकदा साउथपोर्टला. तिथं लहान गाडीत बसताना, स्काय रॉकेटमधे बसताना, मेरी-गो राउंडमधे फिरताना चटकन् मनात येतं की, इथं शशीला मजा वाटली असती. इथं रत्ना हसला असता. पण त्याला काय इलाज आहे?

एकंदरीत, इथं माझा वेळ मजेत चालला आहे. आणि हो! तुम्ही दिलेल्या त्या आसनांच्या पुस्तकातील आसने ब्रेकफास्ट झाल्यावर केली तर चालतील का? कारण इथं आम्ही आंघोळ रोज रात्री झोपण्यापूर्वी करतो.

इथं शंभर एक हिंदी लोक आहेत. त्यांतले पंचवीस आमच्याच लँडलेडीकडं राहात आहेत. इतरांची भेट पंधरा ऑगस्टला ब्रिटिश कौन्सिलमध्ये होईल. त्या दिवशी स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचा समारंभ व्हायचा आहे. सात-आठ दिवसांपूर्वी दळवी नावाचे एक डॉक्टर सपत्नीक भेटले. लिव्हरपूलला आल्यापासून तेच एक मराठी बोलणारे जोडपे भेटले, म्हणून खूप आनंद झाला.

बाकी सर्व ठीक आहे. प्रकृतीला जपावे.

तुमची
**ताई**

लिव्हरपूल
२२-८-४९

प्रिय अण्णासाहेब यांस सौ. ताईचा स. न.

माझं १० तारखेचं पत्र नि तुमचं २ तारखेचं पत्र रस्त्यांत कुठं तरी क्रॉस, झालं. तुम्हां सर्वांना फक्त मला एकटीलाच पत्रे लिहायची असतात. यांनी तरी इथं आल्यापासून अजीबात पत्र लिहायचं सोडूनच दिलं आहे. (आधी तरी कधी लिहीत होते म्हणा!) ते म्हणतात, तुला पत्रं घालावी लागली असती म्हणूनच तुला इथं घेऊन आलो. सर्वांना मीच एकटी उत्तरं घालते. यांच्या मित्रांना, बोटीवर ओळखी झालेल्यांना, नातेवाइकांना. ते माझ्याशी कसे का वागेनात. I dont want to pay them back in the same coin.... तुम्ही, बाई, अप्पा, माधव, शरद, रत्ना, शशी सर्वजण माझ्यावर इतकं अमोल प्रेम करता, माझं हरतऱ्हेचं कौतुक तुमच्याकडून केलं जातं. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादानं मला माझ्या आयुष्याचा जोडीदारही अतिशय चांगला मिळाला आहे. शिवाय आपल्या नातेवाइकांपेक्षा जगात इतरही पुष्कळ लोक आहेत की, जे आपल्या गुणांचं कौतुक करतात. त्यामुळं मी नातेवाइकांपासून कसलीही अपेक्षा कधी केली नाही. कधी कधी काही गोष्टी तुमच्याजवळ बोलून दाखविते. त्या

एवढ्याचसाठी की, साध्या साध्या Formalities या लोकांना कशा कळत नाहीत ?

दुसरं सांगायचं म्हणजे तुम्ही मला ताईसाहेब का म्हणता ? अगदी लहानपणी जसं " तायडे " म्हणत होता तेच म्हणा. मला तेच आवडतं. ताईसाहेब म्हणायला पुष्कळ लोक आहेत. पण 'तायडे' म्हणायला तुम्ही नि बाई दोघंच आहांत.

चैनीसाठी भटकत जरी दूर देशी फिरेन
मी राजाच्या सदनि अथवा घोर रानी शिरेन.
नेवो नेते जड तनुस या दूर देशा सुदैव
राहे चित्ती प्रिय मम परी मातृभूमी सदैव...

लहानपणी केव्हा तरी वाचलेल्या कवितेत सोयीसाठी जरा बदल केलाय मी. इथं आल्यापासून एकसारखी आठवते आहे ती कविता. तसंच सावरकरांची " सागरास--- " ही कविताही आठवते. इंग्लंडला आलेला एक तरुण आपल्या मातृभूमीला परत जाण्यासाठी किती अधीर झाला आहे आणि त्याला परत नेण्यासाठी तो सागराला कशी विनवणी करतो आहे...

प्रासाद इथे रम्य परी मज भारी
झोपडी आईची प्यारी...

खरोखर, किती चांगल्या चांगल्या गोष्टी आहेत इथं ! त्या पाहून आपल्याला आनंदही होतो; पण म्हणून काही इथं रहायचा मोह होत नाही. स्वदेशी परत जाऊन आपल्या माणसांना भेटण्याची इच्छा सदैव जागृत असते. मला तरी हे वर्ष केव्हा एकदा संपतं असं झालं आहे. प्रत्येक क्षण आपल्या भेटीचा सुदिन जवळ आणीत आहे. त्यामुळं रोज किती दिवस गेले नि किती दिवस जायचे आहेत याचा हिशेबच मी करीत असते...

हिंदुस्थानला परत येऊनही दादा महाजन मूडमध्ये का नव्हता ? मात्र तुम्ही म्हणता त्याप्रमाणं लंडनखेरीज इतर कुठलीही माहिती त्याला नसावी अशी मलाही इथं शंका आली. इथं फार महागाई आहे असं त्यानं तुम्हांला सांगितलं यामुळं तुम्हांला काळजी वाटते. पण इथली राहणीच आपल्यापेक्षा किती तरी

उच्च दर्जाची आहे. त्यामुळं आपल्याला सर्व महाग वाटतं. साध्या कामगाराला इथं किती तरी पगार मिळतो. एकदा का त्याच्या कामावरून तो सुटला की असे झकपक कपडे करून तो बाहेर पडतो की, हा कामगार आहे का ऑफिसर आहे हे कळत नाही. तुम्ही मला खर्च लिहायला सांगितलं आहे. तसं लिहिणं चांगलं : पण दर वेळीं जर आपण पैशाचा विचार करायला लागलो तर सगळ्या गोष्टीतला charm नाहीसा होतो. One will not enjoy it ! उदाहरणार्थ, लंडन-सारख्या शहरात इंडियन रेस्टॉरंट्स आहेत. तिथं भारतीय पद्धतीचं जेवण मिळतं. पैसेही ज्यास्त पडतात. दर वेळी जर आपण पडणाऱ्या पैशाचा विचार करू लागलो तर अन्नाची चव त्या पैशांच्या आवाजात विरून जाईल.

आम्ही आपला विचार करतो की, इथं एकंदर राहणीच उच्च दर्जाची आहे. म्हणूनच इथं राहण्याबद्दल आपल्याला हॉस्टिंग अलावन्स मिळतो. मग उगीच दर वेळीं महागाईची तक्रार करण्याचं कारण काय ? साधारणपणे हॉस्टिंग अला-वन्सच्या पलीकडे वरखर्च जाऊ न देण्याची आम्ही खबरदारी घेतो. बँकेतून पैसे काढीत असल्यामुळं सविस्तर जमाखर्च जरी नसला तरी एकंदर एका महिन्यात किती खर्च झाला याची नोंद आपोआपच राहते. जरुरीपेक्षा पैसे जवळ ठेवलेच नाहीत म्हणजे झालं.

माझं मोटार-ड्रायव्हिंगचं शिक्षण संपलं. आता मी हमरस्त्यावरूनही गाडी चांगली चालविते. टेस्ट झाल्यावर मग गाडी घ्यायचं ठरविलं आहे. अजून रेडियो घेतला नाही. इथं रेडियो घ्यायचा तर त्याला स्पेशल ऑर्डर देऊन मागवावा लागतो. इथला रेडियो हिंदुस्थानात नेला तर त्याचा उपयोग होत नाही. ज्या रेडियोचा तसा उपयोग होईल असा Export साठी तयार केलेला रेडियो खास ऑर्डर देऊन घ्यावा लागतो. मिसेस जाफरीकडे रेडियो आहे. पण त्याच्यावर Indian कार्यक्रम लागत नाहीत.

एकटी कुठं जाऊ नकोस असं तुम्ही लिहिलं आहे. तुमच्या दृष्टीनं ते बरोबर आहे. साधारणपणे मेनरोड खेरीज इतर ठिकाणी मी कधी जातही नाही नि समजा गेले तरी त्यात काही धोका नाही. आपल्या देशातील लोकांत नि इथल्या लोकांत हाच एक मोठा फरक आहे. सर्व गोष्टी मला सविस्तर सांगता येत नाहीत. पण खरंच इथं एकटीनं हिंडण्याफिरण्यात काही धोका नाही.

रोज किती मैल मी फिरते असं तुम्ही विचारलं आहे. दोन-तीन मैल तरी रोज चालणं होतंच. दिवसातून दहा-बारा वेळा जिने चढायचे व उतरायचे म्हणजे तर एक मोठा व्यायामच आहे. एकंदरीत इथले लोक फार चालतात नि भरभरही चालतात. व्यायामाशिवाय इथं नुस्तं बसून राहायची सोय नाही. नाही तर लठ्ठपणा यायचा !

यंदा इथं समर फारच चांगला आहे. इतका चांगला सूर्यप्रकाश दरवर्षी मिळत नाही असं इथले लोक म्हणतात. गेले पाच-सहा दिवस तरी अगदी उक-डायला लागण्याइतकं ऊन्ह पडत आहे.

पंधरा ऑगस्टला तसा काही मोठा कार्यक्रम नाही झाला. छोटा का होईना, पण एकंदरीत बरा झाला. हिंदी राष्ट्रगीत, नंतर अध्यक्षीय भाषण, एक-दोन इतर भाषणं, त्यानंतर फराळ. फराळाला शिरा, पुरी, बटाटे, फ्लॉवर, मटारभाजी, रसगुल्ला, बर्फी व चहा-कॉफी असं होतं. फराळानंतर दोन-तीन Indian Dance झाले. बंगाली, हिंदी, तामीळ गाणी झाली. नंतर ब्रिटिश राष्ट्रगीत होऊन रात्री दहा वाजता कार्यक्रम संपला. अध्यक्षीय भाषण सोडलं तर इतर सगळा कार्यक्रम छान झाला. अध्यक्षांनी खरं म्हणजे राजकारणावर बोलायला नको होतं. इंग्लिश लोकांनी आमच्या चांगुलपणाचा कसा फायदा घेतला नि आम्हांला कसं छळलं हे आता सांगून काय साधणार आहे? वास्तविक पाहता स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षं झाल्यानंतर उखाळ्यापाखाळ्या काढण्यात अर्थ नाही. फ्रेंच एम्बसीच्या माणसाचं भाषण छान झालं. तो म्हणाला – अध्यक्षांनी आम्हां सर्वांना परकीय का म्हटलं? तो म्हणाला की, आम्ही देखील त्याच जुन्या आर्यन रक्ताचे आहोत. ज्या भारतात दोन हजार वर्षांपूर्वी भगवद्गीतेसारखा ग्रंथ झाला त्या देशाकडे आम्ही परकीय भावनेनं बघत नाही.

आमच्या लँडलेडीनंही पंधरा ऑगस्टला खास बेत केला होता. मी माझ्या जवळचे सांडगे, पापड, कुरडया काढून तळून काढल्या. एकंदरीत त्या दिवशी फार मजा आली. ब्रिटिश कौन्सिलनं केलेले पदार्थ मात्र कुणालाच आवडले नाहीत.

तुम्ही सांगितलेलं "बापू – माय मदर" हे पुस्तक इथं मिळालं नाही. लंडनला मिळाल्यास बघेन. इथं येताना मी गीता आणायला विसरले. पण

राजगोपालकडे गीतेचे इंग्रजी भाषांतर आहे. फार चांगलं आहे ते पुस्तक. गांधीजींनी त्याच्यावर सही केलेली आहे. ते पुस्तक मी कधी कधी मागून घेऊन वाचते.

पंधरा ऑगस्टच्या दिवशी इतर लोकांनी खूप मजा केली. मला मात्र उपास असल्यानं – सोमवारचा – फारसं काही खाता आलं नाही. या देशात उपास करणं फार कठीण. फार भूक लागते. बाळासाहेब इथं आल्यापासून ब्रेकफास्ट, लंच, डिनर, सपर असं चारी वेळेला थोडं थोडं का होईना खातात. यावरून आमच्यासारख्यांना इथं किती भूक लागत असेल याची कल्पना येईल. त्यामुळं इथं असेपर्यंत आता पुन्हा दुसरा कुठला उपास करायचा नाही असं मी ठरवून टाकलंय. त्या दिवशी दुसरं म्हणजे मला दातांच्या डॉक्टरकडं अपॉइंटमेंट होती. पुण्याला असतानाच माझ्या दातांतली चांदी निघाली होती. इथल्या थंडीमुळं दाढेतून फारच कळा निघू लागल्या. त्यामुळं डेंटिस्टकडं जायचं ठरविलं. हो, एक सांगायचं राहिलंच. इथं मेडिकल सर्व्हिस विनामूल्य असते. शेकडो रुपये खर्च लागणारं ऑपरेशन असो अथवा साधं इंजेक्शन असो. सर्व फुकट; त्यामुळं या देशात आजारी पडणं फार सोपं! काही खर्च येत नाही. नॅशनल हेल्थ स्कीम आहे ही. इथल्या ब्रिटिश माणसांना महिना साडेचार शिलिंग नॅशनल हेल्थ स्कीमला द्यावे लागतात. परकीय लोकांना तेही द्यावे लागत नाहीत. चांगली आहे की नाही आयडिया ?

तुमच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. तुमच्या पत्रावरून तुम्ही पन्नास टक्के फॉरिनरिटर्न झाला असं वाटतं. तुमच्याकडील पत्र मला इथं हॉलिडेला न मिळता शुक्रवारी मिळावं अशा बेतानं पाठवीन असं तुम्ही लिहिलं म्हणून मी असं म्हणते. खरंच, इथले लोक हॉलिडेचं फार कौतुक करतात. चैनीखेरीज काही करीत नाहीत सुट्टीला.

आता पुरं करते.

तुमची
**ताई**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

लिव्हरपूल
[illegible]-८-४९

प्रिय अप्पा नि माधव,

तुमची दोघांचीही पत्रं मिळाली.

मी नसताना तुमच्याकडं सारं ताईमय वातावरण असतं हे वाचून आनंद वाटला. पण सांभाळून हं. नाहीतर एखादे दिवशी कुणी म्हणेल— संपलं की नाही हे ताईपुराण ? तुझी वहीण इंग्लंडला आहे म्हणून तुझी छाती अभिमानानं फुगते हे वाचून मला वाटायला लागलं आहे की, एक वर्षानं जेव्हा मी परत येईन तेव्हा माधवऐवजी माधव पहिलवान दिसेल मला ! नि त्यामुळं खालच्या अक्का तक्रार करायला लागतील ... तुमच्यामुळं याची छाती फुगली व आमच्या घराची दारं आम्हांला मोठी करून घ्यावी लागली.

बाकी हा विनोद बाजूला केला तरी तुम्ही कुणी फारसं लठ्ठ व्हाल असं वाटत नाही. आम्ही दोघं मात्र खूप लठ्ठ होऊन इथून परत येऊ असं वाटतंय.

माझं मोटार-ड्रायव्हिंगचं शिक्षण संपलं. आता कुठूनही मी गाडी नेते. अजून लायसेन्स मिळालं नाही. इथली टेस्ट फार अवघड असते. त्यामुळं काय होईल सांगता येत नाही.

मध्यंतरी आम्ही बाळासाहेबांच्या फॅक्टरीची टीम विरुद्ध सेंट हेलन गावची टीम यांची स्वीमिंग स्पर्धा पहायला गेलो होतो. इथले स्वीमिंग पूल इमारतीच्या आतमधे असल्याने पाणी फार थंड नसतं; बॉडी-टेंपरेचर असतं. पांढऱ्या स्वच्छ गुळगुळीत संगमरवरी दगडानं बांधलेला पोहण्याचा छोटा तलाव व शुभ्र पाणी. क्लोरिन टाकून फिल्टर केलेलं पाणी. इतकं स्वच्छ की, त्यात एखादा काळा कण जरी पडला तरी उठून दिसेल. काही काही ठिकाणी तर निरनिराळ्या रंगांच्या ट्यूब्ज टाकून पाण्याला वेगवेगळे रंग आणलेले असतात. इथले पोहोण्याचे कार्यक्रम रात्री असतात. लाईटमधे फार छान दिसतं. आम्ही पहायला गेलो त्या वेळी वॉटर-पोलो हा खेळ चालला होता. फुटबॉलच्या बॉलने पाण्यात खेळला जाणारा खेळ म्हणजे वॉटर-पोलो. पायाऐवजी हातानं, एवढाच फरक. मुलींचा वॉटर-पोलो संपल्यावर त्या सगळ्याजणींनी मिळून अंपायरला उचलून तो

ओरडत होता तरी, त्याला पाण्यात टाकलं नि प्रत्येकजणीनं त्याला पाण्यात ओढून ओढून गटांगळ्या खायला लावलं. आपल्याकडल्या मुलींनी पुरुषाशी अशी दंगामस्ती केली तर लोक किती नावं ठेवतील ! इथं कुणाला काही वाटत नाही त्याचं. सर्वजण खेळाडूपणानं घेतात अशा गोष्टी. बिचाऱ्या अंपायरचा मात्र चांगला सूट खराब झाला त्या दिवशी !

मागच्या शनिवार-रविवारी आम्हांला कुठं जाता आलं नाही. कारण इथं ATE Factory विरुद्ध Indian Boys who came here for Telephone Training अशी क्रिकेट मॅच झाली. आमच्यापैकी काहीजणांनी अजून हातांत बॅट देखील धरलेली नव्हती. तरीही मॅचला तयार झाले ते. मला वाटलं वीस देखील धावा काढू शकणार नाहीत हे लोक ! पण आमच्या कल्पनेपेक्षा आमची टीम पुष्कळच छान खेळली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, बाळासाहेबांनी दुसऱ्याच ओव्हरमधे बोलिंग घेतली व दुसऱ्याच बॉलला बोल्ड-आउट घेतला ! त्यामुळं आमच्या टीममधे उत्साहाचा संचार झाला. सर्व खेळात यांचीच बोलिंग छान पडली. एकंदर चार खेळाडू औट घेतले व एक कॅच देखील घेतला. शिवाय ओपनिंग बॅट्समनही हेच होते. पण पळण्याची सवय नसल्यानं रनआउट झाले. त्या दिवशी यांचा खेळ पाहून मी चाट पडले. नंतर त्यांनी मला सांगितलं की, शाळेच्या सीनियर टीममधे खेळत होते म्हणे. आज चौदा वर्षांनी परत हातांत बॅट धरली. तेव्हापासून यांच्यामधला खेळाडूपणा चांगलाच जागृत झालेला दिसतोय. हल्ली रोज फॅक्टरीच्या क्लबमधे हे क्रिकेट खेळतात. मी टेबल-टेनिस खेळते. बाळासाहेब टेबल-टेनिसही चांगलं खेळतात. कोणीच त्यांच्याबरोबर टिकू शकत नाही. मी काही अतिशयोक्ती करते असं समजू नकोस. एके दिवशी इथल्या एका क्लबनं यांना खेळायचं आमंत्रण दिलं होतं. घरी आल्यावर मला सर्वांनी सांगितलं—धांदरफळे आज सर्वांत छान खेळले. प्रत्येकाला त्यांनी गेम दिली—

असो. पत्र फार लांबत चाललं. हे पत्र तुम्हांला गणेशचतुर्थीच्या दिवशी मिळेल. त्या वेळी मी विंडर-मिअर या गावी असेन. मोदक खाताना माझी आठवण ठेवा म्हटलं !

तुमची

**ताई**

लिव्हरपूल
८–९–४९

प्रिय अप्पा,

शुक्रवारी २६ तारखेला संध्याकाळी आम्ही दोघं व आमच्या शेजारच्या खोलीत राहणारे कृष्णन वगैरे असे चौघेजण इथून ८२ मैलांवर असलेल्या विंडर-मिअर या गावी जाण्यासाठी मोटारीनं निघालो. रात्री ९॥ ला तिथं जाऊन पोचलो. तिथल्या एका लँडलेडीकडं आधीच आमची उतरायची व्यवस्था केली होती. नंतर मी बरोबर नेलेल्या पुऱ्या, बटाट्याची भाजी, लोणचं यांवर ताव मारून आम्ही आमचं डिनर संपवलं. इथल्या हॉटेलमधे काय किंवा लँडलेडी-कडं काय फक्त बेड अँड ब्रेकफास्टची व्यवस्था असते. डिनर बाहेरच घ्यावे लागते. कायम मेंबर्सना डिनर मिळते.

शनिवारी सकाळी ब्रेकफास्ट उरकून आम्ही बाहेर पडलो. ते हायकिंग करीत (म्हणजे पायी पायी) एक मैलावर असलेल्या बोनस या गावी आलो. बोनस नि विंडर-मिअर ही दोन गावं एकमेकांत इतकी मिसळली आहेत की, एक संपून दुसरं केव्हा लागतं हे देखील कळत नाही. बोनसला आल्यावर आम्ही विंडर-मिअर हे तळं पाहिलं. या तळ्याचा परीघ जवळ जवळ साडेदहा मैल आहे. रुंदी एक मैल आहे. एक वाजेपर्यंत या तळ्यात आम्ही बोटिंग केलं. त्या दिवशी मी अतिशय चांगलं बोटिंग केलं. त्यामुळं आता मला बोटिंगचा खूपच आत्म-विश्वास आला आहे. बोटिंग संपल्यावर स्टीम लॉंचमधे बसून सबंध तळ्याला आम्ही चक्कर मारली. स्टीम लॉंचमधेच कॉफी, बिस्किटं, केक नि केळी यांवर ताव मारला. त्या वेळी तुम्ही तिकडं मोदक खात असाल! आम्हांला इथं अशी गणेशचतुर्थी साजरी करावी लागली. शरदला वाटतं इथं आम्ही आपले सण वगैरे विसरले असू. पण मी येताना आपलं पंचांग आणलं आहे त्यामुळं कधी कोणता सण आहे हे माझ्या चांगलं ध्यानात असतं. हरतालिका व ऋषिपंचमीचा उपास मात्र मी केला नाही. इथल्या हवेला उपास करणं मोठं जड जातं. असो. एकंदर तळ्याला चक्कर मारायला चार तास लागले. चार वाजता परत आम्ही हायकिंग करीत विंडर-मिअरला आलो. जवळच असलेल्या ऑरसेट हेड या टेकडीवर मग चढून गेलो. सरळ रस्ता सोडून शॉर्टकट घेण्याचा आम्ही प्रयत्न केला म्हणून काट्याकुट्यांचा जरा त्रास झाला. वर गेल्यावर मात्र छान वाटलं.

तशात त्या वेळी सूर्यास्त होत होता. एकंदर दृश्य फारच मनोवेधक दिसत होतं. खाली उतरून आलो त्या वेळी साडेसात वाजले होते. नंतर आम्ही डिनरच्या शोधार्थ निघालो. विंडर-मिअरमधली सर्व हॉटेल्स पालथी घातली; पण कुठेच डिनर मिळेना ! साहेबांचा देशना हा ! डिनर टाइम असतो सहा वाजता. त्यामुळं दीड तास उशीरा डिनर कसं मिळणार ? शेवटी आम्ही परत पायी पायी बोनसला आलो; पण तिथंही डिनर बंद. शेवटी एका हॉटेलवाल्याला काय वाटलं कुणास ठाऊक, तो आम्हांला डिनर द्यायला तयार झाला. त्यानं आम्हांला लॅट्यूस ( म्हणजे कोबीचा पाला ) उकडलेले बटाटे, अंडे, ब्रेड, बटर, कॉफी आणि मला एकटीला एक स्वीट डिश खायला दिली. आम्हीही, वा ! काय डिनर आहे ! असं म्हणत त्या पदार्थांवर ताव मारला, व माणशी पाच शिलिंग म्हणजे जवळ जवळ चार रुपये देऊन वर आणखी तीन शिलिंगांची टिप देऊन बाहेर पडलो.

दुसरे दिवशी म्हणजे रविवारी चौघांत मिळून ८० रुपयांना एक टॅक्सी केली व सभोवारचा सर्व प्रदेश पाहिला. विंडर-मिअरपासून सुरुवात केली. नंतर अँबल-साईड, कॉनिस्टन वॉटर, या तळ्यांच्या काठी जॉन रस्किनचं घर पाहिलं. वुडलँड-व्हॅली, डडनव्हॅली, ( इथं वर्डस्वर्थनं आपली सुनीतं केली ) एस्कॅडल व्हॅली, लोओस वॉटर वगैरे पाहिलं. मोटारमधेच खाणं झालं. नंतर आम्ही परत वेस्ट-वॉटर, कॅमॉक वॉटर नि बऱ्याच दऱ्या-पर्वत पाहून चार वाजता बटर-मिअर या तळ्याजवळ आलो. तिथून मग बॉरोडेल व्हॅली, डरवंट वॉटर, बॅसेंथ लेक, डनमेल रेझ वगैरे सर्व पाहून ग्रासमिअर या तळ्याच्या काठी आलो. ग्रासमिअर हे तळं नि त्याच्या आजूबाजूचं गाव फार सुंदर आहे. इथंच वर्डस्वर्थ रहात होता. इथलं दृश्य इतकं छान आहे की, वर्डस्वर्थसारखा निसर्गाचा कवी इथं निर्माण झाला यात आश्चर्य वाटत नाही. वर्डस्वर्थ राहात होता ते घर आम्ही पाहिलं. इथंच डिक्वेन्सी देखील रहात होते. इथली एकंदर सीनरी इतकी छान आहे की, कितीही पाहात राहिलं तरी समाधान होत नाही. पण आम्हांला फार वेळ नव्हता. म्हणून फार न थांबता आम्ही परत निघालो. पावणे सहाला विंडर-मिअरच्या मोटार-स्टँडवर येऊन पोचलो. निघतानाच आम्ही आमचं सामान बरोबर घेतलं होतं त्यामुळं स्टँडवरच लिव्हरपूलची गाडी पकडता आली. दुसरे दोघे तिथंच राहिले. ते आणखी केसीक, ग्रास मिअर वगैरे पाहून दोन दिवसांनी परत आले.

एकंदरीत ही ट्रिप फारच छान झाली. लेक डिस्ट्रिक्टमधे असताना बऱ्याच वेळा महाबळेश्वरची आठवण होत होती. महाबळेश्वरपेक्षाही इथली निसर्ग-संपत्ती प्रेक्षणीय आहे. हा सबंध जिल्हा दऱ्या, खोरी, तलाव यांनीच भरलेला आहे. इंग्लंडला येऊन जो लेक डिस्ट्रिक्ट बघणार नाही त्यानं इंग्लंडमधलं खरं सौंदर्य पाहिलं नाही असंच म्हणावं लागेल.

शनिवारी आम्ही ब्लॅकपूलला जाणार आहोत. अच्छा. पत्राचे उत्तर यावे.

तुझी
**ताई**

16 A ॲबरक्रॉम्बी स्क्वेअर
लिव्हरपूल
१९–९–४९

प्रिय अप्पा.

माझ्या एवढ्या मोठ्या पत्राला तुझ्याकडून तितक्या लहान पत्राची अपेक्षा नव्हती केली मी. कंटाळा आला का तुम्हांला माझी पत्रे वाचण्याचा! तसं असेल तर मीही आता एअर लेटरच पाठवीत जाईन…

मराठी मासिकं पाठविण्याची व्यवस्था करतो असं तुझ्या एका पत्रात होतं. पुढं त्याचं काय झालं कळलं नाही. तसंच तुमचे सर्वांचे फोटो पाठविण्याचंही तुम्ही सर्वांनी कबूल केलं त्याचाही पत्ता नाही. बरोबर आणलेली सुपारी अजून संपली नाही. आणखी दहा-पंधरा दिवसांत संपेल. सुपारी लौकर पाठवावी. बरोबर आणलेले डिंकाचे लाडू आम्ही विंडर-मिअरला गेलो त्याच्या आदल्या दिवशी संपले. दोन महिने लाडू छान राहिले. बाईला विचारून कच्चा मसाला कसा करतात ते कळविणे. मला आता इथं किचन मिळालं आहे त्यामुळं वाटेल ते पदार्थ करून खाता येतात. शिवाय इलेक्ट्रिक कुकर असल्यामुळं स्वैपाकाला मुळीसुद्धा वेळ लागत नाही. निवडायचं, दळायचं वगैरे भानगडी नाहीत.

बाजारात आयतं पीठ मिळतं. ते चाळलेलं असतं. तांदूळ, डाळ सारं काही निवडलेलं व स्वच्छ असतं. बिस्किटं करण्याचं सेल्फ रेझिंग फ्लोअर नावाचं पीठ मिळतं. त्यात थोडं लोणी, मीठ किंवा साखर टाकली व लाटून ओव्हनवर ठेवलं की पाच मिनिटांत बिस्किटं तयार होतात. आधी पीठ भिजवायला नको की अमोनिया वगैरे घालायला नको. एकंदरीत इथं स्वैपाक व खाणंपिणं फार सोपं असतं. सर्व काही करायला एक तासाच्या पेक्षा अधिक वेळ लागत नाही; रेशन आणायला सुद्धा इथल्या एका 'कूपर्स' नावाच्या मोठ्या दुकानात आम्ही कार्ड नोंदविली असल्यानं सारंकाही घरपोच येतं. नुस्तं फोन केला की झालं. इंग्लंडला येण्याच्या आधी मी दादा महाजनच्या पत्रानं निराश झाले होते. नोकर मिळत नाही या सांगण्यानं तर आणखीच भीती वाटली होती मला. पण इथं इलेक्ट्रिक कुकर वापरीत असल्यानं भांडी मुळीसुद्धा काळी होत नाहीत. शिवाय भांडी घासण्यासाठी बिनवासाची साबणाची पावडर मिळते इथं. तिनं ताटं-वाट्या स्वच्छ होतात. एकंदरीत दादा महाजननं जितकं भिवदलं होतं तितकं मुळीच नाही. आता महागाई आहे ही गोष्ट वेगळी. आमच्या एका खोलीचं स्वैपाकघर मिसेस जाफरीबरोबर आम्ही शेअर करतो तरी भाडं किती येतं माहीत आहे? आठवड्याचे दोन पौंड, म्हणजे महिन्याचे सुमारे १०४ रुपये. इथल्या कुकिंग फॅट्स मला आवडत नाहीत म्हणून मी परवा एक गोड्या तेलाची बाटली आणली. साडेचार रुपये पडले. तरीही लँडलेडीकडं रहात होतो त्यापेक्षा सर्व खर्च कमीच येतो.

तुझं पत्र आलं त्या दिवशी आम्ही भात-पिठलं, शिरा-पुरी असा बेत केला होता. त्यावर हे म्हणाले सुद्धा, दादाला असं भात-पिठलं मिळालं नसेल म्हणून त्यानं जेवणाखाण्याची हाकाटी केली ! आज तीन महिने झाले. ताक-दही मात्र मिळालं नाही. विरजण कसं घालायचं हाच प्रश्न पडला. शेवटी मी आमच्या जवळची आंब्याची पावडर दुधात घातली. दोन दिवस झाले तरी दही होण्याचं चिन्ह दिसेना. याचं काही आता दही होणार नाही असं समजून मी तो ग्लास फायर प्लेसवर ठेवून दिला व नंतर टाकायचंच विसरले. दुसऱ्या दिवशी बघते तर काय ? ग्लासात अगदी घट्ट दही होऊन बसलं होतं ! इतका आनंद झाला मला ते दही बघून...! नंतर लक्षात आलं की इथल्या थंडीमुळं दही विरजत नव्हतं. फायर प्लेसची उष्णता लागल्यामुळं आपोआप दही तयार झालं. नंतर

त्या दह्याचं दुसऱ्या दुधाला विरजण लावून मँटल पीसवर ठेवून दिलं. दुसऱ्या दिवशी पुन्हा घट्ट दही तयार ! आता आम्हांला रोज दही खायला मिळतं. Necessity is the mother of Invention असं म्हणतात ते काही खोटं नाही. नाहीतर आंब्याच्या पावडरीनं दुधाला विरजण लागू शकतं हे मला कधी तरी समजलं असतं का ?

दहा तारखेला आम्ही इथून चाळीस मैलांवर असलेल्या ब्लॅकपूल या गावी गेलो होतो. यांच्या फॅक्टरीनं ही ट्रिप ठरविली होती. एकंदर चारशेपन्नास लोक होते. पंधरा मोटारी केल्या होत्या. सकाळी साडेनऊला इथून निघालो व बारा वाजता ब्लॅकपूलला पोचलो. एक वाजेपर्यंत तिथल्या बीचवर भटकलो नंतर लंचला गेलो. एका मोठ्या हॉटेलमधे आम्ही एकाच वेळी साडेचारशे लोक एका वेळी लंचला बसलो. एवढं मोठं हॉटेल आहे ते. अर्थात मला उकडलेले बटाटे, कोबी व मटार यांशिवाय काही मिळालं नाही. लंच झाल्यावर मग आम्ही व्हिक्टोरिया करून ब्लॅकपूल टॉवर पाहायला गेलो. पाचशेपन्नास फूट उंच आहे हा टॉवर टॉवरच्या आतमध्येही बघण्यासारखं पुष्कळ आहे. एका हॉलमध्ये नॅचरल फॉल्स, झाडे, कुंड्या वगैरे लावून इतकं सुंदर केलं आहे की, एखाद्या सुंदर नैसर्गिक बागेतच आपण बसलो आहोत असं वाटतं. टॉवरच्या टोकापर्यंत जायला लिफ्ट आहे. चारही बाजूंना काचा असल्यामुळे वर जाताना भोवतालचे सर्व दिसते. वर गेल्यावर खालची माणसं पिग्मी लोकांसारखी दिसतात. टॉवरवरून खाली आल्यावर चहाची व्यवस्था त्याच हॅाटेलमध्ये केली होती. मी माझ्या-बरोबर नेलेली साबूदाण्याची खिचडी खायला काढली. आमच्याबरोबरच्या इंग्लिश मित्रांनाही थोडी दिली. त्यांना ती तिखट लागली, पण तरीही खूप आवडली. शेवटी टिन् फ्रूटस् व आईस्क्रीमची डिश मात्र मला आवडली. माझ्या वाटणीची मी खालीच पण आमच्या बरोबर असलेल्या टॉमी मॅक नावाच्या गृहस्थानेही त्याची डिश् मला दिली.

नंतर आम्ही फेअर बघायला गेलो. इथं फन्‌फेअरमध्ये कितीतरी गोष्टी असतात. आपल्याकडे असल्या खेळातून फक्त लहान मुले बसतात, इथे अगदी म्हातारे लोक सुद्धा असल्या गोष्टी एंजॉय करतात. हे सारं पत्रातून एक्स्प्लेन करता येत नाही. मी परत आल्यावर हे सारं काय असतं ते सांगेन.

ब्लॅकपूलला आणखी एक विशेष पाहिलं. मादाम कुशानी नावाची एक बाई आहे. ती तुमचं नाव, गाव, तुमच्या मनातले विचार, सर्व काही सांगते. बाहेर पाटी लावली होती की मादाम कुशानी ज्या व्यक्तीचं नाव सांगायला चुकेल तिला पाच पौंड बक्षीस मिळेल. आम्हांला वाटलं, आमचं नाव इतकं अवघड आहे, इथल्या लोकांना तीन-तीनदा सांगूनही त्यांना धड उच्चार करता येणार नाही तिथं या बाईला काय सांगता येणार ? आपल्याला नक्की पाच पौंड मिळतील म्हणून आम्ही मारे एक शिलिंगाचं तिकिट काढून आत जाऊन बसलो. मादाम कुशानी स्टेजवर डोळे बांधून बसली होती. तिच्या असिस्टंटला आम्ही आमचं नाव काय आहे ते विचारायला सांगितलं. मादाम कुशानीनं लगेच – Comes from India, name Dhandarphale असा बरोबर उच्चार करून ते सांगितलं. नंतर तिनं कुठल्या तरी एका पत्त्याच्या पानाचा मनात विचार आणायला सांगितलं. मी मनात आणते न आणते तोच तिनं सांगितलं – Thinking of Queen of Diamond....

तिसऱ्या एका बाईनं तिचं आयुष्याचं रीडिंग द्यायला सांगितलं. भूतकाल, वर्तमान काल बरोबर होता. त्यावरून भविष्यकालही बरोबर ठरेल असं वाटतं. नि हे सारं त्या व्यक्तीला न पाहता, तिचा हात किंवा कुंडलीही न पाहता. त्या बाईला पाहिल्यावर आज आपण खरोखरीच काही तरी विशेष पाहिलं असं वाटलं.

रात्री आम्ही परत आलो. एकंदरीत ट्रिप छान झाली. मुख्य म्हणजे व्यवस्था फार छान होती. आपल्याकडं अशी चारशेपन्नास लोकांची ट्रिप इतक्या व्यवस्थित रीतीनं पार पडली असती का ? त्या दिवशी आम्हा दोघांना मिळून जवळ जवळ साठ रुपये खर्च आला. आता सोळा तारखेपासून ब्लॅकपूलला रोषणाई सुरू झाली आहे. ती पाहण्यासाठी परत एकदा आम्ही जाणार आहोत. कालच्या शनिवारी आम्ही मँचेस्टरला गेलो होतो. लिव्हरपूलपेक्षा मँचेस्टर हे गाव मला आवडलं. तिथही फन्‌फेअर्स आहे, झू आहे. पण सेटिंग ब्लॅकपूलपेक्षा वेगळं आहे. जास्त नॅचरल आहे. नंतर आम्ही कोहिनूर नावाच्या इंडियन रेस्टॉरंट-मध्ये जेवण घेतलं आणि रात्री साडेअकरा वाजता परत घरी आलो.

हे ट्रिपपुराण पुरे ... मला पुस्तकं कधी पाठवून देणार आहेस ? लौकर दे. मध्यंतरी ब्रिटिश कौन्सिलमध्ये पॅरिसहून आलेल्या दोन फ्रेंच मुलांशी माझी

ओळख झाली. त्यांनी मला चांगली फ्रेंच पुस्तके देण्याचे कबूल केले. तुम्ही तिथे स्वातंत्र्यदिनाला काय केले ते कळव. इकडं कुणी येणारे भेटल्यास मला एक Lion Brand तुपाचा डबा पाठवायला विसरू नकोस. सर्वजण आत्तापासून दिवाळी कशी साजरी करायची याचा बेत करीत आहोत. खाण्याचे पदार्थ करायचं काम बहुतेक माझ्याकडंच येईल. इंग्लिश लोकांना बोलावलं तर काही तरी चांगलं करावं असं मला वाटतं.

बाकी सर्व पुढील पत्री....

तुझी
ताई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८६५२ दि:
क्रमांक

लिव्हरपूल
२७-९-४९.

प्रिय अप्पा,

बावीसला तुझं पत्र मिळालं. त्यानंतर मी लागलीच रत्नाला पत्र लिहिलं. आज आता परत तुला हे पत्र लिहीत आहे. तुमच्याकडूनही अशीच लौकर लौकर उत्तरं येतील अशी आशा आहे. दसऱ्याला हे पत्र मिळेल. सोनं द्यायला यंदाच्या वर्षी मी तिथं नाही तरी इथून हे पत्ररूपी सोनं पाठवीत आहे! तुम्ही दसऱ्याला जेवायला काय कराल ते मला कळवा. मी इथं श्रीखंड करणार आहे. इथं दुधाचं रेशन आहे. माणशी अर्धा बाटली दूध मिळतं रोज. या देशात ब्लॅक मार्केटनं वस्तू घेता येत नसली तरी इतर मार्गानं ब्लॅक मार्केट करता येतं. मिल्कमनला दोन-चार शिलिंगांची टिप देऊन आम्हांला रोज दोन बाटल्या दूध मिळतं. इथं म्हशीचं दूध अजिबात नाही. सर्व गाईचं दूध. सीलबंद बाटल्या असतात. मग पाणी मिसळण्याचा प्रश्नच नाही. आम्ही स्टेरिलाईज्ड मिल्क घेतो. महिनाभर जरी या दुधाची बाटली ठेवली तरी ते नासत नाही. सहा-सात बाटल्या दूध साठवलं आहे मी. त्याचंच आता श्रीखंड करणार आहे.

काल्च्या शनिवारी आम्ही दोघं आणि मिस्टर अँड मिसेस टॉमी मॅक असे चौघे इथून वीस मैलांवर असलेल्या चेस्टर या गावी गेलो होतो. सकाळी दहा

वाजता ते दोघेजण आमच्या घरी आले. त्यांना मी चहा व पुऱ्या खायला दिल्या. त्या दोघांना पुरी हा पदार्थ फारच आवडला. मुख्य म्हणजे ती दोन्ही बाजूंनी फुगून मध्ये पोकळी कशी निर्माण होते याचं त्यांना फार आश्चर्य वाटलं. नंतर आम्ही मर्सी नदी ओलांडून न्यू ब्रायटनच्या शेजारी असलेल्या बर्कन हेड या गावी गेलो. तिथून बसने चेस्टरला गेलो. इथलं कॅथेड्रल बघण्यासारखं आहे. जुन्या गोष्टी चांगल्या स्थितीत ठेवण्याबद्दल चेस्टरची प्रसिद्धी आहे. सर्व दगडी इमारत, आतमध्ये कार्व्हिंग केलं आहे. संपूर्ण कॅथेड्रलला ऐकू जाण्यासाठी एक मोठा विशिष्ट प्रकारचा पियानो आहे. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात मेलेला जनरल वुल्फ याला ज्या फ्लॅगमध्ये गुंडाळून आणलं, तो फ्लॅग इथं आहे. रोमन लोकांनी बांधलेला सिटी वॉल इथंच आहे.

इंग्लंडमध्ये प्लेगची साथ आली होती त्या वेळी चेस्टरमध्येही एकूण एक घरी प्लेग फैलावला होता. फक्त एकच घर असं होतं की, त्या घरातील एकही माणूस सबंध साथीत प्लेगनं लागला नाही. अजून ते घर जपून ठेवलं आहे.

लंचनंतर आम्ही नदीवर गेलो. या नदीबद्दल वाचलेलं आठवतंय का? Mary had a little lamb, नंतर शेवटी आहे. across the river Dee—तीच ही डी नदी. इथल्या नद्या फार मजेशीर असतात. त्यांना पूर येत नाही. त्यामुळे नदीचा काठ एखाद्या कॅनॉलच्या काठासारखा बांधलेला असतो. लांबच लांब वाळू पसरलेली नसते. डी नदीच्या काठी सिनरी फारच सुंदर आहे. आठ-दहा मैल आम्ही बोटीतून जाऊन आलो. परत आल्यावर स्प्रिंग पुलावरून दुसऱ्या किनाऱ्यावर गेलो. पलीकडील किनाऱ्यावर गेल्यावर बसमधून आठ-मैलांवर असलेल्या ईटन हॉल या खेड्यात गेलो. नदीच्या काठाकाठानं फिरल्या-वर परत आम्ही चेस्टरला आलो. तिथून बर्कन हेड आणि बोटीनं लिव्हरपूल...

घरी आलो तर दहा वाजले होते. रत्नाचा रिझल्ट केव्हा आहे? आणखी नवीन विशेष सर्व कळव.

तुझी
**ताई**

१६ ए, अॅबरक्रॉंबी स्क्वेअर
लिव्हरपूल ७
७-१०-४९

ती. सौ. बाईस,

दसऱ्याच्या दिवशी तुमच्याकडून मला आणखी एखादं पत्र येईल असं वाटलं. पण आज उद्या करता करता काल एक पाकिट मिळालं. कालच उत्तर लिहायला पाहिजे होतं. अण्णांनी तारखा दिल्या आहेत त्याप्रमाणे कालच लिहिणार होते. आता पुढल्या तारखा मात्र चुकू देणार नाही. एखादे वेळी चार दिवसांऐवजी पत्र मिळायला आठ दिवसही लागतात. कोणत्या विमानानं ते जाणार यावर सर्व अवलंबून असतं. काल पत्र लिहायला झालं नाही. त्याचं कारण मिसेस टॉमी मॅकला माझ्याकडं लंचला बोलावलं होतं. साडेबारा वाजता ती आली. मग आम्ही जेवण करून शॉपिंगला गेलो ते साडेपाचला परत आलो. काल मी माझ्यासाठी थंडीत घालायला म्हणून आतून फर असलेले बूट आणले. किंमत विचारू नकोस ! सांगण्यासारखी नाही ! !

माझ्याकडं येते ही मिसेस टॉमी मॅक फारच चांगली आहे. तिच्याशी आता माझी खूपच मैत्री झाली आहे. आता आपण परदेशात एकटे आहोत, आपल्याला काही लागलं तर कुणाचा आधार नाही असं मुळीच वाटत नाही. तिनं मला तुला लिहायला सांगितलं आहे की, तुम्ही तुमच्या मुलीची काही काळजी करू नका. तुम्ही घ्याल तितकी मी तिची काळजी घेत आहे—आणि खरोखरच ती माझी फार काळजी घेते. कोणत्याही इंग्लिश कुटुंबातून आपली इतकी मैत्री होईल असं मला वाटलं नाही. कारण हे इंग्लिश लोक फारच औपचारिक वागतात. आपण जसं एकमेकांशी मोकळेपणानं वागतो तसं त्यांच्याशी फॅमिलिअर होणं फार कठीण. पण या टॉमी मॅकच्या घरी मात्र औपचारिकपणा, मॅनर्स वगैरे पाळायचं ओझं मुळीच वाटत नाही. त्यांच्याकडं जायचं असलं की, मी सकाळी अकरालाच जाते. तिथंच जेवण करून आम्ही दुपारी कुठं तरी बाहेर फिरून येतो. नंतर ती डिनरची तयारी करायला लागते. मला वाटलं तर मी तिला मदत करते. कंटाळा आला असला तर खुशाल सिटिंगरूममधे बसून पुस्तक वाचते. साडेपाचला बाळासाहेबही फॅक्टरीतून परस्पर तिकडेच येतात.

नंतर आमचं सर्वांचं डिनर होतं; नि मग अकरा साडेअकरा वाजेपर्यंत गप्पा मारून परत घरी येतो. एखाद्या इंग्लिश माणसाच्या घरात असे एकसारखे बारा बारा तास घालवायला मिळणं म्हणजे साधी गोष्ट नाही ! मला वाटतं, खूपशा इंग्लिश लोकांशी थोडी थोडी मैत्री करण्यापेक्षा एखाद्याच कुटुंबाशी खूप मैत्री करणं चांगलं. त्यामुळं इंग्लिश घरांची पूर्ण कल्पना येते. मैत्री जर औपचारिकच राहिली तर या लोकांच्या सिटिंगरूमपलीकडे आपल्याला कशाचीही कल्पना येत नाही. मिसेस मॅकशी माझी इतकी मैत्री झाली आहे की तिच्या स्वयंपाक-घरापासून ते बेडरूमपर्यंत मी कुठंही जाते.

दसऱ्याच्या दिवशी त्या दोघांना आम्ही जेवायला बोलावलं होतं. इथलं दूध चांगलं असल्यामुळं श्रीखंड फारच छान झालं होतं. पुण्याला आपण इतक्या-वेळा श्रीखंड केलं, पण असं श्रीखंड कधी झालं नव्हतं.

कुठं काही अडलं तर परक्या देशात असलो तरी इथल्याच इंग्लिश माणसाशी खूप मैत्री झाल्यामुळं आम्हांला सर्व काही मिळेल. त्यामुळं आमच्या विषयी तू काळजी करू नयेस म्हणून मिस्टर व मिसेस टॉमी मॅकविषयी मी लिहिलं. इंग्लिश माणसाच्या घरातल्या किती तरी चालीरीती मला समजल्या.

तुपाचा डबा पार्सलनं पाठव. पार्सलवर गिफ्ट-पार्सल असं लिहावं.

तुझी
**ताई**

१६ए, ॲबरक्रॉंबी स्क्वेअर
लिव्हरपूल
११-१०-४९

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

बऱ्याच दिवसांनंतर तुम्हांला बँकेच्या पत्त्यावर पत्र पाठवते आहे. दसऱ्याला तुम्ही पुण्याला जाणार होता म्हणून पुण्यालाच पत्रं लिहिली. त्यानंतर तुम्ही व मुलांनी मिळून लिहिलेलं पत्र मिळालं. आज अकरा तारखेला पत्र लिहीत आहे.

माझी काही पत्रं तुम्हांला फार उशीरा मिळतात याचं कारण पत्र पोस्टात केव्हा पडतं हे नसून ते कोणत्या विमानानं जातं हे आहे. त्यात माझा किंवा कुणाच्याच दोष नाही. माझं पत्र नाही मिळालं तर कुठं ताईला मोटार ॲक्सिडंट तर नाही ना झाला ? अशी काळजी करण्यापेक्षा म्हणत जा—ताईला अजून काही समजत नाही. गेली असेल कुठं तरी ट्रिपला ! नि विसरली असेल पत्र लिहायला.

अप्पानं पाठवून दिलेली Bapu–My Mother व माझ्या विलायतच्या आठवणी ही दोन्ही पुस्तकं मिळाली. पैकी विलायतच्या आठवणी वाचून झालं. तुम्हांला हे पुस्तक का आवडलं कुणास ठाऊक ? मला तरी त्या पुस्तकात फारसं काही वाटलं नाही. कदाचित साऱ्या गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यांनी मी पाहिल्यामुळं असेल. कदाचित इंग्लिश लोकांच्या विषयी त्या लेखकानं जे लिहिलं आहे ते मला पटत नसल्यामुळं असेल. इंग्लिश लोकांची स्तुती करण्याच्या भरात काही वेळा अतिशयोक्ती झाली आहे. लंडनच्या इमारती उठावदार दिसतात असं त्यानं लिहिलं आहे. मला तसं मुळीच वाटत नाही. आपल्या मुंबईला सुद्धा लंडनपेक्षा किती तरी सुंदर इमारती आहेत. इथली मांस विकायची दुकानं फार स्वच्छ असतात. वास नाही, घाण नाही. मारलेले पक्षी इतके व्यवस्थित ठेवलेले असतात वगैरे...अगदी साफ खोटं आहे हे ! २५-३० यार्डांवर मांसाचं दुकान असलं तरी लगलीच मी सांगते की, जवळपास कुठं तरी मांसाचं दुकान आहे. नाकाला रुमाल लावल्याखेरीज दुकान ओलांडता येत नाही. असे आणखीही बरेच आहे. ते सर्व पुढील पत्रात लिहीन. पुढील पत्र सविस्तर लिहीन.

तुमची
**ताई**

लिव्हरपूल
१३-१०-४९

प्रिय अप्पा,

तुझ्या पत्रातील ताईच्या अंगात येण्याचा मजकूर वाचून खूप मजा वाटली. दादाबद्दलचा मजकूर वाचूनही गंमत वाटली. तू लिहिलंस की " दादाकडं बघून

इंग्लंडहून काही चांगल्या गोष्टी आणता येतात असं वाटत नाही" पण एका दादाला पाहून इंग्लंडहून येणाऱ्या सगळ्याच लोकांसंबंधी निष्कर्ष काढण्याचं धाडस तू करू नकोस. कोणत्या गोष्टी शिकायच्या नि कोणत्या नाही हे प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून आहे. आम्ही दोघं परत आल्यावर काय काय वाईट गोष्टी घेऊन येतो ते पाहून मगच तू ठरव. आज मी काही मोठं पत्र लिहिणार नाही. सगळ्यांना दिवाळीची पत्रं पाठवायची आहेत ना! त्यामुळं ट्रिपचं वर्णन पुढील पत्रात लिहीन.

इथं मी एक म्यूझिकल कॉन्सर्ट व मिलिटरी टॅटू पाहिला. मागच्या शनिवारी आम्ही प्रेस्टनला गेलो होतो. गुरुवारी ब्लॅकपूलचे लाइट्स पाहून आलो. सविस्तर वर्णन पुढील पत्रात लिहीन.

मागच्या मंगळवारी मी पुरणाच्या पोळ्या केल्या होत्या. फारच छान झाल्या होत्या. मिसेस मॅकसाठी दोन पोळ्या नेल्या होत्या. तिथं सर्वांना त्या फार फार आवडल्या. मिसेस मॅक तर मला पोळ्या करायला शिकव म्हणून आग्रह करू लागली. आपल्याकडल्या नेहमी स्वैपाक करीत असणाऱ्या बायकांनाही चांगल्या पुरणाच्या पोळ्या करता येत नाहीत, तिथं मिसेस मॅकसारख्या इंग्लिश बाईला कशा येणार?

एकवीस तारखेला सर्वजण मिळून दिवाळीची मोठी फीस्ट करणार आहोत.

दिवाळीला तुम्हांला इथून प्रेझेंट पाठवता येत नाही म्हणून पैसे पाठविले आहेत. चेक लौकर कॅश कर व तसं मला उत्तर घाल.

तुझी
**ताई**

प्रिय माधव,

विसरून गेलेल्या बहिणीची दिवाळीच्या दिवशी तरी आठवण व्हावी म्हणून मुद्दाम तुला हे पत्र लिहीत आहे. दिवाळीच्या आनंदात मला विसरून न जाता खूप खूप मजा कर...**ताई**-

16 A ॲबरक्रॉम्बी स्क्वेअर
लिव्हरपूल
१७-१०-१९४९

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

...मागच्या पत्रात 'माझ्या विलायतच्या आठवणी' या पुस्तकाबद्दल मी लिहिलं आहे. त्या पुस्तकापेक्षा तुम्ही अनंत काणेकरांचं 'धुक्यातून लाल ताऱ्याकडं' हे पुस्तक वाचल्यास ते तुम्हांला जास्त आवडेल. इंग्लंड, फ्रान्स, रशिया या देशांची चांगली माहिती आहे त्या पुस्तकात. बापूंविषयीचं पुस्तक मात्र चांगलं आहे. गीता मिळवायचा मात्र मी इथं खूप प्रयत्न केला, पण मिळाली नाही. कदाचित लंडनला मिळेलही. आपण पाठवून दिल्यास बरे होईल. तसंच मराठी मासिकांचे अंकही इथं वाचायला मिळत नाहीत. इथं मी फक्त इंग्रजी दैनिकं वाचते. ही दैनिकं फार करमणुकीची असतात. वाट्टेल तसल्या बातम्या छापतात. कुणाचं लग्न झालं...नवऱ्या मुलीनं ड्रेस कसा केला होता...कुणी कुणाशी घटस्फोट घेतला...खून ...अपघात सारं काही सविस्तर असतं.

इथं सध्या चांगलं ऊन पडत आहे. इथले लोक म्हणतात की कित्येक वर्षांत इतका चांगला समर नव्हता आला. नाहीतर दर वर्षी म्हणे ऑगस्टपासूनच थंडी पडायला सुरुवात होते. यंदा ऑक्टोबर संपत आला तरी थंडी नाही. काल आम्ही सिनेमाला गेलो होतो. तेव्हा मी माझा शॉर्ट कोटही नव्हता घेतला बरोबर. पुण्यासारखं नुसतं पातळ नि पोलकं घालून गेले होते, इथले लोक आम्हांला म्हणतात की, "तुम्ही तुमच्या बरोबर सूर्य घेऊन आलात तो परत नेऊ नका. आम्हांला प्रेझेंट म्हणून देऊन जा!"

हवा चांगली असल्यामुळं सगळेच लोक खुषीत आहेत. त्यामुळं दोन-तीन नवीन ट्रिप्स करायला मिळाल्या. आठ तारखेला आम्ही लंडनला गेलो होतो. कदाचित थंडी पडेल म्हणून मी माझा नवा विंटर शू घेऊन गेले होते; पण अजून तो घालायचा योग आला नाही.

मला आता चालायची इतकी सवय झाली आहे की, परत आल्यावर तुम्हांला आश्चर्य वाटेल. कदाचित इथल्या हवेचा गुण असेल तो. दिवाळी मजेत साजरी करावी व माझी आठवण ठेवावी...

तुमची
ताई

लिव्हरपूल
१७–१०–४९

प्रिय शरद,

तू मला लिहिलेलं पत्र कॅन्सल का केलंस ? मी तुला खात्रीनं वेडा म्हटलं नसतं. तरी ते पत्र मला पाठव. तेवढीच माझी करमणूक होईल. तू म्हणतोस त्याप्रमाणं मी इथं दिवाळीचा बेत फार काही जोरात नाही करीत. पण एक मात्र खरं की, परक्या देशात असल्यामुळं आपल्या सणांचं, आपल्या सगळ्यांचंच इथं फार प्रेम वाटायला लागतं नाही का ? नि म्हणूनच दिवाळी साजरी करायचं ठरविलं आहे. खूप मोठी फीस्ट करणार आहो आम्ही शुक्रवारी.

तू बॉक्सिंग करू नयेस असं अजूनही मला वाटतं.

पौंडाचा भाव कमी झाला तेव्हा इथं काही सुद्धा गडबड झाली नाही. आम्हांला तर ते दुसऱ्या दिवशी कळलं. असो.

तुझी
**ताई**

लिव्हरपूल
२५-१०-४९

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

आपण सर्वांनी मिळून लिहिलेलं पाकीट आजच मिळालं. लागलीच उत्तर लिहायला बसले आहे. आज सर्वांना अगदी सविस्तर पत्रे लिहायची असं ठरविलं आहे मी. मागील पत्रात इथल्या हवेचं फार कौतुक केलं ना मी ? पण गेले दोन दिवस अगदी भिकार हवा पडली आहे. संध्याकाळपर्यंत कसं तरी बरं असतं; पण रात्री पावसाला सुरुवात होते, ती दुसरे दिवशी दुपारपर्यंत झिमझिम चालू असते. अंधार तर इतका पडला आहे की, आता मी हे पत्र फायरप्लेस-

जवळ दिवा लावून बसून लिहीत आहे. कदाचित उद्या चक्क ऊन पडेल. काही सांगता येत नाही. इंग्लिश लोक हवेला "लहरी" म्हणतात ते काही खोटं नाही. काही जण म्हणतात की, यंदाचा उन्हाळा चांगला झाला म्हणून हिवाळा वाईट जाईल. तर काही लोक म्हणतात हिवाळाही चांगलाच जाईल. मला मात्र आत्यंतिक थंडी पहायची आहे. इथं बर्फ कसं पडतं हे पाहायचं आहे. बर्फा-वरून घसरण्याचा तो प्रसिद्ध खेळ पाहायचा आहे.

तुम्ही तुमच्या पत्रात "ही मुलगी म्हणजे सामान्य नाही" असं म्हटलं आहे. कालच्याच रविवारी राजगोपाल मला म्हणाला ते हेच. त्या वेळी सहज चमचे मागायला त्याच्यापाशी गेले होते. तो म्हणाला —जरा बसा ना —तशी मी म्हणाले, बसायला वेळ नाही. त्यावर तो म्हणतो कसा... सगळ्या स्त्रिया वेळ नाही असं म्हणतात; पण तासन्तास बसतात. तुम्ही मात्र निराळ्या आहात. रामलिंगम देखील म्हणाला, "हेच मी आत्ता म्हणणार होतो." मी आश्चर्यानं विचारलं" "हे कसं ?" तर दोघंही म्हणाले–" इतर सर्वसाधारण स्त्रियांच्या प्रमाणं तुमचा स्वभाव नाही. तुम्ही अगदी स्वतंत्र वृत्तीच्या आहात. तुम्हांला तुमचे स्वतःचे विचार आहेत. दुसऱ्याला आपलं म्हणणं पटवून देण्याची तुमची हातोटी तर विलक्षण आहे. कुणाला न दुखविता..."

तुमचे माझ्याबद्दलचे विचार वाचले म्हणून हे लिहावंसं वाटलं. तुम्ही लिहिलं आहे की मी आशावादी आहे. होय. खरंच. जीवन सुखी करायचं असेल तर माणसानं आशावादीच असायला पाहिजे. निराशावादी लोक स्वतःचं आयुष्य दुःखी करतातच; पण आपल्या बरोबर सर्वांना उदासवाणं जिणं कंठायला भाग पाडतात ! ...

...आम्ही इथं दिवाळी खूपच चांगली केली. दरवर्षीप्रमाणं यंदाही शेवटच्या दिवसापर्यंत फराळाचं करायला मला उत्साह येईना. मात्र अप्पानं पाठविलेले फोटो गुरुवारी मिळाले. तुम्ही सर्वजण माझं इतकं कौतुक करता हे बघून मग मला एकदम हुरूप आला. एक वाजता मी फराळाचं करायला बसले. रात्री दहा वाजेपर्यंत चिरोटे, शंकरपाळी, भाजणीची कडबोळी, काजूच्या वड्या, काशीमावशी करते तसे रव्याचे लाडू, शुक्रवार सकाळसाठी श्रीखंड, पुऱ्या, इतके जिन्नस केले. साखरपाऱ्याच्या वड्या बाईनं कळविल्या तशा करायचा

प्रयत्न केला. पण इथला सोडा फारच स्ट्रॉंग असल्यामुळं वडी इतकी कडू झाली की, तोंडात घालवेना ! तेवढा एक पदार्थ सोडला तर बाकीचे सारे जिन्नस छान झाले. बदाम वाटायला काही नसल्यानं बदामाऐवजी मी काजूच्या वड्या केल्या. तसंच इथं गिरण्या नसल्यामुळं लाडूसाठी डाळीचा रवा कसा काढला हा तुम्हांला प्रश्न पडेल. त्यासाठी मी माझं डोकं चालविलं. मिसेस दीन नावाची एक हैदराबादची बाई इथं आहे. तिच्याकडं कॉफी पावडर करायचं यंत्र आहे. ते पाहून मला कल्पना सुचली व तिच्याकडून ते यंत्र मागून घेऊन मी त्यात डाळीचं पीठ करून घेतलं. अगदी छान रवा पडला. तसंच लाडूसाठी नारळ लागतो. या देशात नारळ मिळणं कठीण. इथं एका चिनी माणसाचं दुकान आहे. त्याच्याकडं नारळ मिळतो का बघावं म्हणून मी गेले. माझं नशीब इतकं बलवत्तर की आदल्याच दिवशी जहाजातून त्याच्याकडं पंधरा नारळ आले होते. मला त्यानं चटकन दोन दिले. किंमत मात्र जबरदस्त, म्हणजे दोन नारळांना सात रुपये द्यावे लागले ! नंतर ते खोवायचा प्रश्न आला. चमचे काटे होते. त्यांतले दोन काटे उभे ठेवून त्यावर नारळ खोवून काढला. वेळ खूप लागला त्याला, पण छान कीस पडला. दुसरा नारळ फोडून त्याच्या करंज्या करायचा बेत त्यामुळं रहित करावा लागला. नारळाचे व रव्याचे हे लाडू फारच छान झाले होते. अगदी मोतीचुराच्या लाडवासारखे लागत होते. अजूनपर्यंत मी कधी पाक केला नव्हता त्यामुळं जरा भीती वाटत होती. पण जमून गेलं सारं. तुमची सर्वांची खूप आठवण झाली. तुम्ही माझं खूप कौतुक केलं असतं.

तुम्ही जेवायला सुरुवात केलीत म्हणून तुम्हांला शंकरपाळीं करून द्यायची, मगच आपण खायची असं मी गेल्या वर्षीपासून ठरविलं होतं. यंदा आपण शंकरपाळीं करायची नाहीत असं जवळ जवळ ठरलं होतं. पण हल्दार नावाचे एक बंगाली गृहस्थ इथं आले होते ते हिंदुस्थानला परत जाणार आहेत. त्यांच्याबरोबर तुम्हांला देण्यासाठी शंकरपाळी केली. खूप छान झाली होती. पण प्रत्येकजण म्हणाला की, एकवीस दिवस टिकतील की नाही कुणास ठाऊक ! नमुन्यासाठी दहा-पंधराच पाठवीत आहे. चांगली राहिली तर तुम्हांला नक्की आवडतील. प्रेझेंट आणायला वेळ झाला नाही म्हणून बाळासाहेबांसाठी जे आणलं होतं तेच मी तुमच्याकडं पाठविलं. त्यांना दुसऱ्या दिवशी नवीन आणलं.

गुरुवारी रात्रीपर्यंत हे सारं केल्यामुळं शुक्रवारी सकाळी सहा वाजता उठले. सहा वाजताही खूप अंधार होता. उठून वासाचं तेल लावून बाळासाहेबांना आंघोळ घातली. फक्त उटणं नव्हतं. औक्षण सुद्धा केलं. नीरांजन नव्हतं म्हणून बाटलीच्या टोपणात वात लावली. नंतर राजगोपालनं कच्चे पोहे आणले होते त्याचे फोडणीचे पोहे केले. साडेआठला आम्ही फराळाला बसलो. किती तरी पदार्थ होते. पोहे, श्रीखंड, पुरी, बटाट्याची भाजी, लाडू, वड्या, चिरोटे, शंकरपाळी, कडबोळी, दही, लोणचं... आम्ही फराळाला बसलो तेव्हा सर्व लोक दिवाळीचं अभीष्ट चिंतन करायला आले. मग त्यांनाही प्रत्येकाला थोडं थोडं फराळाचं दिलं. सर्वजण म्हणाले की हे इतके पदार्थ इंग्लंडमधे खायला मिळाल्यानं आम्ही इंग्लंडमधे असल्याप्रमाणं वाटतच नाही ! खरोखरच आज दिवाळी आहे असं वाटतंय !" त्यांतले कित्येकजण तीन-तीन वर्षं इथं राहिलेले आहेत. पण यांतला एखादाही पदार्थ त्यांनी इंग्लंडमधे पाहिला नव्हता. इतके सगळे एकदम तर लांबच राहिले !

फराळ झाल्यावर थोडं शॉपिंग करून आले. मग आमच्या घरी स्वैपाकाला सुरुवात केली. फ्लॉवरचा भात, परोठे, बटाटेकांद्याची भाजी, टोमॅटोची चटणी, संदेश, गाजराचा हलवा, कटलेट्स इतके जिन्नस करून रात्री सगळं घेऊन आम्ही तेरा नंबरच्या हॉलमधे गेलो. प्रत्येकानं आपला प्रांतीय पोशाख केला होता. नऊवारी साडी नेसायला मला वेळ झाला नाही म्हणून मी पाचवारीच शालू नेसले होते. मद्रासी मुलं लुंगी नेसून गंध लावून आली. लँडलेडी व एक चिनी डॉक्टर असे सारे मिळून एकूण बत्तीसजण जमले. फटाकडे उडवले. तरीत चौधरी नावाचा एक बंगाली रेडिओस्टार आहे त्यानं गाणी म्हटली. जेवताना रेकॉर्डस् लावल्या. एकंदरीत प्रत्येक जण त्या दिवशी खूपच आनंदी होता.

आत्तापर्यंत इतक्या लोकांचा स्वैपाक मी एकटीनं कधी केला नव्हता. या वेळीही सगळ्यांनी भाजी चिरून देण्याची वगैरे खूप मदत केली. बाळासाहेबांनी देखील मदत केली. एकही पदार्थ कमी पडला नाही. भरपूर खायला मिळालं प्रत्येकाला. उरलंही काही नाही हे बघून मला बरं वाटलं. इथं दुधाला रेशन असल्यामुळं 'संदेश' व गाजराच्या हलव्याला जे दूध लागले ते टिप्स देऊन आम्ही मिळवलं. एका ओळखीच्या बाईनं दोन डझन केळी बिन रेशनकार्डाची

आम्हांला दिली. साखरही तशीच सर्वांनी मिळून मिळवली. इथं टिप्स दिल्यानं काम भागतं.

रात्री साडेबारा वाजता राष्ट्रगीत म्हणून आम्ही आमचा दिवाळीचा कार्यक्रम संपविला.

मला नाही वाटत, या देशात आमच्याइतकी इतर कुणी इतकी चांगल्या प्रकारे दिवाळी साजरी केली असेल. पाडव्याच्या दिवशी मी खूप थकून गेले होते. पण शेजारच्या खोलीतल्या मुलांनी येऊन खरकटी भांडी देखील धुवून दिली. मग काही स्वैपाक न करताना आम्ही फराळाचंच खाल्लं.

रविवारी आम्ही मिस्टर व मिसेस मॅक यांना जेवायला बोलावलं. सहज्गत्या हिरव्या मिरच्या मिळाल्या त्या घालून पिठलं केलं व पोळ्या केल्या. मॅक दांपत्याला हे जिन्नस फारच आवडले. हे इंग्लिश लोक कोणतीही वस्तू जेवताना मागत नाहीत. सेकंड हेल्पिंगची पद्धत नसते. पण मॅक दांपत्याने पुनःपुन्हा मागून घेऊन खाल्ले. त्यांना लाडू, शंकरपाळी तर फार आवडली. हे लोक जरी आले होते तरी त्या दिवशी भाऊबीज असल्यानं मला सारखी घरची आठवण होत होती. आज कुसूम असती तर तिनं सर्वांना ओवाळलं असतं ...

असो. तुमच्यासाठी करायला घेतलेला स्वेटर अजून पुरा झाला नाही म्हणून हलदार यांच्याबरोबर पाठविता आला नाही, आपल्या प्रकृतीस जपत जावे. ती. सौ. बाईस सा. न.

तुमची
**ताई**

लिव्हरपूल
**३१-१०-४९**

प्रिय माधव,

तुझं १२ तारखेचं पत्र २२ ला मिळालं. एक तारखेपासून बारा तारखेपर्यंत तेरा दिवस होतात हे वाचून तुझं मॅथेमॅटिक्स चांगलंच सुधारलंय असं वाटलं!

पण एकंदरीत तू पत्र चांगलं लिहिलं आहेस. असाच सराव ठेवलास तर एक चांगला पत्रलेखक होशील.

तुम्हां सर्वांना मी केव्हा एकदा मोटार घेते असं होऊन गेलंय. आम्हांलाही मोटार घ्यायची घाई झाली आहेच. पण पैसे पाहिजेत ना! महिना हजार-बाराशे पगार मिळत असला तरी खर्चही तितकाच होतो आहे. मोटार घेण्या-साठी हिंदुस्थानातून पैसे मागवायला पाहिजेत. पण इथं इतका पगार मिळत असल्यामुळं कोणाच्या तरी मार्फतच हिंदुस्थानातून पैसे मागवावे लागतील. त्याची खटपट चालू आहे. अर्थात केव्हा ते सांगता येत नाही.

तू लिहिलं आहेस की, सारखी पत्रं लिहून कंटाळा आला काय? मला पत्रे लिहिण्याचा कंटाळा नाही येत. पण आजकाल पूर्वीसारखा वेळच मिळत नाही. या दुसऱ्या जागेत आल्यापासून सगळं काम करताना मला रात्रीखेरीज पलंगावर बसायलाही फुरसत होत नाही. झोपेच्या बाबतीत पक्के इंग्लिशमन झालो आहोत आम्ही. इंग्लिश माणूस दुपारी कधी झोपत नाही. इथं सर्व काम उभ्यानं करावं लागतं. तुम्हांला आश्चर्य वाटेल, एकेक दिवस मला खाली बसायलाही मिळत नाही. इथं आता माझ्या ओळखीही खूप झाल्या आहेत. रोज कुणीना कुणी तरी येतं किंवा आम्ही तरी त्यांच्याकडं जातो. दर वेळी नवीन काही तरी खायला करावं लागतं. आता तर दिवस लहान झाला आहे. पण अंधार पडला तरी इथल्या लोकांच्या कार्यक्रमात काही फरक पडत नाही. हे लोक उजेडाकडं पाहण्याऐवजी घड्याळाकडं पाहून सर्व कामं करीत असतात. आम्हीही आता त्याच प्रमाणं वागत आहोत. प्रथम प्रथम विचित्र वाटायचं पण आता त्याचं काही वाटत नाही.

अजून इतरांना पत्रं लिहायची आहेत; तेव्हा पुरे करते हं.

तुझी
**ताई**

16 A ॲबरक्रॉम्बी स्क्वेअर
लिव्हरपूल
१५-११-४९

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

आपण सांगितल्याप्रमाणे यापुढं मी दर आठवड्याला एक पत्र घालीत जाईन. आपल्याला एकटं राहावं लागतं, त्यातून ब्राह्मणगाव हे मलेरियाचं

गाव आहे हे वाचून काळजी वाटली. ब्रँचहून सामान हालवून पुण्याला नेण्यासाठी सौ. बाई आली होती ना ? दिवाळीच्या आधी ती आजारी होती, ती कशानं ? प्रवासाची दगदग झाली काय ?

माझं दिवाळीचं वर्णन आपल्याला आवडलं हे वाचून आनंद झाला. आपणा सर्वांच्या पासून दूर-परदेशात-दिवाळी साजरी करण्यात मला फारसा आनंद वाटला नाही हे जरी खरं असलं तरी इथं आलेल्या एकस्या-दुकट्यांच्या जीवनात दिवाळीच्या या समारंभामुळं क्षण काळ आनंद चमकून गेला हे खरं. कुठंही असलो तरी माणसांनी आपला उत्साह सोडू नये. इंग्लंडमधे इतकी व्यवस्थित दिवाळी साजरी करता येईल की नाही याची कुणाला मुळीही कल्पना नव्हती. अशक्य वाटणारी गोष्ट मी कष्टानं शक्य करून दाखविली. याचा मला अभिमान वाटतो. ‘ इंग्लंडातील दिवाळी ’ या नावाचा एखादा सविस्तर लेख लिहून तो आपल्याकडील एखाद्या मासिकात छापायला देण्याचा माझा विचार आहे. पण तो लेख लिहायला वेळ होईल तेव्हा ना !

इथं आम्ही सर्व कामं स्त्री-पुरुषांनी मिळून केली याचं आपल्याला आश्चर्य वाटलं. पण इथं-इंग्लंडमधे-स्त्रीपुरुष असा भेदाभेद इथले लोक मुळीच करीत नाहीत, मग त्यांचे पाहुणे म्हणून आलेल्या आम्ही तरी का करावा ? आपल्याकडं पुरुषांना वाटतं, आम्ही काय म्हणून घरातली कामं करावी ? पैसे मिळवीत नाही का आम्ही ? घरातली कामं करण्याची जबाबदारी स्त्रीची आहे. पुरुषाची नाही...एक ना दोन. इथं पुरुष जसे नोकरी करतात तशा त्यांच्या बरोबरीनं स्त्रियाही करतात. आता आपल्याकडंही पुष्कळ स्त्रिया नोकरी करू लागल्या आहेत म्हणा. पण त्यांच्याही घरच्या पुरुषांना घरकाम करण्याचं काम स्त्रियांनीच केलं पाहिजे असं अजूनही वाटतं.

हिंदुस्थानात असताना इंग्लिश साहेबांच्या मेमसाहेबा नोकर लोकांवर ओरडून त्यांच्याकडून सारी कामं करून घेताना पाहिल्या होत्या, म्हणून या बायका ऐदी असतात अशी एक कल्पना झाली होती. पण इथं पहावं तर सारा प्रकार वेगळाच. या लोकांना फारसं काही बाजारातनं विकत आणणं आवडत नाही. तसं पाहिलं तर बाजारात सर्व काही आयतं तयार मिळतं. पण इंग्लिश स्त्रियांना घरी सगळं काही करणं फार आवडतं. कपडेही बाहेर धुवायला द्यायला त्या

तयार नसतात सहसा. त्या म्हणतात, कुणाचे कपडे घाणेरडे असतात, कुणाला काही रोग झालेला असतो. त्यांच्या कपड्यांबरोबरच आपले कपडे धुणं नको! कपडे धुण्याचं मशीन घरी घेणं हे सगळ्यांनाच काही शक्य नसतं, पण कपडे पिळण्याचं मशीन पुष्कळांच्या घरी असतं. कपडे धोब्याकडं न पाठविता घरी धुण्यासाठी जर नोकर ठेवायचा असेल तर इथं सरकारकडून तशी मंजुरी मिळवावी लागते. हे काम स्त्रियांचं, हे काम पुरुषांचं असा भेदभाव नाही. मी माझं घर स्वतः स्वच्छ ठेवतो असं म्हणताना इथल्या प्रत्येक माणसाला किती अभिमान वाटतो! यालाच Dignity of Labour म्हणायचं, नाही तर काय?

माझा सारा दिवस असाच इथं उद्योगात जातो. पण परत आपल्या घरी आल्यावर माझ्या हातून इतकं करणं होईल की नाही, काही सांगता येत नाही. कारण हा इथल्या हवेचा गुण आहे. माणसाला नेहमी उत्साह वाटतो. बाळासाहेबांमधेही असाच फरक झालेला आहे. पुण्याला असताना ऑफिसातून आल्यावर वर्तमानपत्र नाही तर पुस्तक वाचीत बसणारे बाळासाहेब इथं दिवसभर पलंगावर बसत देखील नाहीत. सुट्टीच्या दिवशी सुद्धा! फॅक्टरीतून आल्यावर मला थोडी थोडी मदत करतात प्रत्येक कामात. इतकं करूनही जेवण झाल्यावर खूप लांब आम्ही फिरायला जातोच. एकंदरीत बाळासाहेबांची स्वारी इथं अगदी खुषीत आहे. जेवण घरीच असल्यामुळं खाण्यापिण्याचाही काही प्रश्न पडत नाही. नि माझ्यासारखे प्रेमाचे धागेही नाहीत त्यांना हिंदुस्थानात. मला मात्र तुम्हां सर्वांची सारखी आठवण येते. लौकर परत यावंसं वाटतं.

इथं सध्या खरीखुरी नोव्हेंबरची हवा आहे. दुपारी चारलाच अंधार पडतो. सगळीकडं दिव्यांचा चकचकाट सुरू होतो. पाच तारखेला आम्ही इथून पाचसहा मैलांवर असलेला "स्पीक हॉल" पाहायला गेलो होतो. दोन अडीचशे वर्षांपूर्वीची इमारत आहे ही. तेव्हाचं फर्निचर, तेव्हाची भांडी सारं काही व्यवस्थित ठेवलं आहे अजून. इथले पूर्वीचे लोक तांब्याची भांडी कल्हई करून वापरीत होते. आपल्याकडल्यासारख्या लोखंडाच्या शेगड्या वापरीत होते. आता मात्र खेड्यापासून शहरापर्यंत सगळीकडे इलेक्ट्रिक कुकर नाही तर गॅसकुकर असतो. स्पीक हॉल दाखवणाऱ्या माणसाला जेव्हा मी म्हटलं की, अजून आमच्याकडं असली भांडी व शेगड्या वापरतात, तेव्हा त्याला फार आश्चर्य वाटलं!

आपल्याकडं होळी पौर्णिमा करतो तशी इथं पाच नोव्हेंबरला फायर करतात. आपल्याप्रमाणेच इथंही मुलं आधीपासून चोरून कुणाची लाकडं, कुणाच्या बागेचं फाटक, फळ्या, मोडकं फर्निचर असं गोळा करीत असतात. बॉनफायरच्या रात्री त्या सगळ्यांची होळी करतात. आपल्याकडं होळी हा धार्मिक सण समजला जातो. पण इथला हा बॉनफायर धार्मिक नाही. गनपॉवडर प्लॉटपासून या खेळाला सुरुवात झाली आहे म्हणे. पार्लमेंटच्या तळघरात साठवून ठेवलेला दारूगोळा पेटवून देण्याचा गाय फॉक्सचा कट उघडकीला आल्याचं आपण इतिहासात वाचलं आहे. त्यामुळंच इथली मुलं कागदाचा गायफॉक्स तयार करतात व त्याला बॉनफायरमधे जाळतात. बॉनफायरच्या रात्री हे लोक फटाके देखील उडवतात. मिसेस मॅकच्या घरासमोरच एक मोठा बॉनफायर होणार होता तो आम्ही बघायला म्हणून स्पीक हॉलहून परत आल्यावर त्यांच्या घरी गेलो. रात्री फायर पाहूनच घरी आलो. किती गर्दी होती तिथं. लहान-मोठी, तरुण-म्हातारी सारी माणसं होती. किती तरी दारू उडविली सर्वांनी. पण आरडाओरडा नि आपल्याकडल्या सारखे अश्लील शिव्यागाळीचे प्रकार मात्र ऐकू आले नाहीत. मजा करताना सुद्धा या लोकांच्यामधे एक प्रकारची नैतिक शिस्त जाणवते.

काल नेहरूंच्या वाढदिवसासाठी आम्हांला ब्रिटिश कौन्सिलमधे फिल्म दाखविली. Nehru's visit to Bombay... चौपाटीवर झालेलं त्यांचं भाषण...तो ऐकायला आलेला प्रचंड जनसमुदाय...दिल्ली बोटीला त्यांची भेट...

दिल्ली बोट पाहून तिच्या जगी मला एकदम S. S. Chitral दिसू लागली. बॅलार्डपिअरवर उभ्या असलेल्या जनसमुदायामधून मला तुम्ही...बाई...अण्पा ... माधव...शरद...रत्ना...शशी...सारे दिसू लागले. त्या संभ्रमावस्थेतच मी किती तरी वेळ पडद्याकडं बघू लागले. तेवढ्यात फिल्म संपली व सगळीकडं उजेड झाला. असा राग आला मला ती संपल्याचा !

त्या फिल्मनंतर Glimpses of Gandhiji ही फिल्म दाखविली. लहान-पणापासून गांधीजींचे निरनिराळ्या वेळचे फोटो जुळवून त्यांची ही फिल्म तयार केली आहे. इथले लोक गांधीजींना फार मानतात. फिल्ममधे का होईना गांधीजींचं दर्शन झालं असं समजून आनंदित होतात. माझ्या मते ही फिल्म

अगदी वेकार होती. गांधीजी जिवंत असताना निरनिराळ्या न्यूज रीलमधे त्यांचे किती तरी प्रसंग चित्रित केलेले आहेत. त्यांतले ठळक प्रसंग एकत्रित केले असते तर किती चांगलं झालं असतं. पण या फिल्ममधे गांधीजींचे किती जुने जुने फोटो दाखविले होते...पाहून आपल्याला प्रश्न पडतो... हेच का गांधीजी ? परदेशात दाखविल्या जाणाऱ्या फिल्म्स खूपच चांगल्या असाव्यात. नाही का ? असो. आपल्या प्रकृतीस जपत जावे.

तुमची
**ताई**

लिव्हरपूल
२-१२-४९

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

...गेला सबंध आठवडा माझा फारच गडबडीचा गेला. आता हवा वेकार पडायला लागल्यामुळं फिरायला जायचं नसतं. हॉलिडे सेंटर्सही आता बंद आहेत. त्यामुळं वीकएंड ट्रिप्स बंद झाल्या आहेत. त्यामुळं आता मला घरी खूप रिकामा वेळ मिळत असेल अशी तुमची कल्पना आहे. ती मात्र चुकीची आहे. कारण उन्हाळ्यात सर्वच जण बाहेर पडत असल्यामुळं फारसं कुणी कुणाला घरी बोलावीत नसत. त्या वेळी आमच्याशी फारशा ओळखी झालेल्या नव्हत्या. पण आता खूपच ओळखी झाल्या आहेत. हे सारे लोक आम्हांला बोलावतात. अर्थात त्यांना आम्हांलाही बोलवावं लागतं. हा सारा आठवडा असाच गेला.

आजकाल थंडी असल्यामुळं उठायला उशीर होतो. सकाळचा ब्रेकफास्ट, कॉफी वगैरे होईपर्यंत अकरा वाजतात. मग बाळासाहेब फॅक्टरीत जातात. नंतर मी खोली साफ करणं वगैरे करते. डिशेस् साफ करणे, लंचसाठी तयारी करणे हे सारे होईपर्यंत एक वाजून जातो. मग लागलीच संध्याकाळी येणाऱ्या

लोकांच्यासाठी तयारी करावी लागते. रोज काही तरी नवीन खायला करावं लागतं. आमच्या घरी येणाऱ्या इंग्लिश लोकांना साहजिकच काही इंडियन डिशेस् खाण्याची इच्छा असते. हे पदार्थ तयार करून ओव्हनमधे ठेवून दिले की, संध्याकाळपर्यंत छान गरम राहतात. नंतर मी वेणी वगैरे घालून कपडे करीतोपर्यंत बाळासाहेब घरी येतात. मग आम्ही गप्पा मारून जेवण करतो. जेवणाच्या बाबतीत आम्ही इथं पक्के इंग्लिशमन झालो आहोत. आपल्याकडल्यासारखे दहा-बारा पदार्थ करीत नाही. एक मेन डिश व एक स्वीटडिश. इथले लोक पाणी पीत नाहीत. जेवणाच्या वेळी टेबलावर कॉफी तयार ठेवावी लागते. सुरुवातीला आम्ही पाणी पीत होतो; पण आता आमचंही पाणी पिणं खूपच कमी झालं आहे. एखादे वेळी पाणी प्यालोच तर पोटातून कळा यायला लागतात. त्यापेक्षा हॉट ड्रिंक घेतलं तर थंडीत खूपच बरं वाटतं.

सध्या ख्रिसमस सीझन असल्यामुळं शॉपिंगला अगदी जत्रेसारखी गर्दी असते. बहुतेक सारी दुकानं ( Decorate ) डेकोरेट केलेली असतात. शो-विंडोज प्रत्येक दुकानाला असतात. आपल्याकडं अशा चोवीस तास बाहेरून दिसणाऱ्या शो-विंडोज फारच थोड्या दुकानांना आहेत. पण त्यांनाही लोकांचा फार त्रास होत असतो. रात्री कुणी येऊन काचा फोडून जाईल याचा नेम नाही ! इथं कुणीही असं करणार नाही. शो-विंडोमधे प्रत्येक वस्तू किमतीचं लेबल लावून ठेवलेली असते. आपल्याला पाहिजे ती वस्तू घ्यावी व ती वस्तू व पैसे काउंटरवरल्या बाईला द्यावेत. म्हणजे मग नीट पॅकिंग वगैरे करून ती वस्तू परत आपल्या हाती दिली जाते. कोणतीही वस्तू कागदात बांधून दिल्याशिवाय राहात नाहीत; अगदी कांदे, बटाटे देखील कागदाच्या पिशवीत मिळतात ! त्यामुळं भारी किमतीची आपली पिशवी सुद्धा कधी खराब होत नाही. शिवाय गुंडळायचे कागदही काही वर्तमानपत्रांचे नसतात. जुन्या पुस्तकांचे किंवा वर्तमानपत्रांचे कागद इथं खाद्यपदार्थांना बांधायला कायद्याने बंदी आहे. कारण ही रद्दी लोकांच्या घरची असते व प्रत्येकाचे हात लागलेले असल्यामुळं ते कागद स्वच्छ असतात असं नाही. म्हणून इथं प्रत्येक वस्तू गुंडाळण्यासाठी नवा ब्राउन-पेपर उपयोगात आणला जातो.

शॉपिंगवरून हे विषयांतर झालं.

इव्हॉन्स नावाचा यांच्या फॅक्टरीतला एक बडा अधिकारी आहे. त्यानं परवाच आम्हांला त्याच्या घरी बोलावलं होतं. फॅक्टरीतल्या सगळ्याच हिंदुस्थानी

अनुक्रम ३८६५२ वि: ...
३९५ ... दि. ...


लोकांचा तो बॉस आहे. त्यानं कधी कुणा इंडियनला आजपर्यंत घरी बोलावलं नाही म्हणे. आम्हांला बोलावलेलं कळल्यावर सगळ्यांना जरा हेवा वाटला. आम्हांला त्याच्या घरी नेण्यासाठी तो स्वतः मोटार घेऊन आला होता नि रात्री साडे अकराला त्यानं परत आम्हांला आणून सोडलं. त्याच्या बायकोनं मोठ्या उत्साहानं कुकरीचं पुस्तक वाचून, तांदूळ, करी पॉवडर वगैरे विकत आणून आमच्यासाठी भात नि एगकरी केली. आम्हां दोघांनाही तिचं फार कौतुक वाटलं. एक गोष्ट मात्र इथंही विशेष वाटली. इव्हॉन्स एवढा मोठा ऑफिसर आहे पण त्याच्याही घरी नोकर नाही ! सारं काम मिसेस इव्हॉन्सच करते. मिस्टर इव्हॉन्स घरी असला म्हणजे बायकोला बरोबरीनं मदत करतो.

कालच्या मंगळवारी इव्हॉन्स दांपत्याला आम्ही आमच्या घरी बोलावलं होतं. त्यांच्यासाठी मी पॅनकेक केले होते. साबूदाण्याची खिचडीदेखील केली. केक मी स्वतः घरी करून त्यांच्यावर ' आईसिंग ' केलं होतं हे त्यांना खरं वाटेना ! केवळ उपचार म्हणून ते असं म्हणाले असं नव्हे. तर इंग्लिश मॅनर्स सोडून त्यांनी तीनतीनदा या वस्तू मागून घेऊन आवडीनं खाल्या ! एवढी मोठी केक, पण ती त्या दोघांनीच खाऊन फस्त केली. खिचडीला इंग्लिशमध्ये काय म्हणतात हे तो मला विचारायला लागला. पण ती आम्हां महाराष्ट्रीयांची स्पेशल डिश आहे असं सांगितल्यावर तो म्हणाला — मग खिचडी खायची इच्छा झाल्यावर तुमच्या घरीच आलं पाहिजे ...

मागच्या शुक्रवारी फॅक्टरीतील ट्रेनिंग खात्याच्या इन्स्ट्रक्टरांचे वार्षिक जेवण होते. मिस्टर मॅक हा इन्स्ट्रक्टर आहे. त्यानं आम्हांला आग्रह केल्यामुळं व आम्हांलाही इंग्लिश लोकांचं स्पेशल फंक्शन कसं असतं ते पाहायचं असल्यामुळं आम्ही मुद्दाम गेलो. प्रत्येकी दहा रुपये तिकीट होतं. एका मोठ्या हॉटेलमधे हे डिनर होतं. टेबलावर प्रत्येकाच्या नावाच्या चिठ्या ठेवल्या होत्या. त्याप्रमाणं प्रत्येकानं आपापली जागा घ्यायची. कुणी कुठं बसावं हे सांगायची जरूर नव्हती. बसताना एक स्त्री व एक पुरुष असं बसायचं. तसंच शेजारी एकमेकांचे नवराबायको न येता ते एकमेकांच्या समोर येतात. पहिल्याने सूप नंतर टर्की नि त्यानंतर ट्रायफल. ट्रायफल म्हणजे एखादी स्वीट डिश असते. मग कॉफी असा डिनरचा बेत होता. मी टर्की खात नसल्याने माझ्यासाठी स्पेशल

मॅकॅरोनी ( व्हेजिटेबल डिश ) केली होती. पण ती मला आवडली नाही. मी फक्त ट्रॉयफलवरच भागविलं ! डिनरनंतर सर्वजण बॉलरूममधे गेले. तिथं डान्स, टॅप डान्स, नकला असा कार्यक्रम झाला. काही काही डान्सच्या वेळी हजर असलेल्या सर्वांना डान्स करावा लागतो. अर्थात अशा तऱ्हेचे सर्वांनी करायचे डान्स सोपे असल्यामुळं आम्हीही त्यात भाग घेतला. आणखी एका डान्सच्या वेळी प्रत्येकाच्या डोक्यावर विदूषकासारख्या कागदाच्या टोप्या घालतात. आम्हीही अशा टोप्या घालून नाचलो. मी या टोप्या घरी आणल्या आहेत.

एकंदरीत कार्यक्रम फारच छान झाला. असल्या सोशल फंक्शनचं वैशिष्ट्य म्हणजे येणाऱ्या बायका खूप चांगले चांगले ड्रेस करून येतात. हेअर ड्रेसरकडं जाऊन निरनिराळ्या फॅशनच्या कट्स करून येतात. आजच्या डिनरला आपण सर्वांत चांगलं दिसावं असा प्रत्येक स्त्रीचा प्रयत्न असतो. मी माझा नवा घेतलेला शालू व बनारसी झंपर घातला होता. इथल्या लोकांची ड्रेसविषयी कल्पना म्हणजे किती उंची सिल्क आहे हे पाहण्यापेक्षा शिवण्याची फॅशन पाहायचं. आपल्यासारखं जरीचे कपडे किंवा सोन्यामोत्याचे हव्यास या लोकांना नाहीत. त्यामुळं मी नेसलेली भरजरीची साडी इलेक्ट्रिक प्रकाशात चकाकत होती ती सर्वांच्या डोळ्याचा विषय झाली होती. कितीतरी बायकांनी व ओळखीच्या पुरुषांनी मुद्दाम माझ्याकडं येऊन सांगितलं की आजच्या रात्रीचा सगळ्यांत बहारदार पोशाख माझा होता म्हणून ! You look very beautiful in this dress ! एरवी असं कुणी मला म्हटलं असतं तर कससंच वाटलं असतं, पण त्या दिवशी असं ऐकून बरं वाटलं, व आपला भारतीय ड्रेस सर्वांत चांगला ठरला याबद्दल अभिमानही वाटला.

आज रात्री ब्रिटिश कौन्सिलमधेही इंडियन एम्बॉसीनं डान्स ठरविला आहे त्याला आम्ही जाणार आहोत. अर्थात इंडियन लोक कसा डान्स करतील हा एक प्रश्नच आहे. बघायला म्हणून जायचं झालं. दुसरं काय ?

पत्र तर खूप मोठ्ठं झालं. आता तुमच्या एकेका प्रश्नाला उत्तरं देते.

इथं सध्या किमान उष्णतामान ३८ ते ४० च्या दरम्यान असतं. कमाल ४५ ते ४८. सूर्योदय आज सकाळी आठ वाजून दोन मिनिटांनी झाला व सूर्यास्त तीन वाजून चोपन्न मिनिटांनी. आत्ता पाच वाजायला आलेत. तेव्हा मी रात्रीच पत्र लिहिते आहे असं म्हणायला हरकत नाही. सध्या जरी थंडी

पडत असली तरी या लोकांचा खरा हिवाळा अजून सुरू नाही झाला. सध्या Autum चालू आहे. एकवीस डिसेंबरपासून विंटर सुरू होईल. मार्चपासून स्प्रिंग सुरू होतो. आम्ही बहुतेक मार्चअखेर लिव्हरपूल सोडू.

इथं येण्यापूर्वी सर्वांना सारखंच ट्रेनिंग द्यायचं असं वाटून इथल्या लोकांनी एकच ट्रेनिंग प्रोग्राम आखला. पण प्रत्येकाच्या ज्ञानात फरक आहे हे कळून आल्यामुळं प्रोग्राम बदलावा लागला. स्टोन या गावी रेग्यूलर ट्रेनिंग स्कूल आहे तिथं बाळासाहेबांना शिकण्यासारखं फारसं काही नाही. एक तारखेला इतर काहीजण त्या स्कूलला गेले. मार्चमधे बाळासाहेब फक्त एकदोन आठवड्यांसाठी तिथं जातील. त्या वेळी मी स्टोनला जाणार नाही. इथंच मिसेस मॅककडं राहीन.

मिसेस मॅक खरोखरच माझी मावशी आहे. तिच्याकडं गेलं की अगदी घरी गेल्यासारखं वाटतं. सौ. बाईहून ती वयानं ज्यास्त आहे. टॉमही तुमच्यापेक्षा एकदोन वर्षांनीच लहान आहे. त्यांना बाळासाहेबांच्या वयाचा मुलगा आहे. त्याचं लग्न झालं आहे. सिल्व्हिया नावाची त्यांची एक मुलगी होती पण ती १९४७ मधे वारली म्हणे. माझा स्वभाव, आवडीनिवडी त्यांच्या सिल्व्हियाशी मिळत्याजुळत्या आहेत असं ते म्हणतात. त्यामुळं ती दोघं माझ्यावर मुलीप्रमाणं माया करतात. टॉम व लुई वयानं जरी मोठे आहेत तरी मनानं खूप तरुण आहेत. आपल्याकडं तिशीच्या पुढं मनुष्य गेला की म्हणायला लागतो— आता आमचं काय राहिलं ? आता म्हाताऱ्यांत आमची गणना...

लुईला मी प्रेझेंट काय देऊ म्हणून विचारलं तर तिनं इव्हिनिंग पर्स, स्टॉकिंग्ज सॅंडल्स असल्या वस्तूंची नावं सांगितली. मी तिला सांगितलं की असल्या वस्तू आमच्याकडं तरुण मुली वापरतात. तर तिनं तिचा लांब बाह्यांचा झंपर दाखविला. मी म्हटलं असला फॅशनेबल झंपर आमच्याकडं कॉलेजियन मुलीच फक्त घालतात. ती त्यावर म्हणाली...Why ? Your mother is also young... She is only 40. She is not old...!

परवा त्यांचा मुलगा प्रिन्स आमच्याकडं आला होता त्याला मी तुमचा दोघांचा फोटो दाखविला. तो म्हणाला—This girl looks exactly like Mrs. Dhandarphale ! मी त्याला सांगितलं की ती माझी आई आहे. त्यावर त्याला खूप आश्चर्य वाटलं. खरंच, या लोकांना आपण मोठे झालो असं

कधी वाटतच नाही. To the fashion असं वागायचा हे लोक नेहमी प्रयत्न करतात. वयाचा विचार न करता.

आत्ताच बाळासाहेब फॅक्टरीतून आले आहेत. अजून माझं सर्व काही आटोपायचं आहे. आज ब्रिटिश कौन्सिलमधे जायचं आहे ना! त्यामुळं पत्र पुरे करते. Hope सोमवारी पत्र पोस्टात पडेल.

वाय वाय For the Present

आपली
**ताई**

लिव्हरपूल
**१८–१२–४९**

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

माझं पत्र नसल्यामुळं आपण काळजीत असाल. पण हे पत्र पाहून काळजी दूर होईल असं वाटतं.

गेल्या बुधावारी मी माझा ख्रिसमस केक तयार केला. आता त्याच्यावर आयसिंग करणार आहे. म्हणतात ना—When you go to Rome, Do as the Romans do! तेव्हा इंग्लिश लोकांच्या सारखा आम्ही ख्रिसमस साजरा करणार आहोत. इंग्लंडमधे असलो तरी दिवाळी साजरी केली तसं आता ख्रिसमसची मौज बघायची आहे.

इथली हवा आता फार थंड झाली आहे. पहिला हिमवर्षाव आज पहाटे झाला. पहाटेच्या अंधारात झाल्यामुळं आम्हांला बर्फ पडताना बघण्यास मिळाला नाही. जवळपास तीन-चार फूट उंचीचा थर पडलेला दिसत आहे. लौकरच प्रत्यक्ष पडतानाही दिसेल. ख्रिसमसमधे बर्फ पडला तर White Christmas होऊन मजा येईल.

मागच्या पत्रात मी लिहायला विसरले की, आम्ही पोर्टसनलाइटला लिव्हर ब्रदर्सची सोप फॅक्टरी बघण्यास जाणार आहोत. त्याप्रमाणं नुकतंच जाऊन आलो. बाळासाहेबांच्या A T M फॅक्टरीनं ही ट्रिप आयोजित केली होती. फॅक्टरीची ट्रिप असल्यामुळं जाण्यायेण्याचा खर्च त्यांनीच केला; लिव्हर ब्रदर्सनी लंच, चहा व चार टॅक्सींचा खर्च केला. शुक्रवारी सकाळी आम्ही अंडरग्राउंड रेल्वेनं नदी ओलांडून पलीकडं असलेल्या रॉकफेरी स्टेशनवर पोचलो. तिथं गाडी बदलून दुसऱ्या गाडीनं पोर्टसनलाइटला गेलो. सर्व फॅक्टरी हिंडून पाहिली. सन्‌लाइट साबण, लाइफबॉय साबण, लक्स टॉयलेट, रिन्सो, व्हिम, टूथपेस्ट वगैरे सर्व या फॅक्टरीत होतं. हल्लीच्या युगाला यंत्रयुग का म्हणतात हे मला ही भली मोठी फॅक्टरी पाहून पटलं. एवढी मोठी टोलेजंग फॅक्टरी पण तिथं फक्त सात हजार लोक काम करतात. बहुतेक काम यंत्रानीच केलं जातं. सर्व पॅकिंगदेखील यंत्रद्वारे होतं. फॅक्टरीचं प्रिंटिंग डिपार्टमेंट तर इतकं मोठं आहे की, आपल्या देशातला मोठ्यातला मोठा छापखाना तेवढा नसेल ! साबण पॅक करायला लागणाऱ्या खोक्यापासून सारं काही इथंच तयार होतं.

फॅक्टरी पाहून झाल्यावर आम्हांला एका Posh हॉटेलमधे नेण्यात आलं. तिथं लंचही खूप चांगला झाला. त्यानंतर टॅक्सीनं आम्हांला डॉक्सवर नेलं. फॅक्टरीच्या मालकीचे डॉक्स आहेत व दोन मोठी जहाजंही आहेत. त्या जहाजांवरील डान्सिंग हॉलही आम्ही पाहून आलो. हे सारं काही सनलाईट कंपनीच्या मालकीचं आहे. फॅक्टरीनं तिथल्या कामगारांसाठी घरं बांधली आहेत. त्यांमधे मोठ्या अधिकाऱ्यांपासून साध्या कामगारांपर्यंत सर्वजण येतात. हा अधिकारी, हा मजूर असा भेदभाव तिथं नाही. पोर्टसनलाइटला निघणाऱ्या एका मासिकाच्या प्रतिनिधीनं आमचा फोटो घेतला. तो फोटो पुढील अंकात छापून येणार आहे म्हणे.

तिथली आर्ट गॅलरीही आम्ही बघून आलो. ही आर्ट गॅलरी लॉर्ड लिव्हरची खासगी मालमत्ता आहे. दुसरीकडं कुठंही पहायला न मिळणाऱ्या किती तरी वस्तू तिथं आम्हांला पहायला मिळाल्या. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिथं एक फार जुन्या काळातलं घड्याळ आहे. God save the King हे राष्ट्रगीत त्या वेळी प्रचारातही नव्हतं म्हणे. पण या घड्याळातून दर तीन तासांनी त्या राष्ट्रगीताचे सूर ऐकू येतात !

तिथं कामगारांसाठी पोहोण्याचा तलाव व लायब्ररी देखील आहे. कामगारांना हे सारं फुकट आहे. दुपारचा चहा घेऊन आम्ही परत जायला निघालो ते सहा वाजता लिव्हरपूलला पोचलो.

हा कारखाना बघून खरोखरच फार आनंद झाला. काहीतरी विशेष पाहिल्याचं समाधान मिळालं. तिथं कामगारांच्या बारीकसारीक सुखसोयींकडं लक्ष पुरविलं जातं. तिथले कामगार नेहमी खूष असतात. गेल्या कित्येक वर्षांत तिथं कधी असमाधान, संप असं काही घडलं नाही. एका सेकंदाला एक साबणाची बॉक्स तयार होते ! म्हणजे रोज किती उत्पादन होत असेल याची कल्पना करा !

या फॅक्टरीच्या धर्तीवर आपल्याकडं किर्लोस्करवाडीला प्रयत्न केला आहे. पण तिथं कामगारांपेक्षा मालक लोक मात्र ज्यास्त चैनीत आहेत !

असो. फोनवर बोलायचं किती दिवसांपासून मी ठरवीत आहे. पण कोणत्या फोनवर बोलायचं हे लक्षात येईना. चित्रशाळेचा फोन आहे हे आता ध्यानात आलं. काही ठराविक वेळीच इथून परदेशी फोन करता येतो. त्याची चौकशी केल्यावर वेळ कळवीन.

आमच्या दोघांची प्रकृती छान आहे. आपल्याला आमचा फोटो पाहिजे आहे. पण अजून आमच्यांत फोटो काढण्यासारखा विशेष फरक पडला नाही. वजन वाढलं नाही की रंगात फरक नाही. थोडासा फरक पडला की, फोटो काढून पाठवून देईन.

आपल्या प्रकृतीस जपत जावे. आपल्या पत्रात काही काही वेळा दिसून येणारी निराशेची छाया पाहिली की, काय करावं सुचत नाही.

काही असलं तरी आपण आपली प्रकृती नीट संभाळली पाहिजे. रत्नाच्या परीक्षेचा निकाल काय लागला ?

तुमची

**ताई**

लिव्हरपूल
२७-१२-४९

ती. सौ. बाईस सा. न.

परत माझं हे एअर लेटर पाहून तुम्ही म्हणाल या वेळीही हिला सवड नाही वाटतं मोठं पत्र लिहायला. पण याच्या आधी एक पत्र रत्ना, शशीच्या नावानं पाठविलं होतं. आजही पाकिट पाठवलं असतं; पण माझ्याकडं तिकिटं नाहीत नि पोस्ट ऑफिस तर बंद आहे. गेले तीन दिवस इथली सर्व ऑफिसं, दुकानं, हॉटेलं, थिएटर्स सारं काही बंद आहे. ख्रिसमसची सर्वांना सुट्टी आहे. इथला ख्रिसमस म्हणजे आपल्या सणांच्या पेक्षा औरच असतो. आम्ही मात्र हा ख्रिसमस अगदी इंग्लिश लोकांसारखा साजरा केला. म्हणजे घरी नाही हं ! डिनरला आम्ही मिसेस मॅककडं गेलो होतो. ख्रिसमसच्या रात्री आम्ही मे आणि डेरी या दोन शिक्षकिणी आहेत त्यांच्या घरी गेलो होतो. मॅककडं अगदी यथासांग इंग्लिश ख्रिसमस पाहिला. खूप मित्र नि मैत्रिणी येऊन अगदी दिवसभर धांगडधिंगा चालला होता. आम्ही शाकाहारी म्हणून आतापर्यंत कुणी आम्हांला आग्रह केला नव्हता. पण ख्रिसमसच्या दिवशी डिनरला त्यांच्या टेबलावर बसून टर्की न खाल्ली तर वाईट दिसेल म्हणून मला तिनं थोडंसं खाण्याचा आग्रह केला. दोन-तीन घास " गूझ " खाल्लं. तसंच काल मिसेस कुंडूकडं तीन घास टर्की खाल्ली. मला फारसं आवडलं नाही. पण वाटलं तितकं काही वाईट नव्हतं ते. या खाण्यावरून आठवण झाली. मला आजकाल भात फार आवडायला लागला आहे. माझा ख्रिसमस केक अजून कापला नाही. गुरुवारी आमच्या सगळ्या मित्र-मैत्रिणींना मी आमच्या घरी बोलावलं आहे त्या वेळी कापायचा आहे. केक केल्यावर आइसिंग करण्यापूर्वी पंधरा दिवस तरी ठेवावा लागतो. केकमधे पाणी किंवा दूध काही नसल्यामुळं महिनेच्या महिने तो टिकू शकतो.

तू कानिटकरांच्या बरोबर पाठविलेले सर्व पदार्थ व्यवस्थित मिळाले. तिळाच्या वड्या फारच चांगल्या टिकल्या आहेत. हलवा तू स्वतः केला आहेस का ? दुसरं सरफेस मेलनं पाठविलेलं पार्सल मात्र अजून मिळालं नाही.

मला इथं फार काम असतं या माझ्या थापा आहेत असं तुम्हांला वाटतं. काम म्हणजे अगदी घरातलं काम करीत असते असं नव्हे. पण कुठं बाहेर जाते व केव्हा येते हे पूर्वी मी कळविलं आहेच. त्यावरून मी घराबाहेर किती असते हे समजेल.

असो. आता जागा संपली या पत्रातली. पत्र पुरं करते.

तुझी
**ताई**

लिव्हरपूल
२-१-५०

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

आपले पाकिट मिळाले, माझ्याकडून अलीकडं पत्रांना उशीर होतो म्हणून तुम्ही नाराज दिसता. पण मी तरी काय करू ? मला लहान पत्र लिहिता येत नाही नि मोठं पत्र लिहायला तितका वेळ नसतो. मी पाठविलेला स्कार्फ व टेबल क्लॉथ पाहिलाच असेल. आपल्याला तो आवडला का ? मी अशी कुणालाच प्रेझेंट्स पाठवली नाहीत त्यामुळं काय पाठवावं काही कळेना. रत्ना, शशीला पाठविलेल्या पेन्सिलींमधे मात्र फसले. हिंदुस्थानात तसल्या पेन्सिली मिळायच्या नाहीत म्हणून खूप पैसे देऊन विकत घेऊन पाठविल्या. नंतर कळलं की तिथल्या उष्ण हवेत त्या चालत नाहीत म्हणून. उष्णतेमुळं त्यांच्या मधली शाई आटून जाते. परत शाई भरता येत नाही.

दिवाळीच्या दिवशी नातेवाइकांना फराळाला कशाला बोलवायचं असं मी म्हटलं त्यात काय चुकलं ? ते तुम्हांला एकट्याला बोलवतात व त्याच्या बदली तुम्ही मात्र त्यांना मुलाबाळांसकट सर्वांना बोलावता. इथं असं कुणी करीत नाही. एकट्या नवऱ्याला किंवा एकट्या बायकोला बोलावीत नाहीत कधी. नेहमी

मिस्टर अँड मिसेस ना बोलावतात. दुसरं म्हणजे आपल्याकडं एकट्या बाईनं सगळ्यांचं करायचं व त्याचा परिणाम होऊन बाईची प्रकृती बिघडते.

इथं तसं नाही. मी इंग्लिश पद्धतीप्रमाणं Serve करते. गुरुवारी माझ्याकडं मी सर्वांना पार्टी दिली. आम्ही एकंदर बाराजण होतो. पैकी आम्ही कुणी कुणी काय काय केलं हे सांगते. मिसेस मॅक दुपारी दोनला आली. नंतर ती, मराठे आणि मी असं आमचं तिघांचं जेवण झालं. मग मिसेस मॅक व मराठे शॉपिंगला गेले. त्यांनी लहान लहान केक्स व स्वीट डिशसाठी 'ट्रायफल' विकत आणलं. तोपर्यंत मी मुगाची डाळ व तांदळाची खिचडी केली. चार वाजता बाळासाहेब व राजगोपाल आले. त्यांनी दोघांनी खोलीतून बेड बाहेर नेला व सर्व खोली स्वच्छ केली. तोपर्यंत मिसेस मॅक व मराठे परत आलेच. मी कांदे वगैरे चिरून भज्यांचं पीठ भिजवून ठेवलं. खिचडीही शिजली. राजगोपालनं भजी, कुरडया तळल्या. मी व मिसेस मॅकनं टेबलावर कपबशा वगैरे लावल्या. मग केक्स ठेवले. खूप छान दिसत होतं टेबल. नंतर सगळ्यांनी हात-तोंड धुवून कपडे बदलले. बरोबर आठला बाकीचे सर्वजण आले. सगळे पदार्थ टेबलावर मध्यभागी ठेवले. वाढायचा प्रश्नच नाही. सगळेजण गप्पा मारीत जेवण करीत बसलो. साडेदहा वाजता मग मी माझा खिसमस केक कापला. त्याचे तुकडे करून एका मोठ्या प्लेटमधे ठेवले. प्रत्येकानं लहान लहान डिश् हातात घेऊन एक एक तुकडा घेऊन खाल्ला. मधे एक डिश सँडविचेसची ठेवली होती. चहा नको म्हणून आम्ही सायडर आणली होती. सायडर म्हणजे फळांचा रस. त्यात वीस टक्के अल्कोहोल असतं. त्याला इथं दारू म्हणत नाहीत.

नंतर थोड्या वेळानं प्रत्येकाला एक एक चॉकलेट दिलं. चॉकलेट देताना तिळाच्या वड्यांची आठवण झाली. वडीचा एकेक तुकडा व हलवा प्रत्येकाला दिला. हलवा कसा तयार करतात ? हे प्रत्येक इंग्लिश माणसानं मला विचारून विचारून भंडावून सोडलं !

रात्री पुन्हा सारी आवराआवर करायला सगळ्यांनी मदत केली. झोपायला आम्हांला एक वाजला. पण त्यामानानं मला श्रम काही फार झाले नाहीत. शनिवारी मी मॅककडं गेले असताना त्यानं माझं छान पार्टी केल्याबद्दल अभिनंदन केलं. "बारा माणसांची पार्टी तू एकटी करणार हे पाहून माझ्या छातीत धस्स झालं होतं. पण एकंदरीत सगळं छान झालं. टेबलही चांगलं सजविलं होतंस तू..."

आपल्याकडेही अशाच प्रकारानं पार्टी केली तर करणाऱ्या बाईला थकवा येणार नाही. सगळे पदार्थ एकट्या बाईनं चुलीपुढं बसून करायचे म्हणजे तिला एकटीला ताप ! इतरांची मात्र चैन !

असो. चौदा तारखेला फोनवरून बोलेन.

आपली,
**ताई**

लिव्हरपूल
१०–१–५०

ती. सौ. बाईस सा. न.

तुला पत्र लिहायला घेतलं आहे खरं पण काय लिहावं हे सुचेना. आता मी इतक्या निराश मनःस्थितीत आहे की जड झालेल्या माझ्या मनाला उत्साहाचा विचारही स्पर्श करीत नाही. फोनवर बोलायला मी उत्सुक झाले होते. पण चौदा तारखेला बोलणं शक्य नाही असं आजच मला सांगण्यात आलं. सहा महिने झाले तुम्हा सर्वांना सोडून ! बोलण्याचा दुसरा एखादा दिवस आज कळविला असता पण गेल्या तीन-चार दिवसांपासून आमच्या लँडलेडीचा फोन नादुरुस्त झाला आहे. आज दुरुस्त होईल, उद्या होईल अशी दोन दिवस वाट पाहिली. त्यामुळं चौदा तारखेपर्यंत फोन दुरुस्त होण्याची शक्यता नाही असं दिसतंय. काहीतरी वायरिंगमधे बिघाड झाला आहे म्हणे.

बरोबर संक्रातीच्या दिवशी तुला हे माझं पत्र मिळेल. त्याच दिवशी गोड बोलायचं असतं. पण ते तरी का ? तेवढा एकच दिवस गोड बोलायचं की काय ?

आपल्या लोकांचं विचित्रच आहे. इथले इंग्लिश लोक गोड बोलण्यासाठी असा काही एक ठराविक दिवस राखून ठेवीत नाहीत ! पण मला वाटतं संक्रांत हा गोड बोलण्याचा प्रतीकात्मक सण आहे. जसं, काही सरकारी खात्यांतून “ सौजन्यसप्ताह ” ( courtesy week ) साजरा करतात तसं या संक्रातीच्या सौजन्य दिनाचं महत्त्व आहे. नाही का ?

पोस्टानं तू पाठविलेलं पार्सल छान आलं. आतले पदार्थही चांगले आहेत. लाडू, वड्या अगदी ताज्या आहेत. दिवाळी अंकही मिळाले.

ती. अण्णा, अप्पा, शरद, माधव, शशी, रत्ना या सर्वांना स. न.

तुझी
**ताई**

लिव्हरपूल
१३-१-५०

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

...चौदा तारखेला पुण्याला मी बाईला लिहिलेलं पत्र तुम्हांला मिळेल त्यावरून तुम्हांला समजेल की मी त्या दिवशी मूडमधे नव्हते. पण आज हे पत्र लिहिताना मला आनंद होत आहे. काल मी जनरल पोस्टातून कॉल बुक केला व त्याप्रमाणं घरी तार केली. तार पाहिल्यावर तुम्ही कदाचित गोंधळून जाल पण तुमच्या सर्वांशी केव्हा एकदा बोलेन असं मला झालं आहे.

तुम्हांला पॅनकेक, टर्की, मॅकॅरोनी कसं करतात हे पाहिजे आहे ना? पॅनकेक अगदी सोपी असते. सेल्फ रेझिंग फ्लोअर घेऊन त्यात थोडी साखर, मीठ, अंडी, दूध घालून धिरड्यासारखं करायचं नि त्याच्यावर खाताना साखर व लिंबू घालायचं. टर्की हा एक पक्षी आहे. मोठी कोंबडीच म्हणा. ती उकडतात आणि खातात. मॅकॅरोनी ही गव्हाच्या पिठाची असते. आधी शिजवून घ्यावी लागते व नंतर आवडीप्रमाणे दूधसाखर घालून खायची असते. मध्यंतरी फिश व चिप्स मी खाल्ल्या त्या मला आवडल्या. मिसेस मॅक माझ्यासाठी चांगलं फिश मार्जरीनमधे करून ठेवते. मी फिश खाते हे वाचून तुम्हांला काही वाटणार नाही ना? पण तुम्हांला न सांगता काही करीत नाही म्हणून मुद्दाम हे लिहिलं आहे.

मराठेला मिसेस मॅक व मिसेस कुंडू या माझ्यावर इतकं प्रेम करतात, इतके लाड करतात याचं फार आश्चर्य वाटतं. तो म्हणतो, इंग्लिश बायका इतक्या

फॅमिलियर होत नाहीत. तुम्हांला ते कसं जमलं ? यावरून मला तुमच्या मागच्या पत्रातील वाक्याची आठवण झाली. तुम्ही म्हणाला होता...तुला अगदी मुला-प्रमाणं वाढविलं, मोठं केलं याचा मला आनंद वाटतो. तू माझा सहावा मुलगाच आहेस...!

अगदी खरं आहे ते. तुमच्या आणि बाईच्या शिकवणुकीमुळंच ही ताई या स्वरूपात आज दिसते आहे.

एके दिवशी मराठे नि बाळासाहेब बोलत बसले होते. मराठेच्या लग्नाच्या गोष्टी निघाल्या होत्या. त्यानं सांगितल्यांपैकी एक अट अशी होती की, मराठे ज्या वातावरणात वाढला आहे त्या वातावरणात तीही वाढलेली असली पाहिजे. तो श्रीमंत आहे तेव्हा तीदेखील श्रीमंत असावी. तो म्हणतो—तिचे वडील जर श्रीमंत नसले तर ती माझ्या आवडीनिवडीमधे समरस होणार नाही. गरिबीमुळं हलक्या आवडी असणाऱ्या मुलीशी आपलं पटणार नाही बुवा ! बाळासाहेब म्हणाले—चुकतो आहेस तू. ती जर श्रीमंत बापाची असेल तर तिला नेहमी आपल्या बापाच्याच श्रीमंतीचा अभिमान वाटणार. वडिलांचा पुष्कळ पैसा पाहायची सवय झाल्यामुळं तुला कितीही पगार मिळाला तरी तो तिला तुटपुंजाच वाटणार. शिवाय गरीब मुलींच्या आवडी हलक्या असतात हे तुला कुणी सांगितलं ? मी स्वतः स्वानुभवावरून तुला सांगतो की, स्वभाव हा प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून आहे: ती कशी वाढवली गेली त्यावर अवलंबून आहे. माझ्या बायको-कडंच पहा ना...Her Parents brought her up so nicely that she is well cultured, so well behaved...her tastes, likes and dislikes are so very high that you rarely come accross such a perfect personality...!

यांच्या तोंडचे हे शब्द ऐकल्यावर तुमच्यासारखे आईवडील मिळाल्याचा अभिमान वाटला. आज कुसुम असती तर तिनंही तुम्हांला असंच धान्य केलं असतं. तिच्यामधे तर माझ्यापेक्षा ज्यास्त गुण होते, ज्यास्त कला होत्या...

उद्या फोनवर बोलूच.

तुमची

**ताई**

लिव्हरपूल
२३–१–५०

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

तुमचे १४ तारखेचे पत्र आज २३ ला मिळाले. २० तारखेला बाळासाहेबांचा वाढदिवस होता. त्याकरता प्रेझेंट म्हणून मी फुलस्लीव्हज पुलओव्हर विणला. अवघ्या पंधरा दिवसांत एवढा मोठा स्वेटर विणायचा असल्यानं दुसरं काही करायला वेळच मिळाला नाही. एक दिवस बर्थ-डे केक करण्यात गेला. त्याच्यावर गुलाबी आयसिंग करून पुण्याहून आलेल्या हलव्याच्या दाण्यांनी Happy Birthday असं लिहिलं होतं. एकूण २८ मेणबत्त्या लावल्या होत्या. वाढदिवसाच्या पार्टीला मिस्टर व मिसेस मॅक, मिस्टर व मिसेस कुंडू (coondoo) राजगोपाल, व डॉक्टर. कुंडू यांची सेक्रेटरी फ्लॉरेन्स एवढे लोक होते.

मी ब्रेडचा शिरा व दूध आटवून त्याचा खवा करून गुलाबजांब केले होते. जेवण झाल्यावर फ्रुट, चॉकोलेटस, सायडर असा बेत केला होता. मिस्टर व मिसेस मॅकनी बाळासाहेबांना चांगला टाय दिला, डॉ. व मिसेस कुंडू यांनी सोन्याच्या गिलिटाच्या बटन्स दिल्या व राजगोपालने शिंपल्याचा ॲश ट्रे दिला. एकंदरीत पार्टी चांगली झाली.

ठरल्याप्रमाणं मी चौदा तारखेला फोनवरून सौ. बाईशी बोलले. बाळासाहेबही अप्पांशी व बाईशी बोलले. रत्नाखेरीज सर्वजण फोनपाशी जमले होते. वेळ अगदीच थोडा म्हणून मला सगळ्यांशी बोलता नाही आलं. तुम्ही का नाही आला त्या दिवशी पुण्याला ? तुमच्याशीही दोन वाक्ये बोलायला मिळावी म्हणून मी किती धडपड केली होती ! बाळासाहेबांनी अगदी लंडनपर्यंत फोन करून हा कॉल बुक केला होता. संक्रांतीच्या दिवशी बाईशी बोलायला मिळाल्याचा मला कोण आनंद झाला ! तुमच्याशी एक शब्दही बोलायला नाही मिळालं याचं वाईटही वाटलं. जवळ जवळ सात महिन्यांनी बाईचा आवाज ऐकू आला, हजारो मैल अंतरावरून वेळेचं बंधन ठेवून का होईना आपण बोलू शकतो हे आश्चर्य नव्हे का ? पण आश्चर्य तरी कसं म्हणावं ? जग आजकाल

इतकं लहान झालं आहे. ते पूर्वी वाटायचं तसं आता अफाट वाटत नाही. माणसानं सारं काही आपल्या आवाक्यात आणलेलं आहे आता.

फोनवर बोलल्याच्या आनंदात आम्ही पाच वाजेपर्यंत बाहेर भटकत होतो. तेव्हाच बाईला देण्यासाठीं एक प्रेझेंट खरेदी केलं.

आता हवा फारच थंड झाली आहे. तीस डिग्री टेंपरेचर आहे. असो.

तुमची
**ताई**

लिव्हरपूल
६-२-५०

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

मी आपल्याला इकडून ३० तारखेला पत्र पाठवले होते ते मिळालेच असेल. त्यात मी लंडनच्या ट्रिपविषयी लिहिलं होतं. एका दिवसाला जवळ जवळ ८० रुपये खर्च आला. ट्रिप छान झाली. मुख्य म्हणजे स्नो पडताना पाहिला व Undisturbed snow वरून चालायला मिळालं. लिव्हरपूललाच असतो तर रात्री झोपून गेलो असतो. सकाळीं उठल्यावर पडलेला स्नो दिसला असता. पण पडताना पाहण्याची जी गंमत आहे ती नसती दिसली. यंदाचा हिवाळा कमी आहे म्हणून वाटत होतं, बर्फ पडताना आपल्याला दिसेल की नाही. खरंच, फार सुरेख दृश्य असतं ते. वितळायला लागला बर्फ की ते दृश्य मात्र घाणेरडं दिसतं. सगळीकडं चिखल होतो. इथं खेड्यापाड्यांतून डांबरी रस्ते आहेत. त्यामुळं पावसाळ्यात अजिबात चिखल होत नाही. पण स्नोफॉल नंतर होणारा हा चिखल पाहून इथल्या लोकांना मात्र कंटाळा येतो. अर्थात हिंदुस्थानात आम्हांला चिखल पाहण्याची सवय असल्यानं त्याचं काही वाटलं नाही.

आपण इथल्या थंडीची अजिबात काळजी करू नये. टेंपरेचर ४० ते ४५ च्या दरम्यान आहे. अर्थात काही लोक असे आहेत की, त्यांना कितीही गरम कपडे

घातले तरी थंडीचा त्रास होतो. राजगोपाल तसा आहे. एक तारखेला तो व राधाकृष्णन स्टोनला गेले. एक मार्चला बाळासाहेब जातील. एप्रिलमध्ये आम्ही सर्वजण लंडनला जाऊ व ट्रेनिंग संपून हिंदुस्थानला परत येईपर्यंत लंडनलाच राहू.

इतक्या लांब आलो आहोत तर नुस्तं इंग्लंड पाहून परत यायच्या ऐवजी काँटिनेंटला जाऊन फ्रान्स, स्वित्झरलंड, इटली हे देश पाहून यायचा आमचा विचार आहे. आणखीही इतर देश पहायला आवडले असते. पण जास्त पैसे बरोबर न्यायला परवानगी देत नाहीत. अर्थात हे तीन देश पाहिल्यानंतर इतर आणखी फारसं पाहण्यासारखं काही रहात नाही हे खरंच. आणखीसुद्धा जे जे काही पाहायचं राहिलं आहे ते आता आम्ही पाहणार आहोत.

आपण पाठवलेले दोन्ही कटिंग व ती. पिलोबुवा यांची दोन्ही पत्रं मिळाली. माझी पत्रं छापण्याद्दल त्यांनी लिहिलं आहे. कल्पना चांगली आहे. माझी त्याला ना नाही. फक्त प्रश्न आहे तो, ही पत्रं छापण्याला योग्य आहेत का, याची भाषा, निरनिराळ्या स्थळांची वर्णनं, पुस्तकाला योग्य आहेत का ? मी आपल्याला पत्रं लिहिलेली आहेत, तेव्हा ती आपली आहेत. आपल्याला योग्य वाटेल ते करावे. माझी हरकत नाही.

पुण्याचे पत्र नाही. तुमच्या प्रकृतीस जपावे.

तुमची
**ताई**

६२ ग्रेस्टोन रोड
हैटन, लिव्हरपूल
१५-२-५०

प्रिय शशी,

परीक्षेतील तुझ्या यशाबद्दल प्रेमपूर्वक अभिनंदन! मी परत आल्यावर अण्णांकडून आपण शंभर रुपये घेऊ व दोघांना काही तरी घेऊ. तुझी आता परीक्षा वगैरे पार पडली आहे. तेव्हा पत्रे वेळच्या वेळी पाठव.

माधवला नि रत्नाला आईस्क्रीमची कल्पना कशी आली याचं मला आश्चर्य वाटतं, त्यांनी नक्की कोणाला तरी विचारलं असलं पाहिजे. कारण आपल्याकडं अशी आईस्क्रीम खाण्याची पद्धत नाही. पण इथं लोक फार आईस्क्रीम खातात. फोटोमधे माझ्या हातात आईस्क्रीमचा कोन आहे. इंग्लंडला येण्यापूर्वी मला असं वाटत होतं की, थंडीमुळं इथले लोक आईस्क्रीम खात नसतील. पण इथं पाहावं तर सगळा प्रकार निराळाच. भर हिवाळ्यात हे लोक रस्त्यानं आईस्क्रीम कोन खात हिंडतात. कोणी कुणाला नावं ठेवीत नाहीत.

फोटोमुळं पत्र जड झालं आहे. म्हणून इथं पुरे करते.

तुझी
**ताई**

लिव्हरपूल
१–३–५०

ती. अण्णासाहेब यांस सा. न.

या पत्रामधे मी इंग्लंडमधील निवडणुकांच्या विषयी सविस्तर लिहायचं ठरविलं आहे. आपल्याकडील म्युनिसिपालिटीच्या अथवा जनरल इलेक्शन्स मी तिथं असताना पाहिल्या. त्या पार्श्वभूमीवर इथल्या या निवडणुका म्हणजे एक आश्चर्यच वाटलं.

पार्लमेंटची नवी निवडणूक व्हायची असं ठरलं अन् निवडणुकीची तारीखही ठरली. इंग्लिश पार्लमेंट म्हणजे आद्य पार्लमेंट. Mother of Parliaments म्हणतात तिला. आणि इंग्लिश लोक इतर कुठल्याही देशाच्या लोकांपेक्षा ज्यास्त Democratic समजले जातात. अशा लोकांच्या इतिहासप्रसिद्ध लोकसभेची निवडणूक बघायला मिळणार म्हणून मला फार अभिमान वाटत होता. या निवडणुकीत काय बघायला मिळणार अशी आमची कल्पना होती ? आमच्या कल्पना अर्थात आपल्याकडील निवडणुकींच्या दृश्यावर आधारित होत्या. त्याच्या जोडीला Picwick Papers मधील निवडणुकीचं

वर्णन डोळ्यांपुढं होतं ! Charles Dickens नं. विनोदासाठी केलेली अति-शयोक्ती सोडली तरी निवडणुकी सर्वसाधारणपणे त्याच धर्तीवर असतील अशी माझी कल्पना ! पण नुस्ती कल्पनाच ठरली ती.

नेहमी बाह्य जगात वावरताना शांत, विनयशील नि तुटक दिसणारे इंग्लिश लोक आता निवडणुकीच्या वेळी झेंडे-पताका घेऊन मिरवणुका काढतील, आपल्या बाजूच्या उमेदवाराचा, इतक्या तारस्वरात जयघोष करीत रस्त्यानं जातील, नुस्तं ओरडून घशाला फार ताण पडतो असं वाटलं तर मोटारीतून लाऊडस्पीकर लावून अमक्याला मते द्या अशा घोषणांनी दिशा दुमदुमून टाकतील, वेगवेगळ्या पक्षांतील लोकांत चढाओढ लागेल, मोठमोठ्या सभा होतील, उधळून लावल्या जातील, कोपऱ्याकोपऱ्यावर Posters फडकतील अशा माझ्या कल्पना होत्या.

निवडणुकीची तारीख ठरली तरी कुठल्याही पक्षाची काही हालचाल दिसेना. कुठंही अमक्याला मते द्या अशी पोर्टस दिसेनात. मला आश्चर्यच वाटलं. चौकशी केल्यावर कळलं की, जुनं पार्लमेंट बरखास्त झाल्याशिवाय मोहीम सुरू होत नाही. शेवटी एकदाचं पार्लमेंट बरखास्त झालं. आता खरी मजा बघायला मिळणार असं वाटलं मला.

निरनिराळ्या पक्षांच्या मोहिमा सुरू झाल्या. जोर चढला. मोहिमा संपल्या नि निवडणुकाही संपून गेल्या. माझी मात्र निराशा झाली. एकही घोषणा कानी पडली नाही की,एकही सभा उधळली गेली नाही ! मोठ्या मिरवणुका निघाल्या नाहीत. माझ्या दृष्टीनं अगदीच शेळपट निवडणूक झाली ही ! पण दुसरे दिवशी निकाल पाहते तो काय ! ८५ टक्के मतनोंदणी झाली होती ! आपल्याकडं अव्याहत गगनचुंबी गर्जना करूनही पन्नास टक्के मतदान होणं कठीण ! मत नोंदवायला जायचं तर आपल्याला मतदान केंद्र कुठं आहे असं विचारण्याची कधी जरूर पडली का ? फक्त बहिऱ्या माणसाला ती जरूर पडेल ! केंद्रावरची गर्दी,पोलिसपहारा नि कर्णकटू घोषणा यांमुळं आपल्याकडं मतदान-केंद्र हा एक शेजारच्या लोकांना तापच होतो.

निवडणुकीच्या दिवशी मी लिव्हरपूलमधे निरनिराळ्या खूप रस्त्यांनी हिंडले. पण एकही मतदान-केंद्र मला सापडलं नाही. कसं सापडणार ? जेव्हा मुद्दाम

चौकशी करून एका केंद्रापाशी गेले तो तिथं स्त्रीपुरुषांची रांग दिसली. अशा रांगा नेहमी थिएटरांच्या पुढेही दिसतात! त्यामुळं या रांगेकडं माझं लक्षच गेलं नव्हतं. नाही म्हणायला तिथं एक पोलिस उभा होता. आश्चर्य म्हणजे तो एका लहान मुलाला खेळवीत होता! त्या लहान मुलाची आई मत द्यायला आत गेली होती नि ती परत येईपर्यंत पोलिस तिचं मूल संभाळीत होता. पोलिसाला अशी मुलं संभाळण्याशिवाय दुसरं काम नव्हतं! कारण, गडबड, गोंधळ, आरडाओरड काही नव्हती. सगळं काही इतकं शांत नि व्यवस्थेशीर चाललं होतं की, त्यापेक्षा जास्त गडबड आपल्याकडं साधं पोस्टात तिकीट घ्यायला गेल्यावर होते.

आपल्याकडं निवडणुकीचा दिवस म्हणजे एक पर्वणीच असते. म्युनिसिपालिटीची अथवा लोकलबोर्डाची जरी निवडणूक असली तरी आपल्याकडं सर्वांना सुट्टी पाहिजे. सुट्टी असल्याशिवाय मत द्यायला जायला वेळ कसा मिळणार? गर्दीतून वाट काढीत नि विरुद्ध पक्षाच्या स्वयंसेवकांना दूर लोटत मतदान केंद्रापर्यंत पोचायला वेळ लागतो नि तिथं पोचल्यावर तरी मतदारांच्या यादीत आपलं नाव सापडेलच याची खात्री नसते. शेवटी माधव केशव जहागीरदार याच्या ऐवजी महमद कासिम जहांगीर या नावानं मत देऊन यावं लागतं! पण इथं एवढी मोठी पार्लमेंटची सार्वत्रिक निवडणूक असून देखील कुठल्याही ऑफिसला व कारखान्याला एक तासाची देखील सुट्टी नव्हती. कामाचे लोक दुपारी लंच टाईममधे किंवा संध्याकाळी मत नोंदवीत. दुपारी बायका व म्हातारे लोक मत नोंदवून जात. इतकी मोठी निवडणूक असून देखील इतक्या शांतपणे झालेली पाहून मला मोठं कौतुक वाटलं.

इथंही पूर्वी चार्लस डिकन्सच्या काळी निवडणुका आपल्याकडील निवडणुकांच्यासारख्या असत असं म्हणतात. पूर्वीच्या पद्धतीत नि आताच्या पद्धतीत इतका फरक पडण्याचं कारण निवडणुकीच्या खर्चावर असलेला निर्बंध हे होय. शिवाय सर्वसाधारण इंग्लिश माणसाची सुशिक्षित व शांत वागणूक हेही दुसरं कारण आहेच.

पार्लमेंटच्या कायद्याप्रमाणे निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला प्रचारासाठी ठराविकच खर्च करावयाची परवानगी असते. त्यामुळे

प्रचारकार्यासाठी खर्च जपून करावा लागतो. एखाद्या उमेदवारानं अधिक खर्च केल्याचं आढळून आलं तर त्याची निवड रद्द होते. आणि मग पुन्हा निवडणूक होते. मग पुन्हा निराळा खर्च ! म्हणून प्रत्येक पक्ष आणि उमेदवार आपल्या प्रचारकार्यावर जपून खर्च करतात. साहजिकच कमी खर्चाने प्रचार कसा करावा याच्या कल्पना लढविल्या जातात.

मुख्य प्रचार वर्तमानपत्रांतून होतो. प्रत्येक पक्षाचं 'वर्तमानपत्र असतंच. ती आपापली बाजू मांडतात. मँचेस्टर गार्डियनसारखी पक्षातीत वृत्तपत्रं सगळ्या प्रमुख पक्षांचं म्हणणं वाचकांपुढं मांडतात. बहुतेक लोक वर्तमानपत्रं वाचणारे असल्यामुळे हा प्रचार घरोघर जाऊन पोचतो. शिवाय B. B. C. वरून प्रत्येक पक्षाच्या पुढाऱ्यांची भापणं होतात. जवळ जवळ प्रत्येक घरात रेडियो आहेच. याशिवाय न्यूज थिएटर्समधून प्रत्येक पक्षाच्या पुढाऱ्यांच्या प्रचाराच्या फिल्म्स दाखविल्या जातात.

देशभर दौरे काढून प्रमुख पुढारी भाषणं करतातच. पण असली भाषणं पुष्कळदा Public Hall भाड्यानं घेऊन त्यामधे होतात. तिथं ठराविक लोकांपेक्षा अधिक लोकांना बसायला जागा नसते. या भाषणांचं महत्त्व श्रोते किती आहेत यावर अवलंबून नसतं तर दुसरे दिवशीच्या वर्तमानपत्रांत भाषण समग्र प्रसिद्ध होतं नि ते सगळ्यांपर्यंत जाऊन पोचतं. निवडणूकप्रचारात वृत्तपत्रांचं कार्य फार मोठं असतं ते यावरून कळून येईल.

अशा तऱ्हेनं प्रचाराचा मोठा भाग वर्तमानपत्रांतून नि रेडियोवरून ( आता टेलिव्हिजनवरून ) पक्षांतर्फे झाल्यामुळे उमेदवारांचे काम सोपे होते. पक्षाचं धोरण जरी मतदारांना पटलं तरी उमेदवार लायक आहे हे तो मतदारांना पटवून देण्याचा प्रयत्न करतो. मात्र विरुद्ध पक्षाची नालस्ती त्यात मुळींच नसते. माहितीपत्रके प्रत्येक उमेदवार छापतो आणि ती मतदारांच्या यादीप्रमाणं आपल्या भागातील मतदारांच्या घरी पोचवतो. अशी माहिती-पत्रकं रस्त्यात वाटत नाहीत. कारण खर्चाच्या निर्बंधामुळं ठराविकच पत्रकं छापली जातात व रस्त्यात त्या भलत्याच कुणाच्या हाती पडून खर्च फुकट जायचा संभव असतो. त्यामुळं माहितीपत्रकं घराघरातून वाटली जातात. उमेदवार स्वतः जितक्या मतदारांच्या घरी जाऊन भेटता येईल तितक्यांच्या भेटी घेतो. शक्य नसल्यास

त्याच्यातर्फे स्वयंसेवक Canvassing करतात. हे Canvassing ही विशेष प्रकारचं असतं. बहुतेक सर्व मतदारांनी रेडियो ऐकून व वर्तमानपत्रं वाचून आपलं मत निश्चित केलेलं असतंच. पुष्कळांना प्रचाराची मुळी सुद्धा जरूर लागत नाही. ते वर्षानुवर्षे किंवा पिढ्यान्‌पिढ्या एकाच पक्षाला मत देतात. हुजूरपक्ष हा सामान्यतः श्रीमंत भांडवलदारांचा पक्ष समजला जातो. पण या पक्षाचे अनुयायी कामगारवर्गातही असतात. तसंच पुष्कळ सुखवस्तू लोक मजूर-पक्षाचेही असतात. बऱ्याच जणांना हे दोन्ही पक्ष अतिरेकी वाटतात म्हणून ते सुवर्णमध्यावर राहतात आणि प्रागतिक पक्षाला पाठिंबा देतात. असा एक वर्ग असतो की, ज्यातील लोकांना ठराविक कुठल्याच पक्षाचं प्रेम नसतं. ते लोक निरनिराळ्या पक्षांच्या धोरणांवरून कुणाला पाठिंबा द्यायचा हे ठरवितात. या वर्गाला "फ्लोटिंग व्होट" असं म्हणतात. या वर्गाचा कल कोणत्या बाजूला झुकेल त्यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून असतो. सारा प्रचार या वर्गाचं मत आपल्याकडं वळविण्यासाठी चाललेला असतो. हे लोक कशाच्या जोरावर आपलं मत बनवतील हे काही सांगता येत नाही. असं म्हणतात की, बायका देखण्या उमेदवाराला मते देतात ! पण आपल्यावरून जग ओळखावं ही म्हण सर्वच ठिकाणी लागू पडत नाही ! त्यामुळं पुरुषांनी आपल्यावरून स्त्रियांची परीक्षा करून ठोकून दिलेलं हे मत असेल.

अशी परिस्थिती असल्यानं प्रचारक हे, कट्टर असलेल्या प्रतिपक्षाच्या मत-दारांशी बोलण्यांत ज्यास्त वेळ घालवीत नाहीत. फक्त Floating Vote वर्गातला जो दिसेल त्याला आपलं म्हणणं पटवून देण्याचा ते प्रयत्न करतात.

मतदारही प्रचारकांशी मोठ्या शिताफीनं वागतात. विरुद्ध पक्षाचा प्रचारक असला तर ते रागावून त्याला झिडकारीत नाहीत. उलट, "आपण आलात आभारी आहे. आपल्या म्हणण्याचा जरूर विचार करू" अशा शब्दांनी त्याला निरोप देतात. यात विशेष असं काही नाही म्हणा. कारण इंग्लिश माणूस नेहमीच विनयानं वागतो. पण मुद्दा एवढाच की, निवडणुकीच्या वेळी देखील त्याच्या मनाचा समतोलपणा सुटत नाही. याचं आणखी एक उदाहरण म्हणजे एकाच ऑफिसात, क्लबात किंवा घरातही विरुद्ध पक्षांचे अनुयायी असतात; आणि साहजिकच निवडणुकीच्या मोसमात त्यांचा वाद सुरू होतो.

फरक एवढाच की असे वाद चव्हाट्यावर होत नाहीत. आरडाओरडाही मर्यादेच्या बाहेर होत नाही. वाद हमरीतुमरीवर आल्यावर We agree to differ असं म्हणून वाद थांबवतात. अशा वादानंतर एकमेकांच्या मनात किल्मिषही रहात नाही. पुन्हा खेळीमेळीनं वावरायला लागतात सारे. राजकारणातली मतं किंवा विरोध यांचा खासगी जीवनावर काही परिणाम दिसत नाही.

निवडणुकांच्या खर्चाच्या बाबतीत एक मजेदार गोष्ट ऐकली मी. एके ठिकाणी हुजूर पक्षाच्या उमेदवारानं खवचटपणा करून भिंतीवर एका मजूर पक्षाच्या उमेदवाराचं नाव लिहून "मला मते द्या" अशी मोठी जाहिरात तयार केली. उद्देश हा की त्या मोठ्या जाहिरातीचा खर्च मजूरपक्षाच्या उमेदवाराच्या नावावर पडून त्याला इतर प्रचारकार्यासाठी पैसे कमी पडावेत! मजूर पक्षाच्या उमेदवाराला हे कळतांच त्यानं स्वखर्चानं ती जाहिरात पुसून टाकली. पण त्याचं कमनशीब असं की ती बातमी बाहेर फुटली व जाहिरात पुसायचा व ती रंगवायचा असे दोन्ही खर्च त्याच्या हिशोबात दाखवावे लागले!

मतदारांना मत द्यायला आणण्यासाठी मोटारींची गर्दी मुळीच नसते. प्रत्येक उमेदवाराला एक किंवा दोनच मोटारी ठेवण्याची परवानगी असते. आधीपासून मोटारी कोणत्या कामासाठी वापरायच्या हे कळवावं लागतं. ठरल्यापेक्षा जास्त मोटारी वापरता येत नाहीत. हे तंत्र जर नीट-नाही पाळलं तर तो उमेदवार बदनाम होण्याचा संभव! स्वतः मोटारीतून मत द्यायला जाताना जरी त्यानं एखादा मित्र बरोबर घेतला तरी ते "प्रकरण" त्याच्यावर शेकण्याचा संभव असतो.

या साऱ्या क्षुल्लक गोष्टी वाटतात. पण त्या अगदी काटेकोरपणे पाळल्या जातात. यातून एक मुद्दा स्पष्ट होतो. तो म्हणजे सगळ्या उमेदवारांना प्रचार करण्याची समान संधी दिली जाते. एखादा उमेदवार श्रीमंत असला म्हणून त्याला गरीब उमेदवारापेक्षा अधिक डामडौलात प्रचार करता येत नाही. खर्चाच्या निर्बंधामुळं साऱ्यांना समान संधी मिळते.

निवडणुकीत जी दृश्यं दिसतील अशी माझी कल्पना होती ती दिसली नाहीत म्हणून वाईट वाटण्याऐवजी, जे लोक पिढ्यान्‌पिढ्या लोकशाहीत नांदले,

ज्यांच्या रोमरोमात लोकशाही भिनली आहे अशा लोकांची निवडणूक लढ-विण्याची रीत किती प्रशंसनीय आहे ती बघायला मिळाल्याचा मला फार आनंद झाला. आपल्या देशात ज्या दिवशी अशा निवडणुका होतील तो सुदिन ! नाही का ?

असो. पत्र फार लांबलं. नाहीतर तुम्ही म्हणाल, तुलाही कागदाच्या खर्चावर निर्बंध घालायला पाहिजे !

सर्वांस स. न.

आपली
**ताई**

गार्संडेल
१५–३–५०

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

मी हे पत्र गार्संडेल नावाच्या खेडेगावातून लिहीत आहे. मागील सोमवारी मी आपल्याला पत्र टाकलं तेव्हा इथं यायचं ठरलं नव्हतं. पण सहजच सोमवारी मिसेस मॅकच्या ग्लॅडिस नावाच्या बहिणीबरोबर इथं आले.

मागं मी इथल्या कंट्री लाइफविषयी थोडं लिहिलं होतं असं वाटतं. पण ती खेडी होती सुधारलेली. जसजसं आपण उत्तरेकडं येतो तसं डोंगरामधे वसलेली ही लहान लहान खेडी अजूनही मागासलेली आढळतात. अर्थात आपल्या खेड्यांइतकी नव्हे ! इंग्लंडच्या दृष्टीनं ती मागासलेली वाटतात इतकंच काय ते. खेड्यांतून पाण्याचे नळ नाहीत. डोंगरातून झिरपणारं पाणी इथल्या बायका आणतात. आपल्याकडे जसे मातीचे संडास असतात तसेच इथं आहेत. इलेक्ट्रि-सिटीही नाही. पण ग्लॅडिसने तिच्या बंगल्यापुरता लहानसा इलेक्ट्रिक प्लँट बसविलेला आहे. त्यामुळं फक्त तिच्याच घरी लाइट आहेत. इथल्या शाळेत मी गेले होते. एकाच खोलीत तीन-चार वर्ग एक शिक्षक घेतो. ग्लॅडिसचं घर

अनुक्रम ३८६५२ दि: ... 
... ३६८ ... ही मूल्ये : ८४

जरी बाहेरून मातीचं व खेडवळ दिसत असलं तरी आतून तिनं ते खूपच सजवलं आहे. आत असताना आपण खेड्यात आहोत असं वाटत नाही. दोन डोंगरांच्यामधे वसलेलं केवळ दहा-बारा घरांचं असं हे खेडं आहे. ग्लॅडिस-खेरीज आणखी दोनतीन घरांतून मी जाऊन आले. तीही आतून व्यवस्थित सजविलेली दिसली. त्यावरून असं वाटलं की गाव जरी मागासलेलं दिसलं तरी लोक काही तसे नाहीत.

इथली सीनसीनरी उत्कृष्ट आहे. माझी अशी खात्री आहे की आपल्या-कडील पुष्कळ लोक जे इंग्लंडला येतात, ते काही इतक्या लहान खेड्यामधे जाऊन आलेले नसावेत. मला ते शक्य झालं.

शुक्रवारी इथून आम्ही परतणार आहोत.

बाळासाहेबही वीकएंडसाठी इथं येणार आहेत. मग आम्ही परतू. या खेड्यातील लोकांनी भारतीय लोक पूर्वी पाहिलेले नव्हते त्यामुळं त्यांना फार नवीन वाटत होतं.

गार्सडेलच्या शेजारच्या गावात आम्ही एक सिनेमा देखील पाहिला. शाळे-तर्फे फोटो काढले आमचे.

येत्या शनिवारी ग्रॅंड नॅशनल रेस आहे. ती बघायला आम्ही लिव्हरपूलला जाणार आहोत. ही रेस सर्वांत मोठी असल्यामुळं राजा, राणी येणार आहेत. रेस पाहिल्यावर रविवारी लंडनला जाणार आहोत.

आता हिवाळा संपून उद्यापासून वसंतऋतू ( Spring ) सुरू होईल. सगळी-कडं नवीन पालवी फुटायला लागली आहे. थोड्याच दिवसांत सगळीकडं हिरवंगार होऊन जाईल. फुलं बहरतील. आता पुन्हा वीकएंड ट्रिप्स काढता येतील. हिंवाळ्यानंतर पहिलं फूल येतं ते म्हणजे Daffodil ... डॅफोडिल. ते पहायला मी उत्सुक आहे आता. असो.

तुमची
**ताई**

लिव्हरपूल
२३–३–५०

प्रिय अप्पा,

बऱ्याच दिवसांनंतर तुमच्याकडील पत्र आलं. ते पत्र लिव्हरपूलला आलं तेव्हा मी इथं नव्हते.

इतके दिवस सगळं 'रुटीन' चालू होतं. पण आता वसंतऋतू सुरू झाला आहे. सगळी झाडं कळ्याफुलांनी भरून गेली आहेत. स्प्रिंग फ्लॉवर्सही आली आहेत. स्प्रिंगमधे येणारं पहिलं लाडकं फूल म्हणजे डॅफोडिल. त्याच्यावर बऱ्याच कवींनी कविता केलेल्या आहेत. हे फूल पाहिल्यावर मला मात्र वाटलं ...एवढं काही कौतुक करण्यासारखं फूल नाही हे! पण इतके दिवस एकही फूल दृष्टीस न पडल्यामुळं पहिल्यांदा नजरेपुढं येणारं म्हणून या डॅफोडिलचं इतकं कौतुक. नशीबवान फूल खरंच!

मी आता इथं शॉपिंग करण्यात पटाईत झाले आहे. पण इंग्लंडातच बरं का! इथलं शॉपिंग नि आपल्याकडलं शॉपिंग यांत खूप फरक आहे. इंग्लंडातलं शॉपिंग म्हणजे एक करमणूक आहे. कितीतरी नवीन नवीन वस्तू पहायला मिळतात इथं. हिंदुस्थानातलं शॉपिंग म्हणजे मात्र एक कंटाळवाणी व संतापजनक भटकंती असते. त्यामुळं मी परत आल्यावर तिथं देखील शॉपिंग करीन याची आशा तुम्ही कुणी धरू नका. हो आपलं आधी सांगितलेलं बरं, नाही का?

प्रकाशला मी तार पाठविली नाही म्हणून अण्णासाहेबांना वाईट वाटलं ना? माझ्यासाठी बारा आणे खर्चून निराळी निमंत्रणपत्रिकाही त्या लोकांनी पाठविली नाही. मग मी जी. पी. ओ. पर्यंत इतकं लांब जायचं. रात्रीच्या वेळी बाळासाहेबांना बरोबर यायचा त्रास द्यायचा. एवढं कुणी सांगितलंय? माझा हा स्वभाव तुम्हांला शिष्टपणाचा किंवा अहंपणाचा वाटेल. पण या माझ्या स्वभावात फरक पडण्याचं कारण म्हणजे मी इथं पाहिलेले इथल्या लोकांचे बारीक सारीक रीतीरिवाज. पती व पत्नी या दोघांनाही इथं स्वतंत्र अस्तित्व

आहे. नवराबायको दोघांनाही बोलवायचं असेल तर मिस्टर अँड मिसेस असं लिहायला नको का ? शिवाय माझ्याकडं जे पत्र आलं ते इतकं अव्यवस्थित होतं की ते बघूनच मला उबग आला. वर पत्ता होता “ मिस्टर धांदरफळे ” मग मी कशाला वाचू ? इंग्लिश माणूस साधं पाकिटाच्यावर तिकिटं लावण्याच्या बाबतीत देखील व्यवस्थित असतो. उजव्या हाताच्या कोपऱ्यात तिकिटं व डाव्या हाताच्या कोपऱ्यात एअरमेल असं लेबल. तुला माहीत आहे ? इथं यंत्रानं स्टँप मारले जातात. अर्थात यंत्र काही तुमचं पत्र उलटसुलट करून शिक्के मारीत बसणार नाही. पण आपल्याकडले लोक कुठंही कशीही तिकिटं चिकटवितात. पोस्टखात्याला त्यामुळं किती त्रास होत असेल याचा कुणी विचारही करीत नाही.

साध्या साध्या गोष्टी आहेत या. पण असल्या साध्यासुध्या गोष्टीच इंग्रज माणसांपासून शिकण्यासारख्या आहेत, असो. पुष्कळ झालं हे. नाहीतर त म्हणशील शहाणपणाचं लेक्चर देते मी !

तू म्हणतोस त्याप्रमाणं मी फार पिक्चर्सना जात नाही. इथं सकाळी दहा-पासून रात्री दहापर्यंत सारखा सिनेमा सुरू असतो. एवढा सगळा वेळ खिडक्या-दारं बंद.

आत फॅन्स देखील नसतात. उलट हीटिंग सिस्टिम सुरू असते. त्यातच लोक एकसारखे सिगरेटी ओढीत असतात. त्यांचा धूर कोंडला जाऊन थिएटर अगदी “ स्टफी ” होऊन जातं. तिथं बसवत नाही. मात्र मी कधी कधी एक तासाच्या न्यूज प्रोग्रामला जाते.

इथल्या कालेजेसबद्दल ... मी कॉलेजात जात नसल्यामुळं त्याची फारशी माहिती नाही. पण त्यांना उन्हाळ्यात सुट्टी मिळते हे मात्र समजलं.

उद्या बाळासाहेब येणार आहेत स्टोनहून. आम्हांला ग्रँड नॅशनल रेसला जायचं आहे.

अच्छा. आता झोप यायला लागली आहे. पत्र पुरे करते हं.

तुझी
**ताई**

लंडन
२७-३-५०

प्रिय रत्ना,

...शुक्रवार, रविवार फार गडबडीत गेले. हो, एक आनंदाची बातमी सांगायची म्हणजे आज आम्ही गाडीची ऑर्डर दिली. Hillman Minx गाडी आहे. ड्रायव्हिंग व्हीललाच गियर्स आहेत. गाडीचा रंग Pastel blue आहे. सर्वांना ती नक्की आवडेल !

रविवारी रेसला गेलो होतो. सहज म्हणून एका घोड्याला पाच शिलिंग लावले. तोच योगायोगानं पहिला आला व ४५ शिलिंग मिळाले ! प्रिन्सेस एलिझाबेथचा घोडा रेसमधे पडला. एकंदर ४९ घोडे होते पण त्यांतल्या ७ घोड्यांनी Course पूर्ण केला. सहासहा फूट उंचीच्या फेन्सवरून उड्या मारायच्या म्हणजे काही चेष्टा नाही. एका घोड्याला तर इतकं लागलं की शेवटी त्याला गोळी घालून मारून टाकावं लागलं.

...आता पुरे करते. काय मजकूर राहिला असेल तो पुढील पत्रात...

तुझी
**ताई**

आर्यभुवन
लंडन २७-३-५०

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

...काल आम्ही इथं आलो. बिर्लानं चालविलेलं हॉटेल आहे हे. पैशाच्या मानानं व्यवस्था काहीच नाही. दोघांचे मिळून एका दिवसाला चाळीस रुपये घेतात. एवढे पैसे देऊन इथल्या एखाद्या Posh इंग्लिश हॉटेलात देखील राहता आलं असतं. पण म्हटलं हे भारतीय हॉटेल आहे; राहू या ! पण नाही.

इंडियन लोकांना नीट हॉटेल काही चालवता येत नाही. तुम्हांला वाटेल, इंग्लंडला आले म्हणून इंडियन लोकांना नावं ठेवते. पण तसं नाही. चूक दिसेल तिथं चूक आहे असं तरी म्हणू नये का ? तुम्हीच सांगा, रोज वीस रुपये घेतात; आणि साध्या ॲल्यूमिनियमच्या ताटात जेवायला देतात. जेवण तरी कसलं ?...जाऊद्या झालं. चार दिवसांचा प्रश्न आहे.

शुक्रवारी रात्रीच्या गाडीनं परत लिव्हरपूलला जाणार आहोत. शनिवार-रविवार इथंच राहिलो असतो. पण शनिवारी एका लग्नाला हजर राहायचं आहे. इंग्लिश लग्नं कशी असतात ते पाहायचा अनायासं योग आला आहे. तो घालवावासा मला वाटत नाही. म्हणून पत्र इथंच पुरं करते.

आपली
**ताई**

55 Belsize Lane
लंडन २४-४-५०

प्रिय अप्पा

मी डब्लिनहून पाठविलेलं पत्र मिळालंच असेल. खरं सांगायचं म्हणजे आयर्लंडहून परत आल्यावर मात्र हे पहिलंच पत्र मी लिहीत आहे. त्याचं असं झालं. ईस्टरला आम्ही आयर्लंडला गेलो. पण दुर्दैवानं त्या वेळी सबंध ब्रिटिश बेटांत हवा अतिशय वाईट होती. ताशी ९०-९२ मैलांच्या वेगानं वारे वाहात होते. घटकेत पाऊस तर घटकेत ऊन. लागलीच गारा. पाठोपाठ बर्फ ! काय वाटेल ते होत होतं ! इतकी क्षणाक्षणाला बदलणारी हवा मी आयुष्यात कधी पाहिली नव्हती. लिव्हरपूलला असते तर घराच्या बाहेर पडले नसते. पण आयर्लंड पहायला म्हणून आल्यावर घरी कोण बसणार ? हवेकडं लक्ष न देता सकाळपासून रात्रीपर्यंत सारखे आम्ही भटकत होतो.

डब्लिन ही स्वतंत्र आयर्लंडची राजधानी आहे. गुडफ्रायडेची सुट्टी असल्यानं सगळं बंद होतं. त्यामुळं बाहेरूनच सारं काही पाहिलं. ट्रिनिटी कॉलेज...या

कॉलेजची लायब्ररी फारच मोठी आहे. कोणतंही पुस्तक प्रसिद्ध झालं की त्याची पहिली प्रत या लायब्ररीत येते. पोस्ट ऑफिस ...इथूनच आयर्लंडचं स्वातंत्र्य-युद्ध लढलं गेलं. सारं काही पाहून दीड वाजता लंचसाठी हॉटेलमधे परत आलो. गुडफ्रायडे असल्यानं जेवायला Boiled Salman fish होता. चांगला लागतो. जेवण झाल्यावर फिनिक्स पार्क नावाच्या बागेत गेलो. अतिशय सुरेख बाग आहे ही. बागेत एक भव्य War Memorial आहे. त्यावर In Memory of Indian Soldiers असं लिहून खाली इंडियन सैनिक लढताना दाखविले आहेत. ते पाहून बरं वाटलं. या पार्कचा परीघ जवळ जवळ सात-साडेसात मैल आहे. त्या पार्कमधे हिंडून आम्ही इतके थकून गेलो होतो की, त्यानंतर प्रेसिडेंटचा पॅलेस पहायला जाण्याचं त्राण राहिलं नाही.

सारखा पाऊस पडत असल्यानं थंडीही वाजत होती. दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी सकाळी नेल्सन कॉलमवर चढून गेलो. आपल्या कुतुबमिनार सारखीच इमारत आहे ही. तितकी उंच नाही-पण-तरी बरीच उंच आहे. त्यावरून साऱ्या डब्लिन शहराचा देखावा छान दिसतो.

तिथून मग बाजारात हिंडून थोडं शॉपिंग केलं. तू म्हणशील जिथं तिथं तुझं आपलं शॉपिंग ! अरे, आयर्लंडमधे रेशनिंग नाही. वाटेल तितकी साखर मिळत होती. अर्थात बाहेर न्यायला मात्र माणशी दोन पौंड परवानगी आहे. इंग्लंडमधे आल्यापासून माझं आवडतं फळ-केळी-मिळाली नव्हती ती इथं घेतली. इंग्लंडमधे फक्त मुलांना व गरोदर स्त्रियांनाच केळी मिळतात. डब्लिनमधे वाटेल तितकी केळी बघून मला आनंद झाला. आयरिश लिनन फार प्रसिद्ध आहे. आयरिश लिनन वापरणं म्हणजे फार चैनीचं व सौंदर्याचं समजलं जातं. मी लिननचा एक टेबलक्लॉथ घेतला. आयर्लंडमध्ये इंग्लंडच्या मानानं खूपच स्वस्ताई आहे. दुकानात वाटेल तितका माल आहे; पण लोकांपाशी इंग्लंडसारखा पैसा नाही. एक गोष्ट मात्र दिसून आली ती म्हणजे हे आयरिश लोक गरीब असले तरी फार देशाभिमानी आहेत. त्यांच्याइतके इंग्लिश लोकांचा द्वेष करणारे लोक दुसरे नाहीत. एक वेळ जर्मन लोक थोडं तरी इंग्रजांबद्दल चांगलं बोलतील; पण आयरिश लोक स्वप्नात देखील एक चांगला शब्द बोलणार नाहीत इंग्रजांबद्दल! रात्री आम्ही ॲबी थिएटरमधे नाटकाला गेलो. तिथं एक राजकीय नाटक

चाललं होतं. आपल्याकडल्या नाटकांसारखंच वाटलं. बाकी हिंदुस्थान व आयर्लंड हे दोन्ही देश स्वातंत्र्यासाठी झगडलेले असल्याने दोघांमधे राजकीय नाटकांमध्ये साम्य असणारच.

आयर्लंडची कंट्री साईड फार प्रसिद्ध आहे. डब्लिनपासून ३५ मैलांवर असलेली गुंडेलॉक व्हॅली पाहायला जायचं आम्ही ठरविलं. पाचजणांनी मिळून एक टॅक्सी केली. रविवारी सकाळी निघालो. "कीलायनी" व आणखी समुद्रकाठची सौंदर्यस्थळं पाहिली. दीड वाजता गुंडेलॉक व्हॅलीला पोचलो. तिथं किती फोटो घ्यावेत नि किती नाही असं होऊन गेलं! It is a wonderful Beauty Spot... ! पण पावसानं नि गारांनी खूप मनावर घेतलं होतं त्या दिवशी. मधेच चारपाच मिनिटं चक्क ऊन पडलं की, धावत जाऊन आम्ही फोटो घेत होतो. पुन्हा पाऊस आला की, धावत धावत येऊन बसायचं. सोमवारी सकाळी अकरा वाजता नॉर्थ आयर्लंडच्या बेलफास्ट या गावी जाणाऱ्या गाडीनं जायचं आम्ही ठरविलं. हे बेलफास्ट इंग्रजांच्या ताब्यात आहे. अजून डब्लिनमधलं चर्च सेंट क्विम्स पहायचं राहिलं होतं म्हणून मग तिकडं गेलो. त्या चर्चमधील व्हॉल्ट्स सकाळी दहा वाजता उघडतात. बरोबर दहा वाजता आम्हांला व्हॉल्ट्स उघडून आत नेण्यात आलं. या व्हॉल्ट्सचं वैशिष्ट्य म्हणजे पाचसहाशे वर्षांपूर्वी इथं पुरलेली प्रेतं अजून जशीच्या तशी आहेत. त्यांच्यावर घातलेले फुलांचे हार सुद्धा इतकी वर्षे झाली तरी अजून चांगले आहेत. सबंध जगात अशा प्रकारानं फक्त तीनच टिकाणी प्रेतं सुरक्षित ठेवली जातात. एक डब्लिनच्या चर्चमधे, दुसरं फ्रान्समधील एका खेड्यात व तिसरं जर्मनीमधे एका टिकाणी! मोठमोठे लॉर्ड्स वगैरे लोक आपल्या कुटुंबासाठी असे व्हॉल्ट्स विकत घेतात व कुटुंबातील कोणी मेलं तर त्यांचे कॉफीन या व्हॉल्टमधे नेऊन ठेवतात. अशा व्हाल्टची बरोबर कल्पना यायला हवी असेल तर तू रोमियो अँड ज्यूलिएट हा सिनेमा पहा. त्यात ज्यूलिएट मेल्यावर तिला व्हॉल्टमधे ठेवून दिलेलं असतं. मग त्या ठिकाणी रोमियो व तिचा नियोजित पती यांची त्या व्हॉल्टमधे लढाई होते ...

...सोमवारी आयर्लंडचा स्वातंत्र्यदिन होता. त्या दिवशी खूप मोठी परेड निघणार होती. पण मंगळवारी आम्हांला लिव्हरपूलला परत जायला पाहिजे

होतं म्हणून परेड पाहण्याचा मोह सोडून आम्ही बेलफास्टला आलो. तिथं बेल व्ह्यू पाहायला गेलो. पर्वतीसारखं खूप पायऱ्या चढून वर जावं लागतं. तिथून फोटो घ्यायचं मनात होतं पण शेवटच्या पायरीपर्यंत आल्यावर धुकं दाटून आलं. जोराचा वारा सुरू झाला. पावसाला सुरुवात झाली. पाच-दहा मिनिटांत बर्फ पडायला सुरुवात होऊन सगळीकडं पांढरंशुभ्र होऊन गेलं. एक तासभर आम्ही थंडीत कुडकुडत उभे होतो.

संध्याकाळीं सात वाजता स्टेशनवर परत आलो. तिथं ठेवलेलं सामान घेऊन बोटीत येऊन बसलो. आधीच आयर्लंडचा समुद्र त्याच्या Roughness बद्दल प्रसिद्ध आहे. त्यात आणखी त्या दिवशी हवा खराब होती. त्यावरून कल्पना कर. जागेवर झोपणं दूरच. नुस्तं बसणंही कठीण झालं होतं. प्रत्येकाला सी-सिकनेस आला. असं वाटत होतं कधी एकदा हा प्रवास संपतो नि कधी आपण लिव्हरपूलला जाऊन पोचतो...

सकाळीं आठ वाजता लिव्हरपूलला पोचलो व सबंध दिवस पांघरूण घेऊन झोपून राहिलो.

पुन्हा शनिवारी आम्ही नॉर्थ वेल्समधील लॅंडेडनी, कॉनवे ही गावं पाहून आलो.

बुधवारी बेट्सी कोइड व तिथला स्वालो वॉटर फॉल्स पाहून आलो. डर्बी-शायर मधील मूर्स देखील पाहिला. इथं आल्यावर देखील कालच्या रविवारी विंडसरला जाऊन विंडसर कॅसल, ईटन कॉलेज वगैरे पाहून आलो.

आता त्या सर्वांची वर्णनं पुढील पत्रात. माधवला म्हणावं त्याच्या डेन्मार्कच्या मैत्रिणीचा पत्ता कळव. आम्ही मे अखेर डेन्मार्कला जाणार आहोत. २० जुलैला बोटीनं इंग्लंड सोडून मुंबईला येण्याचा आत्तापासून विचार करतो आहोत. तो विचार नंतर बदलेल की काय ते आत्ता सांगता येत नाही...

सर्वांस स. न.

तुझी
**ताई**

५५ बेलसाईझ लेन
लंडन
१–६–५०

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

आम्ही आता लौकरच यूरोपच्या ट्रिपवर जाण्याचा विचार कायम करीत आहोत. श्री. व सौ. सुलाखे इथं आल्याचं तुम्हांला माहीतच आहे. ते व आम्ही बरोबरच जाऊ. इथं गेले आठ-दहा दिवस हवा फार खराब पडली आहे. वास्तविक पाहता वसंतऋतू म्हणजे किती छान हवा असायला पाहिजे. पण हिवाळा चांगला गेला ना! मग We must pay for it! कुठं बाहेर जाता येत नाही; काही नाही. लिव्हरपूलसारखं इथं लंडनमधे ओळखीचे लोकही नाहीत.

पूर्वी ठरल्याप्रमाणं आम्ही डेन्मार्कला गेलो नाही. एकाएकी स्कॉटलंडला जायचा विचार ठरला. रविवारी सकाळीं आम्ही मोटारीनं निघालो. स्वतःच्या गाडीतून प्रवास करण्यात काय मौज असते हे आम्हांला स्कॉटलंडच्या प्रवासातून कळून आलं. खूप गावं पाहिली...स्कॉटलंडचं वर्णन मी तर सविस्तरच करणार आहे...

लहानपणी कॉनन डॉईलच्या व शर्लॉक होम्सच्या रहस्यकथा वाचून स्कॉटलंडची ओळख झाली होती. The Hound of Baskervilles ही गोष्ट मी वाचली होती. त्या गोष्टीतलं कथानक स्कॉटलंडमधील आहे. स्कॉटलंडमधील थंडी वारा, निर्जन प्रदेश व स्कॉटिश लोकांचे विचित्र स्वभाव यांची वर्णनं पुस्तकांतून वाचून स्कॉटलंडविषयी फारसं प्रेम न वाटता उलट भीतीच होती मनात. मॅकबेथमधील स्कॉटलंडची दृश्यं बघून या भीतीला दुजोराच मिळाला. Wuthering Heights हा सिनेमा पाहून स्कॉटलंड हा एक भुताटकीचा प्रदेश आहे अशी ठाम कल्पना होऊन बसली होती.

लिव्हरपूलला गेल्यापासून मी स्कॉटलंडची चौकशी करीत होते. चौकशीत कळलं की माझ्या स्कॉटलंडविषयीच्या कल्पना या अगदीच काही चुकीच्या

नव्हत्या. फरक इतकाच की सबंध स्कॉटलंड तसं नसून फक्त थोडासा हायलँडचा अतिशय डोंगराळ भाग भीतिदायक आहे. पण त्याची काळजी करायचं कारण नव्हतं. कारण त्या भागात फारसे लोक राहातही नाहीत. रेल्वे किंवा चांगले रस्ते नसल्यामुळं तिकडं प्रवासी लोक जात नाहीत. तेवढा हायलँडचा भाग सोडला तर बाकीचं स्कॉटलंड निसर्गशोभेत इंग्लंडला मागं टाकतं. इंग्लंडमधे लेक डिस्ट्रिक्टमधल्या सौंदर्यावर मी निहायत खूष झाले होते. त्याच्याहीपेक्षा अधिक सौंदर्य स्कॉटलंडमधे आहे असं कळल्यापासून स्कॉटलंड पाहिल्याशिवाय परत हिंदुस्थानला जायचं नाही असं मी ठरविलं होतं.

लिव्हरपूल स्कॉटलंडला जवळ आहे. लिव्हरपूलला असतानाच स्कॉटलंडच्या ट्रिपचं ठरलं असतं तर ते स्वस्त पडलं असतं. तसा एकदा विचारही केला होता. पण त्या वेळी ऑक्टोबर महिना होता नि थंडी पडायला लागली होती. लिव्हर-पूलपेक्षा स्कॉटलंडमधे थंडी खूपच असते आणि आमचा इंग्लंडमधील पहिलाच हिवाळा असल्यानं मुद्दाम ज्यास्त थंडीत जाण्याचं धाडस करू नये असा काही लोकांनी सल्ला दिला. शिवाय त्या वेळी शरद ऋतू असल्यानं झाडांची पालवी झडायला लागली होती. आम्हांला स्कॉटलंडचं निसर्गसौंदर्य पाहायचं होतं म्हणून त्या वेळी ती ट्रिप रद्द केली व पुढच्या उन्हाळ्यात जायचं ठरविलं होतं.

निसर्गाचं सौंदर्य गाडीतून किंवा बसमधून मनमुराद लुटता येत नाही. कारण एखादं आकर्षक दृश्य दिसलं की त्याच्याकडं डोळे भरून पाहता येत नाही. गाडी किंवा बस पुढं निघून जाते. आत्तापर्यंतच्या अनुभवावरून रेल्वेपेक्षा बसचा प्रवास महाग पडतो हे कळलं होतं. शिवाय एखाद्या गावी पोचल्यानंतर काही पाहायचं असलं तर पाय दुखेपर्यंत चालावं लागतं. असं करण्यात वेळ मोडतो व त्रासही होतो. स्कॉटलंडमधे अमुक एक ठिकाण आल्हाददायक आहे तेवढंच पाहायचं असंही आमचं ठरलं नव्हतं. निसर्गाच्या सान्निध्यात काही दिवस मजेनं हिंडायचं एवढंच आमचं ठरलं होतं. हे सारं करायला स्वतःची मोटार असण्याखेरीज दुसरा सोपा इलाज नाही. स्वतःची मोटार घेतल्यावर स्कॉट-लंडची ट्रिप काढायचा बेत आम्ही मोटार घ्यायच्या आधीपासूनच करीत होतो.

मोटार घेतल्यावर देखील इतका मोठा प्रवास करायचा कसा ? मोटार चालवण्यात आम्ही दोघंही नवखे ! सुदैवानं त्याच वेळी देशमुखांची ओळख

झाली. देशमुखांना मोटार चालवण्याचा खूपच सराव होता. एके दिवशी बोलता बोलता स्कॉटलंडच्या ट्रिपचा विषय निघाला व देशमुख आपण होऊन आमच्याबरोबर यायला तयार झाले. राजगोपालनाही बरोबर घेतलं. सगळे बेत ठरवायला फक्त दोन दिवसांचा अवधी होता. एकंदर आठ दिवसांची ट्रिप, जवळ जवळ दोन हजार मैलांचा प्रवास. कुठं कुठं जायचं, काय काय करायचं, कुठं मुक्काम करायचे, या साऱ्याची व्यवस्था राजगोपालकडं सोपविली. मोटार चालवण्याचं काम देशमुखांकडं. मी व बाळासाहेब देखील मधून मधून मोटार चालवायचं काम घेत होतो...

पेट्रोलचं रेशनिंग असल्यानं इतक्या लांब प्रवासासाठी प्रवाशांना जादा पेट्रोल कूपन्स मिळवण्याचं काम देशमुखांनी केलं. असली कामं Automobile Association ही आपल्या मेंबर्ससाठी करते. कूपन्स देताना काउंटरवरची पोरगी म्हणाली की ही कूपन्स आठवण म्हणून जपून ठेवा. कारण आता एका तासापूर्वीच रेशनिंग उठलं आहे ! ट्रिपला मुहूर्त तर चांगला लागला. आता हिंडण्यावर मर्यादा घालायचं कारण राहिलं नव्हतं.

इतका मोठा प्रवास करायचा होता तरी त्याची फारशी तयारी करावी लागली नाही. रात्रीचा मुक्काम जिथं करायचा तिथं अंथराय-पांघरायला सारं काही मिळत असल्यानं बरोबर गाद्या, चादरी, उशा वगैरे काही नेण्याची जरुरी नव्हती. टॉयलेटचं सामान व रात्री घालायचे कपडे घेतले की झालं. खायला काही बरोबर असावं म्हणून ब्रेड, लोणी व थर्मास वगैरे वस्तू घेतल्या. मोटारीचीही काही तयारी करायची नव्हती. रस्ते डांबरी असल्यानं कसली धास्ती नव्हती. तशातूनही पंक्चर झालीच तर Automobile Association चे लोक रस्त्यावर कुठंही असलो तरी सगळी मदत करतात. गाडीत पाण्याचा ड्रमही घ्यायची जरुरी नव्हती.

शनिवारी सकाळी आम्ही घर सोडलं. राजगोपालनं ठरविलेल्या कार्यक्रमाप्रमाणे आम्ही प्रथम केंब्रिजला जाणार होतो. त्यानं नकाशावरून रस्ता देखील ठरवून ठेवला होता. पण नकाशात जरी रस्ता असला तरी प्रत्यक्ष जाताना फार घोटाळे झाले. बहुतेक प्रत्येक वळणाला देशमुखांचं नि राजगोपालचं चर्चासत्र सुरू व्हायचं- त्यांचं बोलणं विनोदानं चाललं असल्यानं आमची खूप

करमणूक व्हायची. नकाशा असताना देखील रस्ते चुकतात हे तेव्हा मला पटलं. नकाशापेक्षा सरळ कुणाला तरी विचारण्याचा जास्त उपयोग होतो. इकडं लहान मुलापासून म्हाताऱ्यापर्यंत कुणीही रस्ता विचारल्यावर आनंदानं सांगतात. माहीत नसेल तर I am Sorry असं सभ्य उत्तर देतात. पण आपल्याकडल्यासारखं लकडीपूल विचारल्यावर कॅंपचा रस्ता दाखवणार नाहीत !

रस्ता चुकत चुकत लंडन सोडायला आम्हांला अडीच तास लागले. आधी वाटलं होतं की दुपारच्या लंचला आपण केंब्रिजला जाऊ. तिथं एक हिंदी रेस्टॉरंट असल्याचं कळलं होतं. पण लंडन सोडायलाच इतका उशीर झाल्यामुळं मोटार एका झाडाखाली थांबवून आमच्याबरोबरचे खाद्यपदार्थ फस्त केले. गावाबाहेर रम्य जागा पाहून चहा-फराळ करायला फार मजा वाटते. आपल्याकडल्यासारखं किडे, मुंग्या, साप यांची इथं धास्ती नाही. हिरव्यागार गवताचा गालिचा पसरलेला असतो. थंडीमुळं पाणी पिण्याचाही प्रश्न नसतो. मऊ गवतावर लोळत फराळ करण्यात इतकी मजा येते की मला तर त्याची चटकच लागली. केंब्रिजला थोडाच वेळ थांबायचं असल्यामुळे फक्त Kings College च्या आवारातून फेरफटका मारून आलो. साऱ्या इमारतीत त्या कॉलेजचं chapel फारच भव्य आहे. कॉलेजपेक्षा कॉलेजच्या मागची बाजू प्रेक्षणीय आहे. तिथून कॅम नदी वाहते. ही एक छोटी नदी आहे; पण किती रम्य. तिच्या एका काठाला कॉलेजच्या इमारती आणि दुसऱ्या काठाला मोटमोठी झाडं. मधून मधून हिरवीगार लॉन्स आहेत. कॉलेजातल्या बागेत जायला ठिकठिकाणी पूल आहेत. त्या दिवशी शनिवार असल्याने तरुण-तरुणी नदीवर नौकाविहार करीत होते. फारच रोमँटिक वातावरण होतं. रम्य नदी ... तरुण-तरुणींचा नौकाविहार... सुंदर बगीचा...या गोष्टी असताना इथले लोक कॉलेजात कसे काय शिकतात याचं आश्चर्यच वाटतं ! फर्ग्युसन कॉलेजची ती बाग व तो कालवा यापुढं किती रुक्ष वाटतो. केंब्रिजसारखं वातावरण जर आपल्याकडं असतं तर मला वाटतं आपल्या कॉलेजांतल्या बाकांवर नक्की धूळ साठली असती !

स्कॉटलंडमधे प्रवेश केल्यावर पहिल्या प्रथम एडिंबरोला जायचं आम्ही ठरवलं होतं. पण ते शहर फार लांब असल्यानं पहिला मुक्काम यॉर्कला करायचा बेत करून केंब्रिज सोडलं. रस्त्यात एली नावाचं गाव लागतं. तिथलं कॅथेड्रल फार

प्रसिद्ध आहे. पण आमची इच्छा तिथं क्रॉमवेल एकेकाळी रहात असलेलं घर पहायची होती. क्रॉमवेलचं ते घर एलिझाबेथन पद्धतीनं बांधलेलं आहे. अगदी साधं.

हळूहळू अंधार पडायला लागला. रात्रीचे अकरा वाजून गेले तरी यॉर्क येण्याचं काही चिन्ह दिसेना. तेव्हा यॉर्कच्या अलीकडेच मुक्काम करायचं ठरवून टाकलं. ग्रॅथम नावाचं एक लहानसं गाव होतं ते. जिकडं तिकडं सामसूम झालेली होती. एकदोन हॉटेलांत जागेची चौकशी केली पण जागा भरलेल्या होत्या. ट्रिपच्या पहिल्याच रात्री मोटारीत झोप काढायचा प्रसंग येतो की काय असं वाटून आम्ही खट्टू झालो. पेट्रोलवरचं रेशनिंग उठल्यामुळं पुष्कळसे लोक ट्रिप्ससाठी बाहेर पडले होते असं एका पोलिसानं सांगितलं, त्यामुळं हॉटेलात जागा मिळणं कठीण होतं. शेवटी एका पोलिसानं स्वतः होऊन दोन-तीन हॉटेलांना फोन करून विचारलं. जागा नाही मिळाली तर आम्ही पोलिस चौकीतच झोपू असं म्हटल्यावर मात्र त्यानं अखेरचा प्रयत्न म्हणून आम्हांला सांगितलं की इथून दहा मैलांवर न्यूआर्क नावाचं खेडं आहे तिथं जागा नक्की मिळेल. लगेच त्यानं न्यूआर्कला फोन केला व जागा मिळवून दिली. पोलिसाच्या या वागणुकीचं आम्हांला कोण आश्चर्य वाटलं. आपल्याकडं रात्री रहायला जागा नसली तर धर्मशाळा किंवा रेल्वेची वेटिंग रूम आठवते. पण पोलिसाकडं तक्रार घेऊन जाण्याचा कधी विचार येतो का ? व अशी तक्रार घेऊन कुणी गेलाच तर पोलिस त्याची कशी संभावना करतील ! माझ्याकडं जागा मागता ? वेडबीड तर लागलं नाही ना ? पण इंग्लंडमधे पोलिसांचं काम फार व्यापक आहे. कुठलीही अडचण घेऊन पोलिसाकडं गेलं तरी त्याचं निवारण होतं. ग्रॅथमच्या पोलिसानं त्या रात्री आम्हांला मदत केली नसती तर आम्हांला मोटारीतच रात्र काढावी लागली असती.

त्या हॉटेलमधे सकाळी उठल्यावर कळलं की हे हॉटेल फार जुनं आहे व लॉर्ड बायरन्, ग्लॅडस्टन ही माणसं इथं राहून गेली आहेत. आम्हांला मोठा अभिमान वाटला. ब्रेकफास्ट उरकून आम्ही निघालो. दुपारच्या सुमाराला यॉर्कला पोचलो. इथं यॉर्क मिन्स्टर नावाचं मोठं सुंदर चर्च आहे. ते पाहून चारच्या सुमाराला आम्ही हॅरोगेटच्या जवळ पोहोचलो. हॅरोगेट तिथल्या

औषधी पाण्याच्या झऱ्यांसाठी प्रसिद्ध आहे. पण हे झरे कुठंच दिसत नाहीत. झऱ्यांचं पाणी एका इमारतीत आणलं आहे व तिथं त्या पाण्यानं आंघोळ करण्यासाठी न्हाणीघरं बांधली आहेत. कुठंही नसतील इतके म्हातारे लोक इथं दिसत होते ! तिथल्या एका बागेत आम्ही मनमुराद हिंडलो व पुढं डरहॅमला गेलो. तिथल्या किल्ल्यात युनिव्हर्सिटी आहे. दिवस मावळत चालला होता. त्यामुळं डरहॅमला फार वेळ न थांबता पुढं निघालो. त्या रात्रीचा मुक्काम केला न्यू कॅसलला.

न्यू कॅसल हे शहर इंग्लंडमधल्या इतर शहरांच्या मानानं जरा घाण वाटलं. कदाचित आम्ही हिंडलो तो भाग तसा असेल. न्यू कॅसलचे सबर्ब्स् फार चांगले आहेत म्हणे. पण आम्हांला ते पाहायला वेळ नव्हता.

दुपारी लंचनंतर एडिंबरोला येऊन पोचलो. एडिंबरो ही स्कॉटलंडची राजधानी. या शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. इथं कारखाने नसल्याने कोळशाची काजळी इमारतीवर दिसत नाही. त्यामुळं शहर एकदम चकचकीत वाटतं. प्रिन्सेस स्ट्रीट नावाचा इथला मुख्य रस्ता आहे. त्याच्या एका बाजूला इमारती व दुसऱ्या बाजूला सुंदर बाग आहे. त्यानंतर स्कॉट्स मेमोरियल नावाचा Walter Scot चा भव्य मनोरा आहे. या मनोऱ्यावर चढून आम्ही शहराची शोभा पाहिली.

दुसऱ्या दिवशी खूप लांबचा पल्ला गाठायचा असल्याने सकाळी लौकर निघायचं ठरविलं. निघता निघता अकरा वाजले. ब्रेकफास्ट झाल्यावर निघायच्या वेळी पाहतो तो काय, बॅग जागेवर नाही ! इकडं तिकडं शोधलं पण पत्ता लागेना.

Whitsum ची सुट्टी संपल्याने पुष्कळ लोक लंडनला चालले होते त्यांच्या सामानाबरोबर हीही बॅग गेली असावी असा संशय आला. हॉटेलच्या मॅनेजर बाईनं बस कंपनीला तसं कळविलं. पण बॅग येईपर्यंत थांबायला आम्हांला वेळ कुठं होता ? संध्याकाळी आम्हांला इन्व्हरनेसला पोचायचं होतं, राजगोपालनं समजूतदारपणानं ती बॅग घेण्यासाठी नंतर एडिंबरोला यायचं ठरविलं. म्हणून प्रश्न मिटला.

एडिंबरोहून आम्ही Queens Ferry ला आलो. इथं फर्थ ऑफ फोर्थ नावाची खाडी आहे. रेल्वेचा प्रसिद्ध फोर्थ ब्रिज इथं आहे. स्थापत्यशास्त्रातली एक अजब चीज असं फोर्थ ब्रिजचं नाव इतके दिवस ऐकत होते. पण फेरीमधून ह्या पुलाखालून जाताना त्याच्या भव्यपणाची खरी कल्पना आली.

Queens Ferry सोडल्यापासून रस्त्यात कुठं काही पाहण्यात मुळीच वेळ गेला नव्हता. त्यामुळं इन्व्हरनेसला रात्री लौकर जाऊन पोचलो. स्कॉटलंडचे दोन भाग पडतात. एक हायलँड्स व लोलँड्स. इन्व्हरनेस हे हायलँड्स म्हणजे डोंगराळ प्रदेशातलं मुख्य गाव आहे. इथलं महत्त्व फक्त Tourist लोकांमुळंच आहे. याच्या पलीकडं सहसा कुणी Tourist जात नाहीत. आमचा विचार अगदी उत्तर टोकापर्यंत म्हणजे Jhon o'Groats पर्यंत जायचा होता. अंतर बरंच होतं. दोन दिवस लागले असते. आणि नवीन असं काही पहायला मिळलंही नसतं. म्हणून तो विचार मग रद्द केला.

इन्व्हरनेस हे गाव टुमदार आहे. लॉकनेसच्या एका टोकाला वसलेलं आहे. नेस म्हणजे तळे, व लॉक म्हणजे लेक् ( Lake ). स्कॉटिश भाषा ! इथं मजेखातर खूप लोक येत असल्यामुळं शहरात प्रवेश करतेवेळी प्रवाशांची दखल घेतली जाते. Welcome To Inverness अशी पाटी आहे. शहरातून बाहेर पडताना Thank you अशी पाटी पाहून मला खूप कौतुक वाटलं, अगदी साधी गोष्ट ! पण त्यावरून धंदा करायला जरूर असलेला Phychological Touch दिसून येतो. ही पाटी पाहिलेल्या प्रवाशाला इन्व्हरनेसचं दुसरं काही जरी नाही आठवलं तरी Thank you म्हणणारे इन्व्हरनेसचे लोक यांचा कधी विसर पडणार नाही.

आमची मोटार टेकड्यांमधून वळणं घेत घेत जात होती. स्कॉटलंडमधे बरीच तळी आहेत; त्यांपैकी लॉकनेस हे सर्वात मोठं तळं. चोवीस मैल लांब पण रुंदीला एकच मैल. अफाट तलाव व त्याला लागून पलीकडे काळसर हिरवी गर्द झाडी व त्याच्यामागे करड्या रंगाच्या टेकड्या हे दृश्य बराच वेळ पाहूनही समाधान वाटत नाही. मोटार हळूहळू जात होती त्यामुळं निसर्गशोभा सावकाश, मनसोक्त पाहता आली.

काही अंतर गेल्यावर आम्ही थांबलो. फायर-फॉल नावाचा धबधबा पाहिला.

स्कॉटिश लोकांचा स्कॉटलंडविषयीचा अभिमान मोठा वाखाणण्यासारखा आहे. त्यांना कुठलीही गोष्ट विचारली तर मोठ्या अभिमानानं आपल्या देशाचं महत्त्व तुम्हांला पटवून देतील. दुसऱ्या गोष्टी चांगल्या असतील तर कबूल करतील, पण Bonnie Scotland त्यांना आवडतं म्हणून तुम्हांलाही आवडावं अशा तऱ्हेनं तुमच्याशी बोलतील व वागतील. स्कॉटलंडमधील निसर्ग-शोभा मला ज्यास्त आवडली का तिथल्या लोकांच्या हृदयाची शोभा अधिक आवडली हे माझं मलाच अजून कळत नाही. दोन्ही गोष्टी आवडल्या. कुणालाही त्या आवडतील.

बेन नेव्हिस हे पेनाईन रेंजचे सर्वांत उंच शिखर. त्याच्या उंचीचा स्कॉटिश लोकांना फार अभिमान वाटतो. बेन नेव्हिसची उंची सहा हजार फुटांपेक्षा ज्यास्त नाही !

पुन्हा एकदा डोंगराळ रस्ता संपवून आम्ही दुसऱ्या एका तळ्याच्या काठानं चाललो. दोन्ही बाजूंना डोंगर दिसत होते. जमीन लागवडीस निरुपयोगी होती. टिकटिकाणी फोफावलेली झुडुपं होती. असल्याच भागांना Moors म्हणतात. रस्त्यावरून जाताना ढग आलेले होते. हवा वादळी होती. वारा गार वाहायला लागला होता. रस्त्यात तर दुसरं कुणाचंही वाहन नव्हतं. Hound of Basker Villes मधल्या निर्जन मूर्सची मला आठवण झाली. वातावरण इतकं गंभीर होतं की, आम्ही सारेजण आपोआप मूक झालो होतो. भयाण शांतता वाटत होती. मोटार थांबवून त्या " मूर्स " वर आम्ही चहा घेतला. तिथलं शांत नि निर्जन वातावरण मनात साठवून ठेवलं आणि मग पुढं निघालो.

सबंध दिवस निसर्गाच्या सान्निध्यात काढल्यावर ग्लासगोसारख्या शहरात—बकाल शहरात—रहायची कल्पना कुणालाच बरी वाटली नाही. त्या विचारात लॉक लोमंडच्या काठी येऊन पोचलो. तळ्याच्या रम्य काठी रहाण्याची जागा मिळाली तर किती बरं वाटेल असा विचार मनात आला तोच एक हॉटेल समोर दिसलं. तिथं जागा आहे असं कळलं नि दिवसाचा प्रवास आम्ही संपविला. सूर्य मावळला असला तरी संधिप्रकाश होता. संधिप्रकाशात तळ्याच्या शांत पाण्यात लॉंचमधून आम्ही हिंडलो. बोटीच्या खलाशानं माझ्या विनंतीवरून

चाक माझ्या हातात दिलं व तो मोकळेपणानं आसपासच्या भागाची सारी माहिती सांगू लागला. एक तास कसा निघून गेला हे कळलं देखील नाही.

रात्रभर विश्रांती घेऊन ग्लासगोला जाऊन पोचलो. स्कॉटलंडमधलं सगळ्यांत मोठं बंदर हे. जहाजं बनवण्याचे कारखाने आहेत इथं. सर्वसाधारणपणे हे शहर गलिच्छ समजलं जातं; पण मला मात्र तसं वाटलं नाही. बाजारपेठेत बराच वेळ हिंडून काही सुव्हनियर्स घेतली व परत एडिंबरोला गेलो.

गेल्याबरोबर राजगोपालच्या बॅगची चौकशी केली. बॅग तिथं आली होती. सात-आठ महिने राहून इंग्लंडच्या लोकांच्या प्रामाणिकपणाची ओळख झाली होती. त्यामुळं बॅग परत मिळाल्याचा आनंद होताच. पण आश्चर्य नव्हतं !

एडिंबरोला आम्हांला हॉलिरूड पॅलेस पहायचा होता. Mary Queen of Scots च्या वेळी या राजवाड्यात बऱ्याच ऐतिहासिक घडामोडी झाल्या होत्या. आम्ही गेलो त्या वेळी काही कारणानं राजवाडा बंद होता. सभोवतालचा किल्ला मात्र पाहिला. किल्ल्यावर जाऊन बराच वेळ तिथून एडिंबरो शहर, प्रिन्सेस स्ट्रीट, बाग हे सारं पाहात होतो. मेरी क्वीन ज्या खोलीत बाळंत झाली ती खोली आम्हांला दाखविण्यात आली.

एडिंबरोला एक चिनी हॉटेल आहे. तिथं जाऊन जेवण घेतलं. त्या दिवशी कुठपर्यंत जायचं हे अद्याप ठरवलं नव्हतं. जितकं अंतर जाता येईल तितकं जायचं हा मुख्य उद्देश होता. संध्याकाळी ॲबट-फर्डला येऊन पोचलो. इथं वॉल्टर स्कॉट रहात होता तो वाडा आहे. आम्ही तिथं गेलो. पण अंधार झाल्यानं वाड्यात जाता आलं नाही. वाडा बाहेरून पाहिल्यावर देखील वॉल्टर स्कॉटच्या राजेशाही राहण्याची कल्पना येते. अंधार ज्यास्त व्हायला लागला तसे आम्ही मुक्काम करण्यासाठी हॉटेलांच्या पाट्या पाहायला लागलो. बराच वेळ गेला तरी हॉटेल नाही. एका टेकडीवर रस्त्याला लागून एक हॉटेल दिसलं. तिथं जागा नव्हती. शेवटी आम्ही नवखे लोक आहोत असं कळल्यावर त्या हॉटेलवाल्यानं दुसऱ्या एका हॉटेलवाल्याला फोन करून आमच्यासाठी खोल्या रिझर्व्ह करून दिल्या. त्या हॉटेलचा सविस्तर पत्ताही दिला. हे हॉटेल "मोफत" या गावी असून हॉटेलचं नावही "मोफत हाऊस हॉटेल" असं आहे. नाव जरी मोफत असलं तरी दर भरमसाट होते !

सकाळी पहिला टप्पा गाठला तो डंफ्रीज. हे स्कॉटलंडच्या प्रसिद्ध रॉबर्ट बर्न या कवीचे ठिकाण. इथं त्याचं घर नि छोटंसं म्यूझियम आहे ते पाहिलं. त्याचं थडगं देखील पाहिलं. इथं पेरीस्कोपसारखा एक कॅमेरा आहे. कुठलंही दृश्य समोर सिनेमासारखं दिसतं त्यातून. चारी बाजूंना त्याचं तोंड फिरवता देखील येतं.

डंफ्रीज सोडल्यावर आम्ही स्कॉटलंड सोडायच्या मार्गावर होतो. त्याआधी इंग्लंडच्या सीमेवर ग्रेटना ग्रीन नावाच्या खेड्यांत थांबलो. पूर्वीच्या काळी म्हणे इथं एक लोहार होता. त्या लोहाराला लोकांची लग्नं लावून देण्याची परवानगी होती. लोहार आपल्या कामात असला तरी त्यानं ऐरणीवर हातोड्याचे दोन घाव मारून तुमचं लग्न झालं असं म्हटलं की लग्न कायदेशीर ठरत असे ! कित्येक प्रेमी जोडपी आईबापांची लग्नाला संमती नसली की ग्रेटना ग्रीनला येऊन दोन मिनिटांत लग्न लावून घेत. तरुण-तरुणी पुढे पळत येतात व मागून वडील किंवा नातेवाईक त्यांना पकडण्यासाठी धावत येतात...पण ते पोचायच्या आधीच लोहार लग्न लावून देखील टाकायचा ! अशा प्रकारच्या गमतीच्या कितीतरी गोष्टी ग्रेटना ग्रीनचे लोक सांगतात. त्या लोहारानं लावलेला विवाह हा खराखुरा प्रीतिविवाह समजला जात असे. चाळीस वर्षांपूर्वी ही प्रथा सरकारनं बंद केली. आम्ही त्या लोहाराच्या दुकानात जाऊन तो कशी लग्नं लावायचा त्याचं प्रात्यक्षिक बघितलं. Red Hot लग्न कसं होत असे हे तिथं आम्हांला सविस्तर कळलं.

ग्रेटना ग्रीन सोडल्यावर आम्ही इंग्लडमध्ये प्रवेश केला. परत जाण्याचा रस्ता लेक डिस्ट्रिक्टमधून होता. मागच्या वर्षी आम्ही इकडं आलो होतो. पण राज-गोपालनं हा प्रांत पाहिला नव्हता. आम्हांलाही लेक डिस्ट्रिक्टचं निसर्गसौंदर्य दुसऱ्यांदा पाहायची उत्सुकता होतीच. वर्डस्वर्थ व कोलरीज हे प्रसिद्ध कवी जिथं रहात होते ते ग्रासमियर हे गाव इतक्या सुंदर ठिकाणी आहे की त्या गावापासून दूर जाऊ नये असं वाटतं. सृष्टीचं जिवंत सुंदर काव्य इथं आहे. कुणालाही इथं काव्य सुचेल. आम्हांला मात्र खूप वाट पाहूनही काही स्फूर्ती आली नाही ! मला वाटतं वर्ड्सवर्थच्या कविता इतक्या उच्च दर्जाच्या असण्याचं कारण लेक डिस्ट्रिक्टमधलं सौंदर्य ! एक रात्र तिथं राहण्याचा मोह होत होता. पण आम्हांला त्या दिवशी लिव्हरपूलला पोचायचं होतं म्हणून त्या कवींच्या प्रांताचा निरोप घेतला.

फार लांबलं नाही का हे पत्र ? पण स्कॉटलंड मला खूप आवडल्यानं इतकं लिहायला अजीबात थकवा आला नाही. आठ दिवसांची ही ट्रिप झाली. आठ दिवस कसे गेले हे कळलेही नाही. असली ट्रिप इथं किती मजेत झाली. पण हिंदुस्थानात किती त्रास झाला असता, हा विचार करताना असं वाटतं की, इंग्लंडमधे रस्ते डांबरी, धूळ नाही, हादरे बसत नाहीत म्हणून काही त्रास होत नाही. टेलिफोनचं जाळं पसरलं असल्यानं कुठंही जंगलात गेलो तरी जगापासून दूर असल्याप्रमाणं वाटत नाही; आणि सर्वांत मुख्य म्हणजे राहण्याची सुखसोयीयुक्त व्यवस्था. आपल्या देशात निसर्गरमणीय ठिकाणं काय कमी आहेत ? पण सोयी नसल्यामुळं निसर्गशोभेचा आनंद मनमुराद घेता येत नाही. असो.

आम्ही पाच किंवा सहा ऑगस्टला पुण्याला परत येऊ. माझ्यासाठी एस्. पी. कॉलेजमधे ॲडमिशन घेऊन ठेवावी. बाकी सर्व ठीक आहे. सर्वांना. स. न.

आपली
**ताई**

55 Belsize Lane
London
19–6–50

प्रिय रत्ना,

तुला बऱ्याच दिवसांत पत्र नाही लिहिलं म्हणून रागावला नाहीस ना ? पण माझी पत्रं सगळ्यांच्या साठीच आहेत. तू देखील ती वाचीत असशीलच की !

स्कॉटलंडहून परत आल्यानंतरच्या वीकएंडला आम्ही इथून पन्नास मैलांवर असलेल्या ब्राइटन् या गावी गेलो. ब्लॅकपूलसारखंच हे हॉलिडे केंद्र आहे. त्यामुळं त्याच्या विषयी ज्यास्त सांगण्यासारखं काही नाही.

या वीकएंडला मात्र आम्ही " शेक्स्पियर कंट्री " हा प्रदेश पहायला गेलो होतो. प्रथम आम्ही ऑक्सफोर्डला गेलो. तिथं एक तासभर फिरून पुढं स्ट्रॅट-

फोर्डला गेलो. ॲव्हॉन नदीच्या काठावर शेक्स्पिअरच्या स्मरणार्थ मोठं थिएटर बांधलं आहे तिथं फक्त त्याचीच नाटकं करतात. आठवा हेन्री हे नाटक आम्ही तिथं पाहिलं. ॲव्हॉन नदीच्या दुसऱ्या काठावर असलेला शेक्स्पिअरचा पुतळा व त्याच्या प्रसिद्ध चार कॅरेक्टरांचे पुतळे पाहिले. मग एक तास नदीत बोटिंग केलं. ही नदी, तिच्या काठावरील ती सुंदर झाडे, मधून चाललेली आमची बोट,... अगदी काव्यमय दृश्य होतं. आपल्याकडील काव्यात 'सृष्टिदेवीने जणू काही हिरवा शालू परिधान केला होता' असल्या कल्पना वाचतो पण इथं मात्र हे वर्णन अक्षरशः खरं आहे. हिरवळ नसलेली जागा इथं औषधालासुद्धा सापडणार नाही. गवत हिरवंच असलं तरी निरनिराळ्या शेडस्मधे उगवत असल्यामुळे खरोखरच डिझाईनचा गालिचा सगळीकडे पसरला आहे असं वाटतं. झाडांची पानंसुद्धा निरनिराळ्या रंगांची. हिरव्या रंगाखेरीज दुसऱ्या कुठल्या रंगाची पानं झाडाला येतात याची इतके दिवस कल्पना नव्हती. एका झाडाला आमसुली रंगाची पानं, एका झाडाला नुसताच मोहोर, तांबड्या, जांभळ्या, पांढऱ्या रंगांचा मोहोर. पाने नाहीतच.

स्ट्रॅटफोर्डपासून मग आम्ही वॉरविक् या गावी तिथला किल्ला पहायला गेलो. तो बंद होता म्हणून बाहेरूनच पाहिला. लंचनंतर परत आम्ही स्ट्रॅटफोर्डला आलो. शेक्स्पिअरचं घर, त्याचा जन्म झाला ती खोली, तो ज्याच्यावर बसून अभ्यास करीत असे ते बेंच, त्याच्या पुस्तकांच्या पहिल्या आवृत्त्या, त्याचं हस्ताक्षर, सर्व पाहिलं, नंतर होली ट्रिनिटी चर्चमध्ये शेक्स्पिअरचं 'बेरियल प्लेस पहायला गेलो.

नाटक आणि बेरियल प्लेस पहायला मिळण्यात आम्ही फारच सुदैवी ठरलो. नाटकाची तिकिटे संपली होती तरी एका माणसानं त्याची तिकिटं कॅन्सल करून आम्हांला दिली, व बेरियल प्लेस तिथल्या प्रीस्टनं खास आमच्यासाठी रविवार असला तरी उघडून दाखवलं. या नाटकांचं वैशिष्ट्य आहे. हल्लीच्या पद्धतीप्रमाणं नाही तर शेक्स्पिअरच्या वेळी जसं नाटक व्हायचं तसंच ते तिथं दाखवतात. राजवाडा असला तर दोन-तीन खुर्च्या आणून ठेवायच्या, बाग असली तर दोन-तीन कुंड्या आणून ठेवायच्या. सारा भर नटांच्या अभिनयावर. स्ट्रॅटफोर्डला जाणं म्हणजे आपल्याकडील पंढरपूरला जाण्यासारखं आहे.

एकंदरीत आमची ट्रिप चांगली झाली. या वीकएंडला आम्ही Isle of wight ला जाणार आहोत. आधी Lands End पर्यंत जायचा विचार होता पण त्याला चार-पाच दिवस तरी पाहिजेत म्हणून ती ट्रिप पुढे ढकलली.

कॉलेजेस सुरू झाली का ? माझी ॲडमिशन मिळाली का ? हे पाकीट फेकून देऊ नये. पाकीट मी स्कॉटलंडमधून आणलेलं आहे. त्याच्यावरील फुलाचं नाव स्कॉटिश थिसल असं आहे. छान आहे नाही ?

तुझी
**ताई**

55 Belsize Lane
London.
२६-६-५०

ती. अण्णासाहेब यांना

शुक्रवारी संध्याकाळी इथून निघालो ते पोर्टस्मथ या गावी रात्री जाऊन पोचलो. पार्टस्मथला लागूनच साऊथ सी हे हॉलिडे केंद्र आहे. दोन्ही इतके एकमेकांला लागून आहेत की साउथ सीमध्ये केव्हा आलो हेच समजत नाही. मग आम्ही पोर्टस्मथ डॉकमध्ये ठेवलेले H. M. S. Victory हे जहाज पहायला गेलो. नेल्सननं जिंकलेली ट्रॅफलगारची लढाई आपल्याला आठवत असेलच. या लढाईत ज्या बोटीवर लढत असता नेल्सन मेला तीच ही बोट. पूर्वीच्या काळी बोटीवरचं जीवन किती कठीण होतं याची कल्पना ही बोट पाहून येते. अगदी वरच्या डेकखेरीज बाकीच्या सर्व डेक्स्वर सारखं वाकून चालावं लागतं. अशा ह्या ऐतिहासिक गोष्टी पाहतांना खरोखरच विशेष वाटतं आणि इंग्लिश लोक हे सारं फार जपून ठेवत असतात. हे सारं पाहून झाल्यावर आम्ही हॉटेलमध्ये लंच घेतला आणि नंतर बाळासाहेबांचा आवडता लेखक चार्लस् डिकन्स याचं घर पहायला गेलो. ज्या खोलीत त्याचा जन्म झाला ती खोली, ज्या सोफावर तो मेला तो सोफा, त्याचं हस्ताक्षर वगैरे सर्व पाहिलं. नंतर आम्ही साऊदॅम्टनला गेलो. तिथं जाईपर्यंत संध्याकाळ झाली. आता रात्री Isle of wight ला जाण्यात काही अर्थ नाही असं ठरवून रविवारच्या बोटीचा रिटर्नपॅसेज बुक केला. तिथून आठ-दहा मैलांवर असलेल्या न्यू फॉरेस्ट या

जंगलात गेलो. जंगलात पायी पायी खूप फिरलो. आपल्याकडील जंगलासारखं इथल्या जंगलात वाघ, सिंह, साप यांची मुळीच भीती नसते. हे सगळे प्राणी इथं फक्त झूमध्ये पहायला मिळतात. रविवारी सकाळी बोटीतून Isle of wight ला आलो. आमची बोट English Channel मध्ये चार्मथ् इथं लागली. तिथं उतरून मोटारीनं आलम्-वे ला गेलो. तिथं समुद्रकिनाऱ्यावर मोठ-मोठे खडक आहेत; आणि त्यांच्यावर निरनिराळ्या रंगांची वाळू आहे. कल्पनाच करवत नाही. एकाच ठिकाणी इतक्या रंगांची वाळू! आपल्याकडं कलर्ड कॅमेरा असता तर बरं झालं असतं. तिथंच समुद्रामध्ये पांढरे स्वच्छ खडकांचे सुळके उभे आहेत ते पाहिले. तसंच, मार्कोनीनं पहिला टेलिग्रॅफिक मेसेज ज्या ठिकाणाहून पाठविला तेही इथं पहायाला मिळालं. अशा तऱ्हेनं सर्व आयलॅंडला चक्कर मारून सहा वाजता परत चार्मथ्ला आलो. इतक्या जवळ आलोच आहोत तर मग दादा महाजन रहात असलेलं हॅंबल पाहून यावं असं ठरवून तिथं गेलो. तिथं गेल्यावर मात्र दादा महाजन तिथं का कंटाळला ते समजलं! अगदीच वेकार आहे ते! तिथं इतके इंडियन्स आहेत की रस्त्यावर इंग्लिश लोकांच्यापेक्षा इंडियन्सच जास्त दिसले. दादा ज्या ब्लॉकमध्ये रहात असे तो ई ब्लॉकहि पाहिला. अगदीच कसंतरी वाटलं सगळं. आता येत्या वीकएंडला डेव्हन, कॉर्नवाल वगैरे पाहिलं की सर्व ग्रेटब्रिटन पाहून होईल आमचं. हिंदुस्थानातून पैसे मागवले आहेत ते आल्याशिवाय पुढील वेत ठरवता येत नाही. असो. सर्वांची आठवण करणारी,

आपली
**ताई**

55 Belsize lane
London
6–7–50

ती. अण्णांना यांना सा. न.

काल रात्री अकरा वाजता आम्ही लॅंड्स एंडची ट्रिप संपवून आलो. जाताना बरोबर दहीभात, पुरीभाजी घेतली होती. रात्रीच्या मुक्कामाला सॅलिसबरी या

अनुक्रम ...३८६५२..... दि: ...५-७-७२...
क्रमांक ...३९८............ हे देश ही माणसे : ६५२८५

गावी कॅथेड्रल नावाच्या हॉटेलमधे मुक्काम केला. तिथलं चर्च पाहिलं. इंग्लंड-मधील सर्वांत उंच असं हे चर्च आहे. नंतर मग डेव्हनशायरची सीनरी पहात निघालो.

डार्टमूर फॉरेस्टमधे पिक्सीज ग्लेन पाहिली. पिक्सीज म्हणजे फेअरीझ. इथं पऱ्या राहतात अशा कथा आहेत. तिथून प्रिन्सटाऊन येथला प्रसिद्ध तुरुंग देखील पाहिला. परत "पिक्सीज" ला येऊन Two Bridges नावाच्या हॉटेलमधे राहिलो. सकाळी उठल्यावर प्लीमथला गेलो. आत्तापर्यंत पाहिलेल्या सर्व समुद्रकिनाऱ्यांमधे मला प्लिमथचा किनारा फार आवडला. समुद्रावरचा ओपनएअर स्वीमिंग टँक फार मनोवेधक आहे. स्पॅनिश आरमार जिंकणाऱ्या फ्रॅन्सिस ड्रेकचा तिथं भला मोठा पुतळा आहे. तसंच प्रथम अमेरिकेला गेलेले पिलग्रिम फादर्स, प्लिमथहूनच मेफ्लॉवर या बोटीनं गेले होते. हे सर्व पाहून नदी ओलांडून कॉर्नवॉलची सीनरी पहात पहात आम्ही लँड्एसंडला पोचलो. इथं बघण्यासारखं असं काही नाही. फक्त समाधान मानायचं की आम्ही इंग्लंडच्या टोकापर्यंत जाऊन आलो ! मात्र इथल्यासारखा विस्तीर्ण सागर कुठं पाहायला मिळणार नाही. समुद्र-किनाऱ्यावर दोन तास थांबून चहा वगैरे घेऊन परत फिरलो.

रविवारी सकाळी पुन्हा निघालो ते "स्मगलर्स केव्ह" (डाकूंची गुहा) आणि निरनिराळ्या राजेलोकांच्या बेरियल प्लेसेस पाहून वेल्स या गावी आलो.

नंतर आम्ही "चडार" ला Coxes caves पाहायला गेलो. या गुहेतील स्टॅलक्टाईटस् अगदी आश्चर्यकारक आहेत. हे सारं मला इथं पत्रात वर्णन करता येत नाही. समक्ष आल्यावर सांगेन.

इतकं सगळं पाहिल्यावर पुन्हा आम्ही डोव्हर, हेस्टिंग्स पहायला देखील जाणार आहोत. आता आमचं जवळ जवळ सर्व इंग्लंड, आयर्लंड, स्कॉटलंड पाहून झालं आहे. आमच्याशिवाय इतर कोणा भारतीयानं इतका विस्तारपूर्वक प्रवास या देशात केला असेल असं वाटत नाही. इंग्लंडचा कोपरान् कोपरा आम्ही पाहिला. हे पाहिलं, ते पाहिलं अशी उडती वर्णनं मी केली आहेत म्हणून तुम्हांला काहीतरी वाटेल ! पण आता पत्रं लिहायला नीटसा मूड लागत नाही. दर वीकएंडला होणाऱ्या ट्रिप्सचे बेत ठरवण्यात सारा वेळ जातो. परत आल्यावर साऱ्या गोष्टी मी पुन्हा सविस्तर सांगणारच आहे....

...वेळेच्या अभावी नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क इकडं जाता येत नाही. आणि विमानानं परत यायचं असल्यामुळं फार सामानही आणता येत नाही. आहे तेच सामान दोनचार दिवसांत पॅक करून पाठवून देणार आहे...

आपली,
**ताई**

55 Belsize Lane
London
१०-७-५०

ती. अण्णासाहेब यांना सा. न.

...यायचे दिवस जो जो जवळ येत चालले आहेत तो तो आपण सर्वजण भेटणार म्हणून आनंद होत आहे. पण "हा देश आपल्याला पुन्हा कधी पाहायला मिळणार की नाही कुणास ठाऊक..." या कल्पनेनं वाईट वाटतंय. चार-पाच वर्षांनंतर परत एकदा सुट्टीवर इंग्लंडला ये असं इथल्या माझ्या मैत्रिणी माझ्याकडून कबूल करून घेत आहेत. सध्या तरी इंग्लंडपेक्षा तुम्हां सर्वांना भेटायची उत्सुकता वाढली आहे...

आमच्या गाडीचं रनिंग ४००० मैल झालं आहे. पैकी जवळ जवळ १००० मैल मी ड्रायव्हिंग केलं. ज्यास्तीत ज्यास्त ४० मैलांच्या वेगानं मी गाडी नेत असे. Lands end च्या ट्रिपमध्ये आमचे मित्र देशमुख यांनीच गाडी चालविली. कारण रस्ता अत्यंत अरुंद, चढ, आणि वळणावळणाचा होता. आपल्याकडं- ज्यास्तीत ज्यास्त 1 In 7 चा चढ असतो पण Lands end चा रस्ता पुष्कळ ठिकाणी 1 in 6 चढाचा आहे. शिवाय असा रस्ता असला की गाडी चाल- विताना रस्त्याशिवाय दुसरं काही बघता येत नव्हतं, म्हणून मी देशमुखांच्या हाती गाडी देऊन टाकीत असे!

गेल्या वीकएंडला कँटरबरी, डोव्हर कॅसल, White cliffs वगैरे पाहिलं. आज आता संध्याकाळी आम्ही साऊथएंडला जाणार आहोत.

सर्वांच्या प्रकृतीस जपत जावे.

आपली
**ताई**

On Board
Cross channel Boat
Folkstone
21-7-50

ती. अण्णांस सा. न.

अगदी इंग्लंड सोडताना बोटीवरून हे पत्र लिहिते आहे. बाहेर हवा घाणेरडी पडली आहे. खूप पाऊस पडत आहे. सगळीकडं उदास वाटत आहे. आता आपण इंग्लंडला कायमचं सोडतोय या विचारानं मन जड झालं आहे. हिंदुस्थान सोडताना वाटत होतं "हा देश, ही माणसं आपल्याला वर्षभर दिसणार नाहीत..." पण आता इंग्लंड सोडताना वाटतंय "हा देश...ही माणसं पुन्हा कधीच दिसणार नाहीत..."

आज सकाळी आठ वाजता गाडीनं इथं फोकस्टनला आलो. आता दहा वाजले आहेत. इंग्लिश खाडी ओलांडून फ्रान्समधील 'बलोन' या बंदराला १२॥ वाजता आम्ही पोहोचू. तिथून पॅरिस.

लंडन सोडायच्या आधी आम्ही टॉवर ऑफ लंडनला जाऊन राजाच्या मुकुटातील कोहिनूर पाहिला. सगळी राजाची ज्युवेलरी देखील तिथं ठेवली आहे. तसंच ग्रीनिचला जाऊन "झीरो मेरिडियन" पाहिली. शून्याच्या लाइनवर अगदी आम्ही उभे राहून आलो ! त्या वेळी काय वाटलं त्याची कल्पना करवत नाही...

मुंबईला सामान कोणाकोणाबरोबर पाठविलं आहे ते सविस्तर मी लिहिलंच आहे. ते न विसरता जाऊन घेऊन यावे.

यापुढील पत्रव्यवहार फक्त एकतर्फी ! म्हणजे माझ्याकडून ... कारण आमचा पत्ता स्थिर नाही ...

आपली
**ताई**

ब्लॅकपूलमधे रेकॉर्डिंग करून पाठविलेला आवाज—

**आठवतो मज एकसारखा काळ सुखाचा तो**
**घालविला अति आनंदाने तुमच्यासह मी जो**
**अण्णा, बाई, सुभाष आणि शरद माधव ही**
**अप्पा शशीला रोज पाहते कल्पदृष्टीने मी ...**

वर्ष संपुनी कधी एकदा येइन मम देशाला
डोळे भरुनी पाहिन कधि मी तुम्हां सर्वांना ...
माहित आहे तुम्हां सर्वां गात कधी मी नाही
गान नसे हे काव्य नसे हे असे पत्र साधे
लिहिण्यापेक्षा धाडित आहे आवाजामध्ये
नमस्कार... आम्ही दोघे करितो अण्णा बाईला
प्रेमळ आशीर्वादा द्यावे तुम्ही आम्हांला ...

... शांता धांदरफळे

स्वीत्झर्लंड

२७-७-५०

ती. अण्णांस सा. न.,

बोटीवरून लिहिलेलं पत्र मिळालंच असेल. बारा वाजता क्लोनला पोचलो व तिथून पुढं पॅरिसला गेलो. इंग्लिश खाडी शांत होती म्हणून बोटीचा त्रास झाला नाही.

जगातील सर्वांत मोठं शहर सोडून जगातील सर्वांत सुंदर शहरात आता आम्ही प्रवेश केला. तीन दिवसांत सारं पॅरिस शहर हिंडून पाहिलं. एफेल टॉवर, नेपोलियनचं थडगं, आर्च डी ट्रायंफ, आर्ट गॅलरी, व्हर्साइल्स ... चौदावा लुई रहात असलेला जगातला सर्वांत सुरेख राजवाडा पाहिला. याच राजवाड्यात पहिल्या महायुद्धाचा तह झाला होता. ज्या टेबलावर तहाच्या सह्या झाल्या ते टेबल आम्ही पाहिलं.

एफेल टॉवर आठशे तीस फूट उंच आहे. या टॉवरवर जायला लिफ्ट आहे. इथून सर्व शहराचा देखावा दिसतो. नेपोलियनचं थडगं अशा ठिकाणी ठेवलं आहे की प्रत्येकाला खाली वाकून ते बघावं लागतं. हिटलर जेव्हा पॅरिसला आला होता तेव्हा त्यालाही खाली वाकून हे थडगं पाहावं लागलं होतं! ही गोष्ट फ्रेंच लोक मोठ्या अभिमानानं सांगतात. इथं अशा प्रकारे काचा लावल्या आहेत की येणारा सूर्यप्रकाश आपोआप निळसर होतो व तो मंद प्रकाश नेपोलियनच्या प्रतिमेवर पडतो ...

पॅरिसमधील इमारती फारच कलात्मक आहेत. कोरीव काम केलेल्या आहेत. जागजागी सुरेख पुतळे आहेत. पॅरिसचे लोक फारच सुखासीन आहेत. सकाळी दहा दहा वाजेपर्यंत उठत नाहीत. ब्रेड, एक रोल आणि कॉफी हा इथल्या लोकांचा ब्रेकफास्ट आहे. इंग्लिश ब्रेड मला कधीच आवडला नव्हता. पण फ्रान्स-मधला जाड पडवळासारखा लांबडा ब्रेड मला फार आवडला. इथं ओपन एअर हॉटेल्स आहेत. म्हणजे फूटपाथवर टेबल-खुर्च्या टाकून लोक खुशाल गप्पा मारीत बसलेले असतात. प्रत्येक टेबलावर एक-एक चांदीची लहान बादली नि त्यात बर्फ, व बर्फावर मद्याची बाटली ! अंधार पडल्यावर पॅरिसचं खरं स्वरूप दिसू लागतं. आम्ही तिथला एखादा नाइट क्लब पाहायला जाणार होतो पण फार खर्च येईल म्हणून तो बेत रद्द केला. तरीही आम्ही कॅसिनो डी पॅरिस आणि फॉलिये बर्जर हे दोन्ही व्हरायटी शो पाहिले. त्यांतल्या त्यात फॉलिये बर्जर स्टेजवर एका विमानातून दहा-बारा मुली उतरतात. तसंच बर्फ पडताना इतकं छान दाखवतात की प्रत्यक्ष पडल्यासारखं वाटतं.

इंग्लंडमधे रात्री अकराच्या पुढं शांतता पाहायची सवय झाल्यामुळं पॅरिस-मधली ही रात्रीची गडबड जरा विचित्रच दिसते. मोटारवाले जोरजोरात हॉर्न वाजवितात. पण लंडनमधे अगदी भर गर्दीच्या चौकात देखील किती शांतता असते ! रस्ता क्रॉस करणाऱ्याला तिथं मोटार थांबवून क्रॉस करू देतात. पण इथं पॅरिसमधे जोरजोरात हॉर्न वाजवून चालणाऱ्या माणसांना मोटारवाले भिवबून सोडतात. शिवाय इथं उजव्या बाजूनं सगळा ट्रॅफिक असल्यामुळं आमची फार पंचाईत होते रस्त्यानं चालताना. त्यात आणखी भर म्हणून इथल्या लोकांचं माझ्या साडीकडं, केसांकडं, कुंकवाकडं वळून वळून पाहणं ! कितीतरी लोकांनी माझे नकळत फोटो देखील काढून घेतले ! ज्यांना मोडकं तोडकं इंग्रजी बोलता येत होतं त्यांनी परवानगी घेतली पण इतरांनी खुशाल न विचारता फोटो काढले सुद्धा ! त्यामुळं रस्त्यानं चालताना मला फार लाजल्या-सारखं व्हायचं. शेवटी मी केसांचं चक्कर घालून कपाळाला कुंकू न लावता बाहेर जायला लागले तेव्हा लोकांचं बघणं जरा कमी झालं.

पॅरिस जरी सुंदर असलं तरी मला मात्र लंडनच अधिक आवडलं.

पॅरिस सोडून स्वित्झर्लंडमधील जिनीव्हा या शहरी आलो. पूर्वीच्या लीग ऑफ नेशन्सच्या इमारतीला " सर्व देशांचा राजवाडा " म्हणतात. ही इमारत

फारच सुरेख आहे. सगळ्या यूरोपमधे या इमारतीचा दुसरा नंबर लागतो. प्रत्येक देशानं हा राजवाडा बांधायला हातभार लावला आहे. कुणी मार्बल दिला, कुणी गालिचे दिले, कुणी पेंटिंग्ज दिले तर कुणी फर्नीचर दिलं.

जिनीव्हा सोडून आम्ही मॉन्त्रोला आलो. इंग्लंड सोडून पॅरिसला आल्यापासून फार उकाडा होऊ लागला आहे. इथं तर पॅरिसपेक्षा जास्त उकडतंय. खूप दिवसांनंतर आईस वॉटर प्यालो. हिंदुस्थानला परत येण्यापूर्वी उन्हाची सवय करण्याच्या दृष्टीनं हे ऊन आम्हांला फायदेशीरच आहे म्हणा. पण मला असं वाटतंय की आम्ही पुण्याला परत येऊ तेव्हा इंग्लंडहून परत येण्याऐवजी आफ्रिकेहून परत आल्यासारखे आम्ही दिसू की काय !

इथं डोंगराच्या पायथ्यापासून शिखरापर्यंत घरे असल्यामुळे रात्री दिवे लागले की डोंगरावर रोषणाई केल्याप्रमाणं वाटतं. आम्ही गेलो तेव्हा बोटीतून एकंदर सीन फारच उत्कृष्ट दिसत होता.

उद्या मॉन्त्रो सोडून इंटर लॉकनला जाणार आहोत. मग ल्यूझर्न, नंतर झूरीच असं सारं पाहून इथला मुक्काम संपवून आम्ही इटलीत प्रवेश करणार आहोत.

इंटर लॉकन...
२८–७–५०

...काल रात्री फार झोप यायला लागली मग पत्र अर्धवट ठेवूनच झोपले. आज आता इंटर लॉकनहून लिहीत आहे. सकाळी दहा वाजता मॉन्त्रो सोडलं. ११॥ वाजता इथं येऊन पोचलो. प्रवास फारच सुरेख झाला. मॉन्त्रो सोडल्यापासून ते थेट इंटर लॉकनपर्यंत गाडी आल्प्स पर्वतावरून येते. त्यामुळे सीनरी अतिशयच सुरेख दिसते. हरी नारायण आपटे यांनी मुंबई ते पुणे प्रवासवर्णन कसं छान लिहिलं आहे. पण तेच जर इथं आले असते तर त्यांना किती लिहू नि किती नको असं झालं असतं. माझ्यात ती कला नाही म्हणून फारच वाईट वाटतंय. मी इथं ऊन फार असल्याचं लिहिलं आहे. पण तरीही अजून कित्येक

डोंगरांच्या शिखरांवर भरपूर बर्फ दिसत आहे. चारी बाजूंना डोंगर असून मधे तळ्याच्या खाली हे इंटर लॅकन गाव वसलेलं आहे. आमच्या खोलीतून बाहेर दिसणारा सीन अतिशय रम्य आहे. उद्या आम्ही आल्प्स पर्वताच्या ११३३३ फूट उंच असलेल्या चूंग फ्रा नावाच्या शिखरावर जाणार आहोत. हे नेहमी बर्फाच्छादित असते. तिथं एक वर्फाचा हॉल बांधला आहे असं म्हणतात. उद्या तो पाहिल्यावर समजेल काय आहे ते. चूंग फ्रा हे शिखर इथून २०-२५ मैल असेल. तिथं जायला किती पैसे लागतील, कल्पना आहे ? तुम्हांला खरं वाटणार नाही. पण इथून ६० रुपये पडतात. आम्हांला अर्थात हॉलिडे तिकीट म्हणजे अर्ध्या किमतीत, ३० रुपयांला मिळेल. तरी काय झालं ?...

२९ ७-७०

...काल चूंग फ्रा ला जायचं लिहिलं होतं; पण सकाळी उठून पाहतो तर पाऊस पडत होता. मग तो विचार रहित केला नि कॅडरस्टेकला गेलो. तिथं डोंगराच्या पायथ्यापासून ते शिखरापर्यंत चेअर लिफ्ट मिळतात. जमिनीपासून ५०-६० फुटांवरून अधांतरी जाण्यासाठी आपल्याला पंख असावेत असं मला नेहमी वाटत असे. ती माझी इच्छा या चेअर लिफ्टनं पूर्ण केली. आपल्याकडं इलेक्ट्रिकचे खांब असतात ना ? तसेच ६०-७० फूट उंचीचे खांब डोंगराच्या पायथ्यापासून ते शिखरापर्यंत मारले आहेत नि त्यांना तारा बांधून त्या तारांवरून खुर्ची अडकवलेली असते. त्या खुर्चीवर आपण बसायचं की इलेक्ट्रिकच्या साहाय्यानं ती खुर्ची आपोआप डोंगराच्या शिखरावर नेते आपल्याला. खुर्चीतून वर जाताना फार मजा वाटते. विमानातून आपण जमिनीपासून फार उंच जातो आणि विमान सगळीकडून बंद असते. त्यामुळं आपण अधांतरी चाल्लो आहोत असं वाटत नाही. पण या खूर्चीवरून आपण जमिनीपासून फक्त ६०-७० फूट उंच असतो. खुर्चीला काचा वगैरे काही नसतात. त्यामुळे संपूर्णपणे आपण अधांतरी असतो. सदेह वर जाणाऱ्या त्रिशंकूप्रमाणे !

वर गेल्यावर मग आम्ही चालत चालत पुढं गेलो. तिथून डोंगराच्या शिखरावर खूपच बर्फ पडलेलं दिसलं. डोंगराच्या मधे "उशीनन" नावाचं तळं

आहे. चारी बाजूला उंचच उंच डोंगर, मधे हे तळं आणि डोंगरावरून वितळ-णाऱ्या बर्फाचं पाणी लहान लहान धबधब्यांनी या तळ्यात पडतं. एकंदर सर्व सीन फारच रमणीय आहे. त्या तळ्याच्या काठी आम्ही बरोबर नेलेला लंच घेतला आणि मग परत त्या खुर्चीतून खाली आलो. नंतर आम्ही ब्ल्यू सीला गेलो. तिथल्या तळ्याचं पाणी खरोखरच निळं आहे. पण ज्यांनी मोठ्या समुद्रातून प्रवास केला नसेल त्यांना या निळ्या पाण्याचं कौतुक वाटेल. आम्ही समुद्रातून खूप प्रवास केल्यामुळं समुद्राचं पाणी किती गडद निळं दिसतं ते आम्ही अनेकदा पाहिलं आहे. त्यामुळं या तळ्याच्या निळ्या पाण्याचं आम्हांला फारसं नवल वाटलं नाही. संध्याकाळीं घरी आल्यावर मात्र आम्ही फार थकून गेलो होतो. जेवण करून लागलीच झोपलो.

आज सकाळी आता आम्ही यूंग फ्राला निघालो आहोत. त्या गाडीतूनच मी हे पत्र लिहीत आहे. आत्ता आमची गाडी डोंगर चढते आहे. दोन्ही बाजूंना उंचच उंच सूचिपर्णी वृक्षांची रांग, पलीकडे दूरवर उंचच उंच डोंगराची शिखरे, शेजारून पांढऱ्या स्वच्छ पाण्याची नदी खळखळ वाहते आहे. एकं-दरीत फारच रोमँटिक सीन आहे. हो ! इथल्या नद्यांचं हे एक वैशिष्ट्य आहे. आपल्याकडं नदीला " दुधाचा पाट वाहतो आहे " अशी उपमा देतात; पण इथल्या नद्या खरोखरच दुधाच्या असल्यासारख्या पांढऱ्या शुभ्र पाण्याच्या आहेत. यात अतिशयोक्ती नाही. आताच पहा ना-आमच्या गाडीच्या दोन्ही बाजूंना दोन पांढऱ्या स्वच्छ नद्या आहेत. त्यांच्या पाठीमागे दाट कॉनिफेरस जंगल आणि त्याच्यामागे उंच डोंगर. उजव्या हाताच्या डोंगरावरून एक बराच मोठा धबधबा पडतो आहे. किती पांढरा शुभ्र... !

... आता आम्ही गाडी बदलली. ही गाडी अगदी खेळातल्या गाडीप्रमाणे लहान आहे. हीच गाडी थेट यूंगफ्राच्या शिखरावर जाणार आहे. फारच चढावरून जाणार आहे ती. म्हणून इतकी लहान आहे. दोन्ही बाजूंच्या चाकांच्या मध्ये आणखी एक तिसरं दात्यांचं चाक आहे. गाडी अगदी हळूहळू जात असल्यामुळं सगळीकडची सीनरी भरपूर पाहता येत आहे...

... आता आम्ही किती तरी उंच आलो आहोत. खाली पाहिलं तर दरी इतकी खोल दिसते आहे की, बघवत नाही. आता ते बर्फाचं

शिखर किती जवळ दिसायला लागलं. थोड्याच वेळात आम्ही तिथं जाऊन पोहोचू. आता मात्र लिहिणं बंद करते. इतकी सुरेख सीनरी दिसते आहे की, तिच्यावरून डोळे काढून घ्यावेसे वाटत नाहीत...!

(...परत जाताना गाडीत...)

...शेवटी एकदाचे जाऊन पोचलो चूंग फ्राला. सर्व काही पाहून आता परतही निघालो. शेवटी शेवटी जवळ जवळ ५० मिनिटे गाडी बोगद्यातून जाते. मधेच एकदा बोगद्यातून बाहेर काय दिसतं ते पाहायला देतात. पण आपण इतके उंच आलेलो असतो की, काचेला लागून सगळीकडे ढगच ढग दिसतात. चूंग-फ्राच्या शिखरावर गेल्यावर तर काय, बर्फच बर्फ! आम्ही बर्फावरून खूप चाललो. तिथं लंचही घेतला. तिथं बर्फाचा बांधलेला "पॅले डी आईस" खरोखरच सुंदर आहे. तो पाहिल्यावर मात्र एस्किमो लोक बर्फाची घरं कशी बांधत असतील त्याची कल्पना येते. या "पॅले डी आईस"च्या भिंती, पायऱ्या, खांब, सीलिंग, खिडक्या, दारे सर्व काही बर्फाचं आहे.

बर्फाची एक मोटार करून ठेवली आहे. बसायला बाक, सोफा, टेबल, फ्लॉवर-पॉट, पिआनो वगैरे सारं काही बर्फाचं! बर्फाची फायर प्लेस. बर्फाचं घड्याळ. बर्फाची एक मोठी बॉलरूम!

आठ डिग्री टेंपरेचर होतं. सगळीकडं पांढरं शुभ्र बर्फ आणि त्याच्यावर ऊन पडलेलं! त्यामुळं डोळे अगदी दिपून जात होते. मी तर गॉगल लावला! ११,३३३ फूट उंचीवर गेल्यामुळं साहजिकच खालचं जग सुरेख दिसत होतं! एकंदरीत काय हा देखावा! काय हा देश! सुरेख...! अच्छा आता पुरे करते. बहुतेक आपली आता मुंबईलाच भेट होईल. ती सौ. बाईस सा. न. चि. माधव, शरद, रत्ना, शशी यांना स. न. तुम्हां सर्वांना कधी भेटेन असं झालं आहे.

तुमची
**ताई**

स्थळ : तेच!

प्रिय अप्पा,

ती. अण्णांच्या पत्रावरून माझ्या ट्रिपचा एकंदर वृत्तान्त कळेलच. पण मुद्दाम तुला वेगळं पत्र लिहायचं कारण म्हणजे तुझ्याकडं एकदोन कामं आहेत. तू

म्हणशील कामाच्या वेळेला माझी आठवण होते ! तसं नाही रे. पण...सोपी आहेत कामं. माझं हे पत्र मिळाल्याबरोबर रवूला मी आठ तारखेला विमानानं येत असल्याचं कळव. आणि दुसरं म्हणजे तारा व लिली यांना मला आठ तारखेला विमानतळावर किंवा संध्याकाळच्या डेक्कन क्वीनवर फर्स्टक्लास वेटिंग रूममधे भेटायला सांग. तिसरं म्हणजे तिथं असलेले आमचे कपडे धोब्याला देऊन आणावेत. चौथं म्हणजे मागील पत्रात लिहिल्याप्रमाणं माझं सामान मुंबईहून आणणे. Please ! एवढं करशील ना ? करशीलच. भोपळे ( जादूगार रघूवीर ) लंडनला भेटला होता...

तुझी
**ताई**

व्हेनिस
३–८–५०

ती. सौ. बाईस सा. न.

इंटरलॉकनहून ती. अण्णांना लिहिलेलं पत्र मिळालंच असेल. चूंग फ्राहून परत आल्यावर मग दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही " कुरसाले " नावाचा पार्क पहायला गेलो. तिथं फुलांचं केलेलं–चालणारं–घड्याळ फारच छान आहे. त्यानंतर मग इंटरलॉकन सोडून लुझार्नला गेलो. तिथं एक रात्र राहून दुसऱ्या दिवशी सकाळी लुझार्न गाव पाहून दुपारी लुझार्न सोडलं. रात्री नऊ वाजता इटलीमधील मिलान या गावी येऊन पोचलो. स्वीत्झर्लंडमधे झूरीच या गावी जाण्याविषयी मी मागं लिहिलं होतं. पण झूरीचला पाहण्यासारखं काही नाही. विशेषतः चूंग फ्रा पाहिल्यावर — असं कळल्यानं तो बेत रद्द केला. झूरीचला फक्त शॉपिंग चांगलं करता येतं म्हणतात. पण भरपूर पैसे जवळ नसल्यामुळं तोही विचार आम्हांला रहित करावा लागला. झूरीच ड्रॉप करून आम्ही एकदमच मिलानला आलो. शरदला म्हणावं, इथं आम्ही " अलबर्गो विंग " नावाच्या हॉटेलमधे राहिलो होतो. सकाळी उठून मग तिथला ड्यूकल पॅलेस, जगप्रसिद्ध चित्रकार लिओनार्ड डी व्हिन्सी याचे प्रसिद्ध चित्र " लास्ट सपर " पाहिलं. येशू ख्रिस्त मरण्यापूर्वी त्यानं जे शेवटचं जेवण घेतलं त्याचं हे चित्र आहे. पेंटिंग छान आहे. पण मला या चित्रापेक्षा त्याचंच चेरीट्रीचं पेंटिंग फार आवडलं. अर्थात कलेच्या दृष्टीनं " लास्ट सपर " मधे अधिक काही असेल

पण मला कलेमधील काही कळत नसल्यामुळं हे चेरीट्रीचं चित्र अधिक आवडलं असेल !

मिलानमधील नेपोलियनची "आर्च डी ट्रायंफ" पाहिली. बाकी, मिलानमधे विशेष बघण्यासारखं असं काही नाही. म्हणून दुपारच्या गाडीनं निघून आम्ही व्हेनिसला आलो. फ्रान्स, स्वीत्झर्लंडमधे एखादा तरी माणूस इंग्रजी येणारा भेटत असे. पण इथं इटलीत क्वचितच कुणाला इंग्रजी समजतं ! अदमासानं थोडंफार फ्रेंच समजू शकतं. पण आपल्याला इटालियन भाषेचं एक अक्षरही समजणं कठीण जातं ! व्हेनिसला येताना आम्हांला बलोनियाला गाडी बदलायची होती. आणि त्यासाठी एक तास स्टेशनवर थांबायचं होतं. पहिल्या गाडीतून उतरल्यावर हमाल केला. पण त्याला सेकंड क्लास वेटिंगरूमकडे सामान घेऊन चल असं सांगता काही येईना आम्हांला ! त्यामुळं मोठा प्रश्न पडला. आता काय करायचं हा विचार करीत आम्ही स्वस्थ उभे राहिलो. एवढ्यात बाळासाहेब हमालाला म्हणाले "साला सेकंदो क्लास ..." मला शॉक बसला ! बाळासाहेबांच्या तोंडून शिवी ! आश्चर्यच होतं. पण त्यानंतर आश्चर्याचा दुसरा धक्का बसला तो म्हणजे लागलीच त्या हमालानं सामान उचलून आम्हांला सरळ सेकंड क्लास वेटिंग रूमकडं नेलं ! माझा आश्चर्यचकित चेहरा बघून बाळासाहेब मला म्हणाले की, आपण व्हर्सेलचा राजवाडा बघायला गेलो होतो तेव्हा बरोबरचा गाईड इटालियन भाषेत "ही राजाची खोली ही राणीची खोली..." असं सांगताना खोली म्हणजे "साला" हे बाळासाहेबांनी ऐकलं होतं. ते आठवून तेवढ्या ज्ञानाच्या जोरावर आमच्या स्वाऱ्या सेकंड क्लासच्या वेटिंग रूममधे त्या "साला" शब्दानं नेऊन सोडल्या !

स्वीत्झर्लंडमधील चीआसो गाव सोडून इटलीच्या हद्दीत पाय ठेवल्यापासून आपण हिंदुस्थानात आहोत असंच वाटतं. इटली हाही हिंदुस्थानासारखा गरीब देश. जुनी, पडकी कौलारू घरं दिसायला लागली. लोकही आपल्याकडल्यासारखेच नुस्तं शर्ट-पँट घालून हिंडणारे ! चार लोक एका ठिकाणी जमले की, मोठमोठ्यानं गप्पा मारायला झाली सुरुवात ! इंग्लिश माणूस असं कधी करील काय ? स्वीत्झर्लंडसारखा सुंदर देश पाहून आल्यावर इटली अगदीच फ्लॅट कंट्री वाटते. मात्र व्हेनिस हे एक शहर फार सुरेख आहे. लहानपणी भूगोलात व्हेनिसचं वर्णन वाचल्यापासून मला व्हेनिस पाहण्याची किती इच्छा होती. पण ती कधी

पूर्ण होईल असं वाटलं नव्हतं. आत्ता देखील आमच्या पहिल्या योजनेमध्ये व्हेनिसचं नाव नव्हतं. पण केवळ माझ्या हट्टामुळं आम्ही व्हेनिसला येऊन पोचलो. खरोखरच सुरेख आहे हे गाव. हे सारं गाव पाण्यात वसलेलं आहे हे सर्वांना माहीतच आहे. जलनगरी असं म्हणतात या शहराला. इथला मेनरोड म्हणजे एक मोठ्ठा कॅनाल आहे. त्याचं नाव ग्रँड कॅनाल. ५००–६०० फूट रुंदीचा हा कॅनाल आहे. यालाच लहान-मोठे इतर कॅनाल काढून सबंध गावातून खेळवले आहेत. गावात कुठंही जायच असलं तर गोंडोलामधून जावं लागतं. गोंडोला ही व्हेनिसची स्पेशल " रोइंग बोट " आहे. अगदी पूर्वीपासून व्हेनिसमधे गोंडोला आहेत. आत्ता कुठं थोड्या नवीन प्रकारच्या स्टीमर्स आल्या आहेत. इथं सगळे रस्ते पाण्याचे असल्यामुळं मोटारी, टांगे, बस असली काही भानगड नाही. इथली बस-सर्व्हिस म्हणजे स्टीमर. आणि इतर ठिकाणी लोक जसे स्वतःची मोटार किंवा सायकल ठेवतात त्याप्रमाणं इथले लोक स्वतःची गोंडोला किंवा एखादी मोटार-बोट ठेवतात.

काल रात्री आल्याबरोबर आम्ही जेवण करून एक तास गोंडोलामधून ग्रँड कॅनालवर फिरून आलो. रात्री अकरा-बाराची वेळ ही गोंडोलामधून फिरण्याला फार चांगली. या वेळी दिव्यांनी लखलखलेलं व्हेनिस शहर फार सुंदर दिसतं.

...रोम

४–८–५०

...खरं म्हणजे मला व्हेनिसहून पत्र टाकायचं होतं. पण वर लिहिलेलं पत्र पूर्ण झाल्यावर बाळासाहेब सारखी घाई करायला लागले. म्हणून मग पत्र अर्धवट ठेवून स्टेशनवर आलो आम्ही. त्या वेळी आलो म्हणून बरं झालं. कारण गाडीत बसलो न् गाडी लगेच सुरू झाली. सकाळी आम्ही व्हेनिसमधे स्टीमरने जाऊन सेंट मार्कोज स्क्वेअर वगैरे सर्व ठिकाणे पाहून आलो. साडेबारा वाजता व्हेनिस सोडलं ते रात्री दहा वाजता इथं रोमला येऊन पोचलो. खरं म्हणजे काल आम्ही फ्लॉरेन्सला राहणार होतो. पण फ्लॉरेन्स गाव पाहिल्यावर कसंतरीच वाटलं. अगदी जुनं पुराणं गाव ! मग तिथं न राहता थेट रोमला आलो. आज इथं सेंटपीटर्स चर्च, म्हणजे रोमन कॅथॉलिकांचं मुख्य चर्च पाहिलं

साऱ्या जगात याच्याइतकं मोठं चर्च नाही. अत्यंत सुरेख आहे हे चर्च. इंग्लंडमधे इतकी चर्चेस आणि कॅथेड्रल्स पाहिली. पण ती सारी याच्यापुढं फिकी. उद्या आता आम्ही रोमन राईन्स, पॅंथीऑन, कालॉसलम, व्हिक्टरी मॉन्यूमेंट वगैरे पाहायला जाणार आहोत.

आज विमानाचं तिकीट घेणं, सगळी चौकशी करणं यात बराच वेळ गेला. म्हणून चर्चखेरीज दुसरं काही पाहता आलं नाही. उद्या सारं पाहून आम्ही रोम सोडू.

पुणं केव्हा येईल असं झालं आहे.

... हे एक वर्ष नि बेचाळीस दिवस. प्रवास आता सरला आहे. ही माणसं, हे देश, सगळं सगळं आता दृष्टीच्या पलीकडं जाईल. आपली माणसं, आपला देश आता दृष्टीच्या टप्प्यात येईल. या सगळ्यांच्या उत्सुकतेनं माझं मन विमानाच्या पेक्षाही अधिक वेगानं उडून हिंदुस्थानात येतं आहे. सगळ्यांच्या भेटी कधी होतील या जाणिवेनं एक प्रकारची गोड हुरहूर लागली आहे.

सर्वांना स. न. मी येत आहेच.

तुझी
**ताई**



# प्रवास संपल्यानंतर

जोडीनं केलेला हा प्रवास आता सरला आहे. केवळ एक वर्ष आणि बेचाळीस दिवसांचा यूरोपचा प्रवासच नव्हे तर वीस वर्षं एकत्र केलेला प्रवासही.



या प्रवासात सुखदु:खाचे अनेक क्षण आले-गेले. प्रसिद्ध लेखक श्री. पु. ल. देशपांडे यांनी प्रस्तावनेत म्हटलेलंच आहे, अहेवपणाचं लेणं लेवून शांता गेली. पण तिनं मागं ठेवलेले हे सुखदु:खाचे क्षण कधी सरणार नाहीत त्या क्षणांच्या पालवीलाच आठवणींची फुलं फुलतील. शांतानं मागे ठेवलेली "माया" मोठी लडिवाळ आहे. त्याच पाठिंब्यावर आयुष्याचा राहिलेला मार्ग आता आक्रमावयाचा आहे.

इंग्लंडच्या दौऱ्यावर टेलिफोनच्या खात्याची सर्वांगीण माहिती घेण्यासाठी मी गेलो होतो. त्याही गोष्टीला आता एका तपाहून अधिक काळ लोटला आहे. वैवाहिक आयुष्याची त्या वेळी अगदीच जरी नवलाई नव्हती तरी शांताला सगळ्या गोष्टीतली दुर्दम्य हौस, तडफ, सौंदर्याची, प्रवासाची, साऱ्या-साऱ्यांची आवड लक्षात घेऊन तिला मी सहप्रवासी करून इंग्लंडमध्ये वावरलो. परदेशी वातावरणात स्त्री-पुरुषांना स्वतंत्र अस्तित्व असतं. शांता त्या परदेशी जीवनात लगेच समरस होऊ शकली. तिनं त्या वर्षभराच्या काळात अनेक माणसं जोडली. अनेक दृश्यं पाहिली. अनेक प्रसंग टिपून घेतले. मलाही जे दिसलं नसतं ते तिनं बघितलं. मनातही टिपून घेतलं व कागदावरही प्रकट केलं.

आई-वडील व पाच भाऊ या सर्वांनाच शांतानं परदेशचा प्रवास घरबसल्या घडविला. ती म्हणत असे की, मी काही लेखक नाही, कवी नाही; परंतु कित्येक ट्रिप्सची वर्णनं तिनं एखाद्या सराईत लेखकाप्रमाणे केलेली आहेत हे वाचून मला पुष्कळदा आश्चर्य वाटलं होतं. अजूनही वाटतं आहे.

पाण्यात पडलं की पोहायला येतं, या म्हणीप्रमाणे शांताला लिहायला लागल्यावर आपोआप शब्द सुचत गेले असतील हे खरं आहे. पण ही जी असंख्य पत्रं तिनं सातासमुद्रांपलीकडून आपल्या रक्ताच्या माणसांना लिहिली ती आज

दा. क्र. ९.४.२७७



वाचताना मीही अगदी स्तिमित झालो आहे. इतका प्रवास केला आम्ही. बहुतेक प्रत्येक वीक-एंडला कुठंना कुठं जात होतोच. या हिंडण्या-फिरण्यात पत्रं लिहिण्याचा खटाटोप शांता केव्हा नि कसा करीत होती हे अजूनही मला न सुटणारं कोडं आहे.

इंग्लंड-अमेरिकेला अनेकजण जातात. कुणी शिकायला जातात. कुणी फिरायला जातात. पुरुषांप्रमाणे अनेक तरुण स्त्रियाही जातात. पण शांता इंग्लिश लोकांमध्ये जितकी एकजीव होऊन वावरली तितक्या क्वचितच कुणी भारतीय स्त्रिया तिकडं वावरल्या असतील. ही पत्रं वाचून इंग्लंडला जाणाऱ्या एखाद्या मुलीला तिथं कसं रहावं याचा एक प्रकारचा परोक्ष अनुभव मिळाला तरी शांताच्या या खटाटोपाचं सार्थक झालं असं म्हणता येईल.

ही पत्रं तिला छापून पुस्तकरूपानं प्रकाशात आणायची होती. पण कुठल्याही कार्याला योग यावा लागतो असं म्हणतात ते खोटं नाही. तिच्या देखत हे होऊ शकलं नाही याचं वैषम्य आज आम्हां सर्वांना मनात बोचत आहे.

परंतु निदान आता तिच्या माघारी हा बेत सिद्धीस गेला याचंही समाधान आहेच. शांताचे बंधू अप्पा (वसंतराव) त्यांच्या पत्नी सौ. पद्मजा व मातोश्री व शशी, यांनी मनावर घेऊन पुस्तकाचा हा योग जुळवून आणला आहे. वसंतराव हा मोठा जिद्दीचा माणूस आहे. आळस त्यांना माहीत नाही. आपले लेखकमित्र वसंत शा. वैद्य यांना हाताशी घेऊन शांताची ही सारी पत्रं त्यांनी एकत्र गुंफली. माळ तयार झाली. पण ती प्रभुचरणी अर्पण करण्यास कुशल पुजारी हवा असतो, ते काम करण्यास कॉंटिनेंटल प्रकाशन पुणे या संस्थेचे हौशी व सुविद्य चालक श्री. अनंतराव कुलकर्णी हे उत्साहानं तयार झाले.

इतक्या साऱ्या माणसांचा हात लागल्यावर काय होणार नाही ? तशात महाराष्ट्राचे ख्यातनाम लेखक पु. ल. देशपांडे यांनी तर हृद्य प्रस्तावना लिहून देऊन बहार केली आहे. त्यांची प्रस्तावना म्हणजे या माळेतलं मध्यभागचं गुलाब पुष्प आहे.

यापेक्षा मी अधिक काय सांगणार ? आमचा प्रवास सरला असला तरी हे पुस्तक वाचणाऱ्या रसिक वाचकांचा प्रवास नव्या नवलाईनं सुरू व्हावा अशी इच्छा प्रकट करून हे निवेदन संपवितो.

पुणे ४.<br>
२२ मार्च १९६५.

स. का. धांदरफळे

REFBK 0014277
REFBK-0014277